CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, २६ फेब्रुवारी २०२५ । युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक ११० । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




**आज महाशिवरात्री**



**विनम्र अभिवादन**



स्वा. विनायक दामोदर सावरकर यांचा आज स्मृतिदिन

# महागाई भत्त्यात ३ टक्के वाढ

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर

### १७ लाख कर्मचाऱ्यांना मिळणार लाभ

◆ **मुंबई, २५ फेब्रुवारी**

राज्य सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय घेतला. आता महागाई भत्त्यात ३ टक्क्यांनी वाढ झाली असून, तो ५० टक्क्यांवरून ५३ टक्क्यांवर पोहोचला आहे. हा नर्णय राज्य कर्मचाऱ्यांसाठी आनंददायी ठरला आहे.

राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगानं शासनानं २५ फेब्रुवारी रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून, त्यात १ जुलै २०२४ पासून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचनेतील मूळ वेतनावरील लागू महागाई भत्त्याचा दर ५० टक्क्यांवरून ५३ टक्के करण्यात आला आहे.

महागाई भत्त्यातील वाढ १ जुलै २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीतील थकबाकीसह फेब्रुवारीच्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावा, असा आदेश देण्यात आला आहे.

केंद्राच्या धर्तीवर घेतला निर्णय केंद्र सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांना यापूर्वीच २ टक्के महागाई भत्त्यात वाढ केली होती. त्याच धरतीवर राज्य सरकारने आपल्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ केली असून, याचा लाभ सुमारे १७ लाख शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना मिळणार आहे.

◂(तभा वृत्तसेवा)

# शेअर मार्केट गुंतवणुकीच्या आमिषाने एक कोटींची फसवणूक

**▸▸सोलापूरचा दीपककुमार जोशी, मोहोळच्या महावीर कांबळेला अटक; आंतरराष्ट्रीय टोळीतील आरोपींना बेड्या**

**तभा वृत्तसेवा,**
**अहिल्यानगर, दि.२५ फेब्रुवारी-**

शेअर मार्केटमध्ये मोठ्या परताव्याच्या आमिषाने गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीतील आरोपींना सायबर पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात १ कोटी १० लाख ८० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले असून, भारतातील स्थानिक आरोपी परदेशातील गुन्हेगारांच्या मदतीने नागरिकांची फसवणूक करत असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी दीपककुमार जोशी (सध्या रा. वसंत विहार, सोलापूर, मूळ रा. पाटण, गुजरात) आणि महावीर कांबळे (रा. गोटेवाडी, मोहोळ, सोलापूर) यांना अटक केली आहे.





२७ जानेवारी २०२५ रोजी फिर्यादीने सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती की, ऑक्टोबर २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत ड्चउ त्र्श्लेलरश्र ड्शलींळींळशी नावाने व्हॉट्सॲपवरून शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखवून २०-३० टक्के अधिक नफा मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले. या भूलथापांना बळी पडून फिर्यादीने १ कोटी १० लाख ८० हजार रुपये गुंतवले, मात्र फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणाचा तपास करताना सायबर पोलिसांनी आर्थिक व्यवहारांचे तांत्रिक विश्लेषण केले. यातून मिळालेल्या बँक खात्यांच्या माहितीच्या आधारे पोलिसांनी महावीर कांबळे (रा. गोटेवाडी, मोहोळ, सोलापूर) याला अटक केली. त्याच्या चौकशीतून आणखी तीन साथीदार-प्रविण लॉहे, शिवाजी साळुंके आणि सागर कुलकर्णी यांचा सहभाग उघड झाला. या चौकशीतून राजेश राठोड उर्फ राजेंद्र भगीरथ सिंग (रा. बिंजारी राणीगाव, नागौर, राजस्थान) हा कंबोडियातील कंपन्यांशी संपर्क साधून पैसे वर्ग करून त्याचा हवालामार्फत परदेशात पाठवण्याचे काम करत असल्याचे समोर आले. त्याला १७ फेब्रुवारी २०२५ रोजी अटक करण्यात आली.राजेंद्रच्या चौकशीतून फसवणुकीत चीनच्या नागरिकांचा सहभाग असल्याचे उघड झाले. या टोळीने भारतीय चलन परदेशी डिजिटल चलनामध्ये रूपांतरित करून कंबोडियामध्ये पाठवले होते. त्याच्या सांगण्यावरून हवाला नेटवर्कद्वारे पैसे हस्तांतरित करणाऱ्या दीपककुमार जोशी याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून १२.९२ लाख रुपये रोख, एक कार आणि तीन मोबाईल जप्त करण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम, पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर पोलीस अंमलदार योगेश गोसावी, अभिजीत अरकल, राहुल हुसळे, अरुण सांगळे, मोहम्मंद शेख यांनी केली आहे.

# सज्जनकुमारला जन्मठेप

### १९८४ मधील शीखविरोधी दंगली प्रकरण

◆ **नवी दिल्ली, २५ फेब्रुवारी**



१९८४ मधील शीख दंगलीशी संबंधित पिता-पुत्राच्या हत्येच्या प्रकरणात काँग्रेसचा नेता आणि माजी खासदार सज्जनकुमारला दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाने मंगळवारी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या दंगलींशी संबंधित एका प्रकरणात सज्जनकुमारला दिल्ली उच्च न्यायालयाने आधीच जन्मठेपेची शिक्षा सुनावली असून, सध्या तो तिहार तुरुंगात शिक्षा भोगत आहेत.

१ नोव्हेंबर १९८४ रोजी दिल्लीत झालेल्या दंगलीत सरस्वती विहार परिसरात जमावाने पिता-पुत्राची हत्या केली होती. या प्रकरणी न्यायालयाने सज्जनकुमारला १२ फेब्रुवारी रोजी दोषी ठरवले होते. आज त्याला राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्या शीख अंगरक्षकांनी हत्या केली होती, त्यानंतर दिल्लीत दंगली उसळल्या होत्या. १ नोव्हेंबर १९८४ रोजी सरस्वती विहार परिसरात शीख विरोधी दंगल उसळली होती. यावेळी जमावाने केलेल्या हल्ल्यात सरदार जसवंतसिंग आणि सरदार तरुणदीपसिंग या पिता-पुत्राची हत्या करण्यात आली होती. यावेळी जमावाला भडकविल्याचा आरोप सज्जनकुमारवर होता. सज्जनकुमारच्या चिथावणीनंतर जमावाने वडील आणि मुलाला त्यांच्या घरात जिवंत जाळल्याचा आरोप होता. जमावाने घराची तोडफोड, लुटमार करीत आग लावली. घरातील इतर लोकांनाही मारहाण करून जखमी केले होते.

सध्या सज्जनकुमार दिल्ली कॅन्टमध्ये झालेल्या दुसऱ्या शीखविरोधी दंगल प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. आज त्याला तिहार तुरुंगातून न्यायालयात हजर करण्यात आले.

◂(वृत्तसंस्था)

### २०१४ मध्ये केंद्राने स्थापन केली 'एसआयटी'

शीखविरोधी दंगल प्रकरणाच्या चौकशीसाठी २०१४ मध्ये केंद्र सरकारने विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना केली होती. विशेष तपास पथकाने जसवंतसिंग यांच्या पत्नीला सज्जनकुमारविरुद्ध प्रत्यक्षदर्शी म्हणून सादर केले. तथापि, सज्जनकुमारच्या वतीने उपस्थित असलेल्या वकिलांनी त्यांची साक्ष नाकारण्याची मागणी केली होती. ■

# पाकिस्तानातून मायदेशी परतले २२ मासेमार

**अहमदाबाद** : पाकिस्तानने सोडलेले २२ भारतीय मासेमार मंगळवारी गुजरातमधील गिर सोमनाथ येथे पोहोचले. मायदेशी परतल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. पाकिस्तानच्या तुरुंगात अद्याप काही मासेमार खितपत पडलेले आहेत. त्यांच्या सुटकेसाठी केंद्र सरकारने त्वरेने प्रयत्न करावे, अशी विनंती त्यांनी केली. गुजरातमधील अरबी समुद्रात सागरी सीमेजवळ मासेमारी करीत असताना या २२ मासेमारांना पाकिस्तानच्या मरिन सिक्युरिटी एजन्सीने एप्रिल २०२१ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत अटक केली होती. पाकिस्तानच्या विविध तुरुंगांत जवळपास १९५ भारतीय मासेमार आहेत.

# पुनर्वसित ३३२ गावठाणांमध्ये नागरी सुविधांसाठी ५९९ कोटी

**राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय**

**मुंबई, २५ फेब्रुवारी**

राज्यातील विविध जिल्ह्यांतील १९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पांमुळे पुनर्वसन झालेल्या ३३२ गावठाणांमध्ये अपूर्ण राहिलेल्या नागरी सुविधा पुरवण्यासाठी कृती कार्यक्रम राबविण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला तसेच या कामांसाठी ५९९ कोटी ७५ लाख रुपयांच्या तरतूदीस देखील मंजूरी देण्यात आली.

प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन करताना भूसंपादन मोबदला देणे, नवीन गावठाणातील भूखंड देणे, पुनर्वसित गावठाणात नागरी सुविधा पुरविणे, लाभक्षेत्रातील पर्यायी जमीन देणे यांचा प्रामुख्याने समावेश होतो. पुनर्वसनासाठी प्रकल्प यंत्रणेच्या निधीतून खर्च केला जातो. पाटबंधारे प्रकल्पांच्या बाबतीत जलसंपदा प्रकल्प संस्था आहे. मात्र, १९९८ मध्ये शासनाने विविध विभागांत पाटबंधारे विकास महामंडळे स्थापन केली आहेत. त्यामुळे जुन्या पाटबंधारे प्रकल्पांमुळे बाधित गावांच्या पुनर्वसनासाठी महामंडळांकडून निधी उपलब्ध होत नाही. म्हणून जुन्या प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या गावांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी महसूल व वन विभागाच्या पुनर्वसन प्रभागांकडे निधी उपलब्ध करून निर्णय घेतला आहे. ३३२ गावठाणातील अपूर्ण नागरी सुविधा पुरविण्यासाठी ४२४.६० कोटी रुपयांच्या निधीबाबतचे प्रस्ताव मदत व पुनर्वसन विभागामार्फत हाताळण्यासाठी तत्त्वतः मान्यता देण्यात आली. हा निधी आणि पूर्वीची १७५ कोटी १४ लाख रुपयांची थकबाकी असे एकूण ५९९ कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद आगामी अधिवेशनात उपलब्ध करून देण्यासही मंजुरी देण्यात आली. या नागरी सुविधांचे कामे पूर्ण झाल्यानंतर देखभाल दुरुस्तीसाठी विभागाकडे हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली.

## महत्त्वाचे

### कीर्ती किरण पुजार धाराशिवचे नवे जिल्हाधिकारी



**धाराशिव** : धाराशिवचे नवे जिल्हाधिकारी म्हणून रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कीर्ती किरण पुजार हे २०१७ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. त्यांनी २०१७ मध्ये ११५ वी रँक मिळवली होती. रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी तीन वर्षे काम केले आहे. जिल्हाधिकारी म्हणून धाराशिव जिल्ह्यात त्यांची प्रथमच नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. ओंबासे यांची बदली सोलापूर महानगरपालिकेत आयुक्त म्हणून केल्यानंतर गेला आठवडाभर धाराशिव जिल्ह्याच्या जिल्हाधिकारीपदी कोणाची वर्णी लागणार याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले होते. अखेर आज राज्य सरकारने कीर्ती किरण पुजार यांची जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांना तात्काळ जिल्हाधिकारी म्हणून रुजू होण्यास सांगण्यात आले आहे. उद्या किंवा परवा ते धाराशिवचे जिल्हाधिकारी म्हणून रुजू होऊ शकतात.

### चार भारतीय कंपन्यांवर ट्रम्प प्रशासनाकडून निर्बंध

**नवी दिल्ली** : अमेरिकेकडून इराणवर गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर निर्बंध लादण्यात आले आहेत. याच निर्बंधांचा एक भाग म्हणून इराणमधून निर्यात होणाऱ्या तेलाची वाहतूक करणाऱ्या संलग्न कंपन्यांनाही ट्रम्प प्रशासनाने लक्ष्य करायला सुरुवात केली आहे. प्रामुख्याने यात इराणमधून निर्यात होणारे कच्चे तेल आणि पेट्रोलियम उत्पादनांचा समावेश आहे. अशी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांची यादी अमेरिकेने तयार केली असून, त्यांच्यावर कडक निर्बंध लादण्यात आले आहेत. त्यात भारतातील चार कंपन्यांचा समावेश आहे. यापैकी एक कंपनी नवी मुंबईतील आहे. भारतातील निर्बंध लादण्यात आलेल्या चार कंपन्यांचा इराणमधून निर्यात होणाऱ्या तेलाची वाहतूक करण्यात सहभाग असल्याचा आरोप आहे.

### भारतीय तटरक्षक दल सर्वांत कार्यक्षम दलांपैकी एक

**नवी दिल्ली** : भारतीय तटरक्षक दल शक्तिशाली, विश्वासार्ह आणि जगातील सर्वांत कार्यक्षम सागरी दलांपैकी एक बनले आहे, असे कौतुकोद्गार संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी मंगळवारी काढले. तटरक्षक दलाच्या पदवीदान समारंभात राजनाथसिंह यांनी निर्माण होणाऱ्या अपारंपरिक धोक्यांवर प्रकाश टाकला. पारंपरिक धोक्यांना तोंड देण्याव्यतिरिक्त सायबर हल्ले, डेटा उल्लंघन आणि रडार व्यत्यय यासारख्या आव्हानांपासून सतर्क राहण्याचे आवाहन भारतीय तटरक्षक दलाला केले. मागील वर्षात तब्बल ३७ हजार कोटी रुपयांचे मादकपदार्थ जप्त करण्याव्यतिरिक्त तटरक्षक दलाने १४ नौका आणि ११५ सामुद्रीचाच्यांना पकडले.

# मंत्रालयातील सातव्या मजल्यावरुन उडी मारून शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि.२५ फेब्रुवारी:**

मंत्रालयात अभ्यगतासाठीच्या प्रवेशावर कठोर निर्बंध लावण्यात आले असलेतरी याठिकाणी विविध कारणासाठी संरक्षण जाळीवर उड्या मारून होणारी आंदोलन, आत्महत्येचे प्रयत्न करण्याच्या घटना सुरूच राहिल्या आहेत मंगळवारी पुण्यातील एका शेतकऱ्याने चक्क सातव्या मजल्यावरून संरक्षण जाळीवर उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यामुळे काहीकाळ एकच गडबड उडाली. त्याला सुखरूपपणे बाहेर काढताना पोलिसांची धावपळ झाली.



विजय परबती साष्टे, (रा. रामनगर, दत्तनगर, वारजे माळवाडी पुणे) असे त्यांचे नाव असून इन्कलाब जिंदाबाद ,असे म्हणत त्याने उडी मारली. आतापर्यंत मंत्रालयातील संरक्षण जाळ्यावर अनेकांनी सातव्या मजल्यावर पहिलीच घटना आहे. सुमारे ८० फुट उंचीवरून उडी मारल्याने त्याला छातीवर व मानेला मुक्का मार लागला आहे. त्याला जीटी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. आपली हक्कासाठी गायरान जमीन एकाने हडप केल्याने आणि त्याबाबत प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ त्याने हे कृत्य केले असल्याचे ठीक आहे प्राथमिक तपासातून माहिती समोर आली आहे.

विजय साष्टे यांची वारजे गाव पुणे शहर येथील गट नंबर ३३ /१ब /१ क्षेत्र ५४ गुंठे ही जागा आहे. त्याला लागून असणारी गायरान जमीन वनविभागातील तीन एकर जागा खोटी कागदपत्रे करून स्वतःची जागा असे दाखवून पोलीस पाटील नसताना पोलीस पाटील असल्याची दर्शवून पुणे महानगरपालिकेतील दगडू भिकोबा बराटे (रा वारजे ) याने बळकावली असल्याचे त्याचे म्हणणे आहे. त्याबाबत महसूल विभागाकडे तक्रार करूनही अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे निराश झाल्याने साष्टे आज मंत्रालयात आले. ७ व्या मजल्यावर जाऊन अचानकपणे ४च्या सुमारास दुसऱ्या मजल्यावरील संरक्षित जाळीवर उडी मारली. त्यामुळे एकच गोंधळ उडाला मंत्रालयाच्या आतील पोर्चमध्ये महिला उद्योजकांचे होते. त्या प्रदर्शनाच्या ठिकाणी मोठी गर्दी होती. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. दोघे पोलीस जाळीत उत्तरे त्याला सुमारे वीस मिनिटाच्या प्रयत्नानंतर बाहेर काढले. प्रकृती बिघडल्याने त्याला रुग्णवाहिकेतून हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

# बावनकुळे-जयंत पाटील यांच्यात मध्यरात्री भेट

### राजकीय चर्चांना उधाण

◆ **मुंबई, २५ फेब्रुवारी**

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील या दोन दिग्गज प्रदेशाध्यक्षांची भेट सोमवारी मध्यरात्री झाली. बावनकुळे यांच्या मुंबईतील शासकीय निवासस्थानी झालेल्या या भेटीने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली .

गेल्या अनेक वर्षांपासून जयंत पाटील हे भाजपाच्या वाटेवर आहेत अशा चर्चा अधूनमधून कानावर पडत असतात. विधानसभा निवडणुकीच्या काळात अजित पवारांनी थेट प्रस्ताव दिल्याचे मागील काळात दिसले होते. अशात दिवसाढवळ्या नव्हे तर, रात्रीच्या काळोखात जयंत पाटलांनी भाजपा प्रदेशाध्यक्षांची भेट घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून प्रदेशाध्यक्ष बदलाची मागणी केली जात आहे. पक्षातील अंतर्गत धुसफूस आणि प्रदेशाध्यक्षांबाबत उलटसुलट चर्चांमुळे जयंत पाटील नाराज असल्याचे बोलले जात आहे. याच नाराजीतून पाटील भाजपात पवेश करतील, असा कयास राजकीय विश्लेषक लावत आहेत.

◂(तभा वृत्तसेवा)

### महसूल विभागातील विविध विषयांसाठी भेट : जयंत पाटील

चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतल्याच्या बातमीला जयंत पाटील यांनी दुजोरा दिला. सांगली जिल्ह्यातील महसूल विभागाशी संबंधित काही प्रश्नांसाठी महसूल मंत्री बावनकुळे यांची भेट घेतल्याचे माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी मान्य केले. यावेळी राधाकृष्ण विखे पाटील आणि माझ्याबरोबर शिष्टमंडळातले ४-५ जण होते. आम्ही १० ते १२ निवेदन मंत्र्यांनी दिली. विविध प्रश्नांवर चर्चा केली. मात्र, यावेळी कुठलीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे स्पष्टीकरण जयंत पाटील यांनी माध्यमांसमोर दिले. ■

# केजरीवालांच्या अडचणी वाढल्या

### कॅगचे १४ अहवाल विधानसभेत सादर

◆ **नवी दिल्ली, २५ फेब्रुवारी**

दिल्लीतील बहुचर्चित उत्पादन शुल्क घोटाळ्यावरील कॅग यांचा अहवाल आज दिल्ली विधानसभेत सादर करण्यात आला. वेगवेगळ्या आर्थिक घोटाळ्यांबाबतचे कॅगचे एकूण १४ अहवाल विधानसभेत सादर करण्यात आले तसेच या घोटाळ्यांसाठी अहवालातून तत्कालीन सरकारवर कठोर शब्दांत ताशेरे ओढण्यात आले.

उत्पादन शुल्क घोटाळ्यामुळे दिल्ली सरकारच्या दोन हजार कोटी रुपयांच्या महसुलाचे नुकसान झाल्याचा आरोप या अहवालातून करण्यात आला. आपच्या १२ आमदारांना निलंबित करण्यात आल्यावर हा अहवाल सरकारने सभागृहात सादर केला. उत्पादन शुल्क अहवालाबाबत स्थापन करण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीच्या अहवालाकडे तत्कालीन उत्पादन शुल्क मंत्री मनीष सिसोदिया यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप या अहवालात करण्यात आला. दारू दुकानांचे परवाने परत केल्यामुळे तसेच नवीन दारू झोनसाठी नव्याने निविदा काढण्यात आलेल्या अपयशामुळे सरकारचे ८९० कोटी १५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा ठपकाही ठेवण्यात आला. ■

# मंगळावर सापडला तीन अब्ज वर्षांपूर्वीचा समुद्रकिनारा!

◆ **पर्थ, २५ फेब्रुवारी**

नासाच्या मरिनर-९ या ऑर्बिटरने १९७० मध्ये घेतलेल्या मंगळ ग्रहाच्या छायाचित्रांत या ग्रहावरील पाण्याचे नक्षीदार पृष्ठभाग उघड झाले होते. यामुळे लाल ग्रहावर कधी पाणी होते का, या एकेकाळी पडलेल्या प्रश्नाचे निराकरण झाले होते. तेव्हापासून आपल्या शेजारी ग्रहावर कधीकाळी पाण्याची भूमिका मोठी होती, याचे अधिकाधिक पुरावे समोर येत आहेत. उदाहरण द्यायचे झाल्यास, मंगळावरील उल्कापिंड ४.५ अब्ज वर्षांपूर्वीच्या पाण्याचे पुरावे देतात. अलिकडेच एका उल्कापिंडाच्या आघाताने तयार झालेले विवर आज पृष्ठभागाखालील बर्फाची उपस्थिती दर्शवते.

मंगळावर पाणी कधी आले, ते किती प्रमाणात होते आणि कधीपर्यंत होते, या विषयावर आज चर्चा होतात. मंगळावर कधीकाळी महासागर होता का, हा आताच्या चर्चांमधील ज्वलंत विषय असतो.

पीएनएएसमध्ये प्रकाशित नवीन अभ्यासातून यावर अधिक प्रकाश टाकण्यात आला आहे. चीनच्या ग्वांगझू विद्यापीठातील जियानहुई ली यांच्या नेतृत्वात चिनी आणि अमेरिकी शास्त्रज्ञांच्या पथकाने केलेला हा अभ्यास चीनच्या राष्ट्रीय अंतराळ प्रशासनाच्या मार्स रोव्हर झुराँगने केलेल्या कामावर आधारित होता.

### ग्रहावर कधीकाळी पाणी असल्याचा ठोस पुरावा



अब्जावधी वर्षांपूर्वीच्या समुद्रकिनाऱ्याजवळ गाडल्या गेलेल्या खडकांची अभूतपूर्व माहिती झोराँगमुळे मिळाली. मंगळाच्या प्राचीन महासागराचा तटवर्ती भाग सापडला, असा दावा संशोधकांनी केला आहे.

◂(वृत्तसंस्था)

### झोराँगचे नाव पौराणिक देवतेच्या नावावर

झोराँग रोव्हरचे नाव एका पौराणिक अग्निदेवतेच्या नावावरून ठेवण्यात आले आहे. हे यान २०२० मध्ये चीनच्या राष्ट्रीय अंतराळ प्रशासनाने प्रक्षेपित केले होते आणि २०२१ ते २०२२ पर्यंत मंगळावर सक्रिय होते.

### लाल ग्रहावर निळे पाणी

मंगळाचा शोध घेणारे रोव्हर भूगर्भशास्त्र, माती आणि वातावरणासह ग्रहाच्या अनेक पैलूंचा अभ्यास करते. याचे कारण म्हणजे, मंगळावर जीवन होते की नाही, हे ठरवण्यासाठी पाणी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. गाळाचे खडक बहुतेकदा एक विशेष केंद्र असतात; कारण त्यात मंगळावर पाण्याचे म्हणूनच जीवनाचे पुरावे असू शकतात. ■



## विठ्ठल-रूक्मिणीमातेच्या चरणी तीन किलोच्या चांदीच्या वस्तू अर्पण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि. २५ फेब्रुवारी-**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस खेड (जि.पुणे) येथील पांडूरंग कड व भरत कड या भाविकांनी ३ किलो वजनाच्या चांदीच्या वस्तू अर्पण केल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक श्रोत्री यांनी दिली.

त्याबद्दल देणगीदार भाविकाचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे पुजारी तथा सहायक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी यांच्या हस्ते श्री विठ्ठल रूक्मिणी मातेची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. त्यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते. सदरची देणगी पांडूरंग व भरत कड या बंधूंनी आपले पितार्थी कै. कृष्णाजी सोपानराव कड यांच्या स्मरणार्थ दिली असून, त्यामध्ये चांदीचे ४ नग ताम्हण, ४ पेले व ४ पळी इत्यादीचा समावेश असून, त्यांचे अंदाजे वजन ३ किलो होत आहे. कड बंधू हे श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे निस्सिम भक्त आहेत व ते कुरूळी तालुका खेड (जि.पुणे) येथील रहिवाशी आहेत.

# एसटीची थकबाकी सव्वा कोटींची!

## ● विविध कंपन्यांची देयके वाढल्याने एसटीचा गाडा हाकने झाले मुश्किल
## ● सोलापूरच्या एसटी अधिकाऱ्यांसमोर उभा ठाकला मोठा प्रश्न?

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

प्रवाशांच्या सेवेसाठी नेहमी धावून येणारी एसटी मोठ्या आर्थिक संकटात सापडली आहे. दैनंदिन खर्च जास्त आणि उत्पन्न कमी, अशा मगरमिठीत अडकेलेल्या एसटीला आता विविध कंपन्यांचे देयके देण्याचे प्रश्न सतावत आहे. अनेक कंपनीच्या बिले कित्येक महिन्यापासून प्रलंबित असल्याने ''एसटीचा गाडा कसा हकायचा''? हा प्रश्न सोलापूर एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांसमोर आवा वासून उभा ठाकलेला आहे.

दरम्यान, सोलापूर एसटी विभागाच्या ताब्यात नवीन इलेक्ट्रिक बसेस दाखल झाल्या आहेत. ओलेक्ट्रा आणि ट्रान्स या कंपन्यांची देयके अद्यापही प्रलंबित आहेत. परंतु बसेसचा प्रश्न एस्तीच्यानविभागीय कार्यालय मार्फत सोडवला जाणार आहे. त्याच पद्धतीने इंजिन ऑइल, स्प्रिंग पाटी, सस्पेन्शन, ब्रेक ऑइल, अशा दैनंदिन खर्चासाठी देखील एसटी महामंडळाकडे मुबलक निधी उपलब्ध नसल्याने विभागातील एसटी बसेस नियमितपणे कशा चालवायचा हा प्रश्न ? अधिकाऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. एसटी महामंडळाच्या संलग्नित असणाऱ्या विविध कंपन्यांनी आता एसटी महामंडळाला सामग्री आणि स्पेअर पार्ट देणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या कंपन्यांकडे एसटी महामंडळाचे देयके थकलेली आहेत. त्या कंपन्यानी यापूर्वीचे पैसे देण्याचे मागणी केली आहे. एसटी महामंडळकडून विविध कंपनीला तब्बल १ कोटी १० लाखाहून रक्कम देणे बाकी आहे. त्यामुळे पूर्वीचे थकीत रक्कम द्या आणि नवीन सामग्री घेऊन जा, असे स्पष्टपणे एसटीला कळवण्यात आले आहे. त्यामुळे एसटी विभागातील अधिकारी आणि कर्मचारी द्विधा मनस्थितीत अडकले आहेत.

| एसटीकडून विविध कंपन्यांना देण्यात येणारी प्रलंबित देयके | |
|---|---|
| इंडियन ऑइल | ३० लाख |
| टाटा मॅक्स | १० लाख |
| हेरिटेज स्प्रिंग | ३० लाख |
| सस्पेन्शन | १० लाख |
| डी.के. बाजार | ३० लाख |

यापूर्वी स्क्रॅप झालेल्या एसटी बसेसच्या विक्रीतून सोलापूर एसटी विभागाला सुमारे एक कोटीचे उत्पन्न प्राप्त झाले होते. त्याच रकमेतून विविध कंपन्यांच्या देयकांची पूर्तता करण्यात आली. परंतु आता देयकांची यादी वाढतच असल्याने अपुऱ्या निधीमुळे एसटीचा दैनंदिन खर्च देखील भागवणे मुश्किल बनलेले आहे. एसटीचा दररोजचा खर्च लाखोंच्या घरात आहे. यांत्रिकी विभागात कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांकडे एसटीच्या दररोजच्या खर्चाचा तपशील ठेवला जातो. हा खर्च केल्याशिवाय एसटी बस स्थानकातून बाहेर पडू शकत नाही. जर एसटी मार्गावर धावायचे असेल तर त्यासाठी हा खर्च आवश्यक असतो. अनेक बसेस विविध कारणास्तव नादुरुस्त होतात. त्या बसेस दुरुस्त करण्यासाठी विविध स्पेअर पार्ट तसेच इतर सामग्री यांची आवश्यकता भासते. एसटीच्या विविध पार्ट आणि इतर सामग्रीचा एक महिन्याचा निव्वळ खर्च हा एक कोटींचा आहे. त्यामध्ये डिझेल आणि इतर किरकोळ खर्च जोडल्यास त्यामध्ये आणखीन वाढ होणार आहे. दरम्यान, ज्या कंपन्यांकडून एसटी बसेससाठी ही सामग्री पुरवली जाते. त्या कंपन्यांना एसटी महामंडळाकडून अद्याप देयके प्राप्त झालेली नाहीत. यापूर्वी घेतलेली सामग्री आणि स्पेअर पार्टचे देयक अद्यापही एसटी महामंडळाने कंपनीला दिले नसल्याने कंपनी आता साहित्य पुरवण्यास टाळाटाळ करत आहे. अशा अवस्थेत एसटी महामंडळाला पैशांची चणचण भासत आहे. यापूर्वी स्क्रॅप बसेस मधून विभागाला उत्पन्न प्राप्त झाले होते. त्यातून कसेबसे एक महिना काढण्यात आला. परंतु आता एसटीची तिजोरी रीती झाली आहे. त्यामुळे एसटीवर यापुढील खर्च करणे अवघड बनलेले आहे. पैशांची चणचण आणि दुसरीकडे विविध सवलती अशा कचाट्यात एसटी महामंडळ सापडले आहे. एसटीची देखभाल दुरुस्ती केल्याशिवाय एसटी मार्गावर सोडता येत नाही. सदरची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी एसटी महामंडळाकडे पुरेसे द्रव्य नाही. अशा द्विधा मनस्थितीत अडकलेल्या एसटी महामंडळाला उभारी देण्याची गरज निर्माण झालेली आहे.



## संक्षिप्त वृत्त

### कट मारल्याने रिक्षा उलटून चालक जखमी

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**




सात रस्ता येथून विजापूर नाक्याकडे जात असताना पत्रकार भवन चौकात अज्ञात रिक्षाने कट मारल्यामुळे दुसरी रिक्षा उलटून झालेल्या अपघातात चालक जखमी झाला. हा अपघात मंगळवारी दुपारी १२.३० वाजता घडला. राजाराम सिद्राम कोरे (वय ५३ रा. गौतम नगर विजापूर रोड) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. राजाराम कोरे यांना उपचारासाठी शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. मित्र संजय लंबे यांनी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### मोटारसायकल घसरून झालेल्या अपघातात तरूण जखमी

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

सोलापूरहून मोहोळकडे जात असताना बाळे ब्रिजच्या पुढे मोटारसायकल घसरून झालेल्या अपघातात शुभम शिवाजी जाधव (वय २१ रा. उमरगा चिंचोळी ता. उमरगा जि. धाराशिव) हा तरूण जखमी झाला. हा अपघात २४ फेब्रुवारी रोजी रात्री १०.३० वाजता घडला. शुभम जाधव याला डोकीस मार लागल्याने त्याला शासकीय रूग्णायात दाखल केले आहे. सिव्हील पोलिस चौकती झाली आहे.

### कळमण येथे घरगुती कारणावरून मारहाण

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण येथील राहत्या घरा जवळ घरगुती कारणावरून नितीन पवार याने लाथाबुक्यांनी केलेल्या मारहाणीत गणपत अभिमन्यू पवार (वय ६८) हे वृद्ध इसम जखमी झाले. गणपत पवार यांना सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### भंडारकवठेत बांधाच्या वादातून महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथे बांधाच्या कारणावरून महिलेसह चौघांनी केलेल्या मारहाणीत शाहेराबेगम रफीक अहमद मुजावर (वय ५६) ही महिला जखमी झाली. ही मारहाण मंगळवारी सकाळी ११.४५ वाजात घडला. शाहेराबेगम यांना मंद्रुप येथील सरकारी दवाखान्यातून पुढील उपचारासाठी मुलगी निलोफर मुजावर यांनी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### मैंदर्गीत अज्ञात कारणावरून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील बस स्टॉपवर थांबले असता, तिघांनी अज्ञात कारणावरून दगडाने व लाथाबुक्यांनी केलेल्या मारहाणीत लक्ष्मण पांडू राठोड (वय ३१ रा. दुधनी ता. अक्कलकोट) हा तरूण जखमी झाला. ही मारहाण २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता झाली होती. लक्ष्मण याला त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी २५ फेब्रुवारी रोजी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### अज्ञात कारणावरून विषारी द्रव्य प्राशन

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील राहत्या घरी अज्ञात कारणावरून विकास हणमंत लोखंडे (वय ३८) या इसमाने विषारी औषध प्राशन केले. हा प्रक़ार मंगळवारी सकाळी ८ वाजता घडला. विकास यांना पिलीव येथील सरकारी दवाखान्यातून पुढील उपचारासाठी आई दीपाली लोखंडे यांनी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### कळमण येथे वडीलाकडून मुलावर चाकूने हल्ला

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

उत्तर सोरलापूर तालुक्यातील कळमण येथे घरगुती वादातून वडीलाने चाकूने वार करून मुलास जखमी केले. नितीन गणपत पवार (वय ३६) हा इसम जखमी झाला. ही मारहाण २४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७.३० वाजता झाली. नितीन पवार यांना उपचारासाठी मित्र संजय लंबे यांनी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.



## रेल्वे स्टेशन परिसर रस्त्यावरील अतिक्रमण हटविले

▸ महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई
▸ चायनीज, हात गाड्या जागेवर केल्या निष्कासित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ फेब्रुवारी-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने कारवाई सुरू आहे. आज पथकाकडून रेल्वे स्टेशन परिसरातील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत चायनीज गाड्या व हात गाड्या जागेवर निष्काशित करण्यात आल्या. तसेच पत्रकार भवन येथील खरबूज स्टॉलचे अतिक्रमण काढण्यात आले.

लोखंडी चार काउंटर, एक हातगाडी व एक लोखंडी खोका आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.

दरम्यान, आज पथकाकडून रेल्वे स्टेशन परिसर येथील अनधिकृत असलेल्या हात गाड्या, चायनीज पदार्थाच्या गाड्या, हॉटेल समोरील काऊंटरचे अतिक्रमण काढण्यात आले. चायनीज गाड्या व हात गाड्या जागेवर निष्कासित करण्यात आले. तसेच पत्रकार भवन येथील खरबूज स्टॉलचे अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत लोखंडी चार काउंटर, एक हातगाडी, एक लोखंडी खोका व इतर साहित्य जप्त करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.

### आजारपणाला कंटाळून महिलेची आत्महत्या

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

कुमठा नाका येथील पंचशिल नगरात आजारपणाला कंटाळून महिलेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. हा प्रकार २५ फेब्रुवारी रोजी १२ वाजता घडला. लिंबाबाई राजकुमार भतगुणकी (वय ५८) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. औषध पिल्यानंतर त्यांना त्रास होऊ लागला, त्यामुळे मुलगा मल्लिकार्जून यांनी उपचारासाठी शासकीय रूग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच मृत्यू झाला.

### बेशुध्द अवस्थेतील इसमाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

भैय्या चौकातील एस.सी.एस. हॉस्पिटल जवळ रोडवर बेशुध्द आवस्थेत आढळून आलेल्या इसमाचा मृत्यू झाला. हणमंत लगमण्णा कोळी (वय ४० रा. होनमुर्गी ता.दक्षिण सोलापूर) असे मृत्यू झालेल्या इसमाचे नाव आहे. त्यांना सदर बझार पोलिस ठाण्याचे हवालदार व्ही. पी. जमादार यांनी रूग्णालयात दाखल केले. मात्र त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला.



## कामगार संघटनेच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता करणार : आयुक्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५फेब्रुवारी-**

महापालिकेतील कर्मचाऱ्यांनी नागरिकांच्या अडचणी तात्काळ सोडवाव्यात. नागरिकांना चांगली सेवा द्यावी तसेच सोलापूर शहरात स्वच्छता चांगली असून देश व राज्यातील सर्वोत्कृष्ट स्वच्छ शहरात सोलापूर शहराला स्थान मिळवण्यासाठी प्रयत्न करूया. कामगार संघटनांच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही महापालिका नूतन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने संत गाडगेबाबा यांच्या जयंतीचे औचित्य साधून नूतनआयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचा सत्कार आणि महाराष्ट्र राज्य स्वच्छता संवर्ग संघटनेचा प्रथम वर्धापन दिन सोलापूर महानगरपालिकेमध्ये साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांची उपस्थिती होती. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य फेडरेशनच्या सरचिटणीस कामगार नेते अशोक जानराव, मुख्य सफाई अधीक्षक एन. सी. बिराजदार, मुख्य आरोग्य निरीक्षक सुधाकर नागटिळक, बाबासाहेब इंगळे, महाराष्ट्र राज्य आरोग्य निरीक्षक संघटना शाखा सोलापूर अध्यक्ष शेषराव शिरसट, क्रांती युनियनचे अध्यक्ष लिंबराज जेठीथोर , सफाई मजदूर काँग्रेस संघटना अध्यक्ष बाली मंडपू, कामगार कल्याण अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, विठोबा शिंदिबंदे, कार्याध्यक्ष सुनील राठोड, तेजस्विता कासार, उपाध्यक्ष जितू मोरे, रोहित गवळी, हिरोली, क्षीरसागर, अमोल कांबळे, राहुल मस्के, दत्ता तुळसे , विद्यासागर मस्के, अंबादास डावरे, राहुल बनसोडे, सतीश नागटिळक, पप्पू सातपुते आणि आरोग्य निरीक्षक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हा दुष्काळ मुक्तीच्या वचनपूर्तीचे पहिले पाऊल

## काँग्रेस पक्षच विमानसेवा सुरू करण्यासाठी घेणार पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ फेब्रुवारी-**

सोलापूर लोकसभा मतदारसंघातील मोहोळ, मंगळवेढा, अक्कलकोट तालुक्यातील दुष्काळी भागातील जलसंधारणाची कामे लवकरच सुरू केली जाणार आहेत, त्याची माहिती देण्यासाठी मंगळवारी शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती यावेळी खासदार प्रणिती शिंदे या बोलत होत्या.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी खा. प्रणिती शिंदे यांनी मतदारसंघातील दुष्काळी भागातील पाणी टंचाईची समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले होते. दिलेल्या आश्वासनाची वचन पूर्तता करण्यासाठी म्हणून मोहोळ, मंगळवेढा आणि अक्कलकोट तालुक्यात दुष्काळी भागात जलसंधारणाच्या काम केले जाणार आहेत, या कामा करिता चेन्नई येथील एन्व्हायरमेंटलिस्ट फाउंडेशन ऑफ इंडिया या संस्थेच्या वतीने सीएसआर अंतर्गत जलसंधारणाचे काम केले जाणार असल्याची माहिती खासदार प्रणिती शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दरम्यान, याबाबत अधिक माहिती देताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, सोलापूर जिल्हा हा पर्जन्य छायेचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील मंगळवेढा, सांगोला, पंढरपूर, मोहोळ, अक्कलकोट तालुक्यातील काही भाग अद्यापही दुष्काळीच आहे. या भागातील दुष्काळाचा डाग पुसावा यासाठी जलसंधारणाच्या योजना राबवाव्यात अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून केली जा आहे. दरम्यान, गेल्यावर्षी लोकसभा निवडणुकीचा प्रचार करत असताना मी मंगळवेढा तालुक्यातील २४ गावांचा पाणी प्रश्न सोडवण्यासह अक्कलकोट आणि मोहोळ तालुक्यातील दुष्काळी भागातील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी आम्ही केंद्र सरकार, राज्य सरकार यांच्याकडे पाठपुरावा करत आहोत. त्याशिवाय काही पर्यावरणप्रेमी संस्थांच्या माध्यमातून देखील जलसंधारणाची कामे पूर्ण केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.



या जलसंधारणाच्या कामासाठी खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रयत्नातून चेन्नई येथील पर्यावरणप्रेमी फाउंडेशन ऑफ इंडिया ही संस्था सोलापूर जिल्ह्यातील जलसाठे पुनर्संचयित करण्याचे काम हाती घेणार आहे. ही सर्व कामे सामाजिक जबाबदारी अंतर्गत केली जाणार असून यासाठी शासनाकडून कोणत्याही प्रकारचा निधी घेतला जाणार नाही.

सुरुवातीला या संस्थेकडून सोलापूर लोकसभा मतदार संघातील मोहोळ तालुक्यातील वाफळे, अक्कलकोट तालुक्यातील गाव तसेच मंगळवेढा तालुक्यातील लक्ष्मी-दहिवडी आणि डोंगरगाव या गावांतील जलसाठे पुनर्संचयित करण्याचे काम केले जाणार आहे.

तत्पूर्वी खा. शिंदे यांनी राज्यातील तसेच केंद्रातील भाजप सरकारवर टीकास्त्र सोडले आहे. मागील सहा महिन्यांपासून आम्ही आकाशाकडे पाहतोय सोलापूरातून विमान कधी उडणार, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन विमानतळाचे लोकार्पण केले, पण विमानसेवा काही सुरू झाली नाही. मी देशाचे नागरी उड्डाण मंत्री यांच्याशी चर्चा करून विमानसेवा सुरू करण्याबाबत मागणी केली, आम्ही विमानसेवेसाठी प्रयत्न करतोय परंतु इगो'चा प्रश्न येतो, त्यात अडथळे आणण्याचा प्रयत्न होतो. येत्या काही दिवसात काँग्रेस पक्षाकडूनच विमानसेवा सुरू होईल असे सांगताना सत्ताधाऱ्याने अडथळे नाही, आणले तर असेही काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या.

लाडकी बहीण योजनेवरून त्यांनी सरकारला लक्ष्य केले, त्यांना विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम करायचे होते परंतु लाडकी बहीण पुढे आणून त्यांनी जे करायचे ते केले. राज्य सरकारची आर्थिक तिजोरी अडचणीत आल्याने आता या योजनेतील नऊ लाख लाभार्थी कमी होणार असल्याचे समजते. एकही योजना व्यवस्थित राबवली जात नसल्याची टीका त्यांनी केली.काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी, प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा सांभाळल्यानंतर राज्यभरातील जिल्हा आणि शहर पातळीवर देखील लवकरच बदल केले जातील, असे संकेत दिले होते. तेव्हा सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या अध्यक्षपदाची धुरा कोणाकडे देणार असा सवाल उपस्थित करताच, खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या,''जनाधार असलेल्या नेत्यालाच शहर आणि जिल्ह्याच्या अध्यक्षपदाची धुरा दिली जाईल असे संकेत यावेळी दिले.

या पत्रकार परिषदेला या संस्थेचे संस्थापक अरुण कृष्णमूर्ती सी आदी मान्यवर उपस्थित होते.

### असे होणार काम

१) तलावांमधील कचरा, अवशेष आणि अतिक्रमित वनस्पतींचे स्वच्छता कार्य तलावांचे गाळनिर्मूलन आणि खोलीकरण करून पाणी साठवण क्षमता वाढवणे.
२) जलभरण विहिरी, पक्षी निवास द्वीपे आणि झिरप गटारांची निर्मिती करणे.
३) पावसाळ्यानंतर स्थानिक प्रकारच्या वनस्पती लावणे.
४) तलावात येणाऱ्या प्रवाहाचे आणि अतिरिक्त पाण्याच्या नियंत्रणाचे व्यवस्थापन केले जाणार आहे.
५) जनाधार असलेल्या नेत्यालाच शहर जिल्ह्याच्या अध्यक्षपदाची धुरा दिली जाईल खा.प्रणिती शिंदे यांचे संकेत

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# युक्रेन युद्धावर अमेरिकेची रशियाला साथ

◆ **न्यू यॉर्क, २५ फेब्रुवारी**

संयुक्त राष्ट्रसंघात (युनो) युक्रेन युद्धाबाबत ठराव सादर झाला. या ठरावात लष्करी माघार, शत्रुत्व थांबवणे आणि युक्रेनविरुद्धच्या युद्धाचा शांततापूर्ण तोडगा काढण्याचे आवाहन करण्यात आले. या मुद्यावर अमेरिकेची भूमिका सर्वांत महत्त्वाची होती. अमेरिकेने आपल्या मागील भूमिकेत आश्चर्यकारक बदल केला आहे. रशिया-युक्रेन युद्धाला तीन वर्षांचा कालावधी लोटल्यानंतर अमेरिकेने युक्रेनचा ठराव रोखण्याचा प्रयत्न करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

रशिया-युक्रेन संघर्षाला तीन वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त हा प्रस्ताव आला. युक्रेनमधील युद्ध केवळ युरोपच्या शांतता आणि सुरक्षेसाठीच नाही; तर संयुक्त राष्ट्रसंघाचा पाया आणि मूलभूत तत्त्वांसाठीही एक गंभीर धोका आहे, असा इशारा युनोचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी दिला.

संयुक्त राष्ट्रसंघात सादर केलेल्या ठरावाच्या बाजूने ९३ देशांनी मतदान केले. यात जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स आणि जी-७ (अमेरिका वगळता) यासारख्या प्रमुख देशांचा समावेश आहे. रशिया, अमेरिका, इस्रायल आणि हंगेरीसह १८ देशांनी याच्या विरोधात मतदान केले.

भारत, चीन आणि ब्राझीलसह ६५ देशांनी मतदानापासून अलिप्त राहण्याची भूमिका घेतली. मागील तीन वर्षांत रशिया-युक्रेन युद्धाबाबत अमेरिकेने नेहमीच युरोपियन देशांसोबत मतदान केले आहे. या देशाने पहिल्यांदाच वेगळा मार्ग निवडला आहे. अमेरिकेतील हा बदल युरोपियन देशांपासून दूर जाण्याचा संकेत देत आहे. हे अमेरिकेच्या धोरणातील एक मोठे बदल देखील दर्शवते. हा ठराव मंजूर झाल्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने त्याला मान्यता दिली. ◂ (वृत्तसंस्था)

### युक्रेनमधून रशियन सैन्य तत्काळ मागे घेण्याची मागणी

१९३ सदस्यीय जागतिक संघटनेतील एकूण ९३ सदस्यांनी त्याच्या बाजूने मतदान केले, तर १८ सदस्यांनी विरोध केला. भारतासह ६५ सदस्य मतदानाला अनुपस्थित होते. या संस्थेचे प्रस्ताव कायदेशीररीत्या बंधनकारक नाहीत; परंतु ते जागतिक जनमताचे सूचक मानले जातात. मागील ठरावांमध्ये १४० पेक्षा जास्त देशांनी रशियाच्या आक्रमकतेचा निषेध केला होता तसेच युक्रेनमधील चार प्रदेशांवरील ताबा हटवावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.




आसामच्या गुवाहाटी येथे अॅडव्हांटेज आसाम गुंतवणूक परिषद आयोजित करण्यात आली आहे. तिथे भरलेल्या प्रदर्शनाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी भेट दिली

# मणिपूरच्या तीन जिल्ह्यांत १५ शस्त्रे पोलिसांकडे जमा

◆ **इम्फाळ, २५ फेब्रुवारी**

लुटलेली शस्त्रे परत करण्यात यावी, असे आवाहन मणिपूरचे राज्यपाल अजयकुमार भल्ला यांनी केल्यानंतर लोकांनी त्याला प्रतिसाद देणे सुरू केले आहे. मणिपूरच्या तीन जिल्ह्यांतून लुटलेली किमान १५ अग्निशस्त्रे पोलिसांकडे जमा करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी मंगळवारी दिली.

इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील सिंगमाजेई पोलिस ठाण्यात चार अग्निशस्त्रे जमा करण्यात आली. यात एसएमसी कार्बाईन व त्याचे मॅग्झिन, डबल बॅरल बंदूक आणि तीन ग्रेनेड्सचा समावेश आहे. इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील अँड्रो पोलिस ठाण्यात सेल्फ लोडिंग रायफल जमा करण्यात आली. सांग्जोमांग पोलिस ठाण्यात लोकांनी पाच अग्निशस्त्रे जमा केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पूर्व इम्फाळ जिल्ह्यात ९ मिमी व्यासाची पिस्तूल आणि काडतुसेही जमा करण्यात आले. चुराचांदपूर येथे चार अग्निशस्त्रे पोलिसांकडे जमा करण्यात आली.

मणिपुरातील हिंसाचारादरम्यान लुटलेली शस्त्रे लोकांनी सात दिवसांच्या आत स्वतःहून जमा करावी, असा इशारा भल्ला यांनी २० फेब्रुवारी रोजी दिला होता. निर्धारित कालावधीत शस्त्रे जमा करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई केली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले होते.

लुटलेली आणि बेकायदेशीर शस्त्रे परत करण्याची इच्छा असल्यास सात दिवसांचा दिलेला कालावधी पुरेसा आहे. ही मुदत संपताच सुरक्षा दल शस्त्रे मिळवण्यासाठी कारवाई करेल, असे मणिपूरचे मुख्य सचिव पी. के. सिंह यांनी रविवारी सांगितले होते. मागील काही महिन्यांपासून विविध जिल्ह्यांमध्ये बंडखोरांच्या अड्ड्यांवर छापे टाकून शस्त्र आणि स्फोटकांचा साठा जप्त करण्याची व्यापक मोहीम सुरक्षा दलाच्या जवानांनी हाती घेतली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

## ड्रग्ज तस्करांच्या दोन मालमत्ता जप्त

◆ **लुधियाना, २५ फेब्रुवारी**

ड्रग माफियांवर करण्यात आलेल्या मोठ्या कारवाईत, पोलिसांनी दोन अंमली पदार्थ विक्रेत्यांशी संबंधित बेकायदेशीर बांधकामे उद्ध्वस्त केली आहेत. अशा प्रकारच्या ७८ मालमत्ता आहेत आणि कायदेशीर प्रक्रियेनंतर त्या नष्ट केल्या जातील, असे त्यांनी सांगितले.

तलवंडी क्लान गावात सोमवारी रात्री एक बेकायदेशीरपणे बांधलेले घर पाडण्यात आले, तर दुसऱ्या दिवशी दुगरीच्या हिम्मत नगर भागात आणखी एक मालमत्ता पाडण्यात आली.तलवंडी क्लानमधील विध्वंसाबद्दल पोलिसांनी सांगितले की, आरोपी सोनू गेल्या तीन वर्षांपासून अमली पदार्थांच्या व्यापारात गुंतला होता आणि त्याच्यावर सहा खटले आहेत. पंजाब सरकारच्या 'वॉर ऑन ड्रग्ज' मोहिमेंतर्गत ही कारवाई करण्यात आली, असे लुधियानाचे अतिरिक्त पोलिस आयुक्त गुरदेव सिंग म्हणाले. ◂ (वृत्तसंस्था)

# जगातील श्रीमंत देशांची यादी प्रसिद्ध

### भारत पहिल्या १०० मध्येही नाही

◆ **नवी दिल्ली, २५ फेब्रुवारी**

महाशक्ती होण्यासाठी देशाची आर्थिक स्थिती मजबूत असणे आवश्यक आहे. जागतिक बँकेने नुकतेच जगातील श्रीमंत देशाची यादी प्रसिद्ध केली आहे. जागतिक बँकेने दरडोई जीडीपीच्या आधारे ही आकडेवारी जाहीर केली आहे. दरडोई जीडीपी देशाचा आर्थिक विकास किती वेगाने होत आहे हे दर्शवितो. या यादीत भारत १२२ व्या स्थानावर असून, देशाचा दरडोई जीडीपी १०,१६६ डॉलर्स आहे. भारत जगातील पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था आहे. तरीही देशाचा नंबर खाली असण्याचे कारण लोकसंख्येत आहे.

सिंगापूर १४१,५५३ डॉलर्सच्या जीडीपीसह पहिल्या स्थानावर विराजमान आहे. तर १३९,१०६ डॉलर्सच्या जीडीपीसह लक्झेंबर्ग दुसऱ्या स्थानावर आहे. या यादीत कतार १२८,९१९ डॉलरसह तिसऱ्या स्थानावर आहे. आयर्लंड चौथ्या स्थानावर असून, त्यांचा जीडीपी १२४,५७८ डॉलर्स आहे. या यादीत मकाऊ देशाचाही समावेश आहे. मकाऊ ११६,४९१ डॉलर्सच्या जीडीपीसह पाचव्या स्थानावर आहे. नॉर्वेचा जीडीपी १००,६६८ डॉलर्स असून, या यादीत नॉर्वे सहाव्या स्थानावर आहे. बिझनेस हब म्हणून पाहिल्या जाणाऱ्या स्वित्झर्लंडचा जीडीपी ८९,३१५ डॉलर्सवर आहे, ज्यासह हा देश ७ व्या स्थानावर आहे. दक्षिणपूर्व आशियातील ब्रुनेई देशाचा जीडीपी ८५,२६८ डॉलर्स आहे. यासह जागतिक बँकेच्या या यादीत हा देश ८व्या क्रमांकावर आहे. या यादीत अमेरिका ९व्या स्थानावर आहे. अमेरिकेचा जीडीपी ८२,७६९ डॉलर्सवर आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# धनंजय मुंडेची कॅबिनेट बैठकीला दांडीची हॅट्रिक!

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. २५ फेब्रुवारी:**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणामुळे गेल्या अडीच महिन्यांपासून वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या मंत्री धनंजय मुंडे यांनी सलग तिसऱ्या मंत्रीमंडळाच्या बैठकीला दांडी मारली. प्रकृती अस्वस्थ असल्याने बैठकीला गैरहजर राहिल्याचे सांगण्यात आले. मात्र विरोधकांबरोबरच सत्ताधारी पक्षाच्याही रडारवर असल्याने ते उपस्थित राहत नसल्याचे सांगण्यात येत आहे.

मात्र, आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत परळीतील पशुवैद्यकीय महाविद्यालयासंदर्भाने झालेल्या निर्णयावर त्यांनी ट्विट करून मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहे. बीड जिल्ह्यातील परळी येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. राज्य सरकारच्या कॅबिनेट बैठकीत यासंदर्भातील निर्णय झाला. या महाविद्यालयासाठी ५६४.५८ कोटी मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे, बीड जिल्हा व परळी तालुक्यातील नागरिकांसाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय ठरणार आहे.

### परळीतील मेडिकल कॉलेजच्या मंजुरीबाबत मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री आदरणीय अजित दादा पवार, उपमुख्यमंत्री आदरणीय एकनाथराव शिंदे तसेच पशू संवर्धन मंत्री आणि माझ्या भगिनी पंकजाताई मुंडे यांचे मनःपूर्वक आभार, असे त्यात म्हटले आहे. बीडमधील गुन्हेगारीचा म्होरक्या म्हणत वाल्मिक कराडवर गंभीर आरोप झाले असून तो मुंडेंचा निकटवर्तीय असल्याने त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. मात्र, अद्यापही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख व उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंडेंच्या त्याबाबत ठोस निर्णय घेतलेला नाही.

आधी मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि नंतर बेल्स पाल्सी आजाराने ग्रस्त असल्याने धनंजय मुंडे मंत्रिमंडळ बैठका आणि पक्षाच्या कामकाजापासून दूर असल्याचे दिसून येते.




# जास्त लोक कसे आले, फायदा कसा झाला?

**प्रयागराजमध्ये** १४४ वर्षांनी यंदा महाकुंभ आला. आता २०२५ नंतर थेट २१६९ मध्ये महाकुंभ होणार आहे. आताच्या या महाकुंभातून अनेक विक्रम रचले गेले. धार्मिकपासून अर्थव्यवस्थेपर्यंत अनेक गोष्टींना नवीन आयाम दिला गेला. जगभरातील सनातनीच्या असलेल्या लोकसंख्येपैकी अर्ध्या लोकसंख्येने भक्तीची डुबकी महाकुंभात लगावली.

सरकारने महाकुंभ सुरू होण्यापूर्वी ४० कोटी भाविक येण्याचा अंदाज व्यक्त केला होता; परंतु आतापर्यंत ६० कोटी भाविक आले. ही संख्या ६५ कोटींपर्यंत जाऊ शकते. महाकुंभात इतकी गर्दी का वाढली? असा प्रश्न आहे. त्याची मुख्य दोन कारणे आहेत. सोशल मीडियातून झालेला प्रचार आणि १४४ वर्षांनी महाकुंभ येणार असल्याचे बिंबवलेली गोष्ट. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाकुंभ सुरू होण्यापूर्वी सोशल मीडिया क्रिएटर्सची लखनौमध्ये बैठक घेतली. या बैठकीत शंभर पेक्षा जास्त क्रिएटर आले होते. त्यांनी कुंभसंदर्भातील रिल्स, व्हिडीओ आपल्या प्लॅटफॉर्मवर शेअर केले. त्यामुळे महाकुंभाचा विषय समोर आला. कुंभमेळ्याच्या रिल्समधून त्यांनी महाकुंभात सहभागी होण्याचे अपील केले.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे, १४४ वर्षांनी येणारा महाकुंभ होय. २०२५ मध्ये महाकुंभाचा अमृतयोग आला. त्यानंतर असा योग १४४ वर्षांनी २१६९ मध्ये येणार आहे. त्यामुळे आपल्या आधीच्या पिढीला आणि येणाऱ्या पिढीला हा योग मिळणार नाही. त्याचा जोरदार प्रचार केला गेला. डिजिटल माध्यमांनी याचा जोरदार प्रचार केला.

### महाकुंभाकडे लोक का झाले आकर्षित?

महाकुंभ १३ जानेवारीपासून सुरू झाला; परंतु त्याचा प्रचार सहा महिन्यांपूर्वी सुरू झाला. त्यातून देशातील भाविकांना प्रयागराजमध्ये येण्याचे आमंत्रण दिले गेले. सर्वच माध्यमांमधून हा प्रचार केला गेला. तीन कारणांमुळे भाविक महाकुंभाकडे आकर्षित झाले. व्हीव्हीआयपी आणि सेलिब्रिटीसुद्धा महाकुंभात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी याच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आले. उद्योपती मुकेश अंबानी, गौतम अदानी, भूतान नरेश जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक आले. बॉलिवूडमधील अनेक कलाकारांनी भक्तीची डुबकी लावली. मोठे धर्मगुरू बागेश्वर पीठाधीश्वर, देवकीनंदन ठाकूर, सर्व आखाड्यांचे महामंडलेश्वर महाकुंभात आले. ७३ देशांतील राजदूत आणि अनेक आंतरराष्ट्रीय पाहुण्यांनी संगमात स्नान केले.

# तीन हजार कोटींच्या मालकाने घेतला संन्यास

**उत्तरप्रदेशातील** प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुं मेळ्यात दररोज एक ना एक साधू किंवा बाबा बातम्य मध्ये झळकत आहे. याच दरम्यान एक बाबा जोरदार चर्चेत आहेत, ज्यांना लोक 'बिझनेसमन बाबा' असे म्हणत आहेत. हे बाबा चर्चेत आहे; कारण त्यांनी आपली तब्बल तीन हजार कोटी रुपयांची संपत्ती आणि आलिशान जीवन सोडून संन्यासाचा मार्ग स्वीकारला आहे.

आयआयटी बाबा, बुलेट बाबा, रुद्राक्ष बाबा आणि राजदूत बाबा यासारख्या अनेक लोकांनी महाकुंभात आधीच लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. आता बिझनेस बाबांनी त्यांच्या अनोख्या प्रवासाने सर्वांना आश्चय 'चकित केले आहे. पूर्वी ते एक मोठे उद्योगपती होते आणि व्यावसायिक जगात त्यांचे मोठे नाव होते. त्यांच्याकडे महागडी घरे, गाड्या आणि आलिशान जीवनशैली होती; पण एक दिवस त्यांनी अचानक सर्व काही सोडून साधू होण्याचा निर्णय घेतला.



बिझनेसमन बाबा म्हणतात की, भौतिक सुखसोयी त्यांना खरी शांती देऊ शकल्या नाहीत. त्यांनी स्वतःला ज्ञानाच्या शोधात समर्पित केले. आता साधूंच्या परंपरेनुसार बाबा महाकुंभात भगवे कपडे परिधान करताना दिसतात. त्यांचा साधेपणा आणि भक्तिभाव पाहण्य सारखा आहे. महाकुं भाला येणाऱ्या भाविकांमध्ये या बाबांची हटके गोष्ट चर्चेचा विषय बनली आहे. त्यांच्या साधेपणाने आणि त्यागाने लोक खूप प्रभावित होत आहेत. महाकुंभात त्यांचे एक वेगळेच आकर्षण आहे, जिथे लोक त्यांना भेटण्यासाठी आणि त्यांचे अनुभव ऐकण्यासाठी येत आहेत. बाबा म्हणतात की, खरा आनंद संपत्तीत नाही, तर देवाची भक्ती आणि उपासनेत आहे. सोशल मीडियावर त्यांचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत आहेत.



महाशिवरात्रीनिमित्त बुधवारी प्रयागराज महाकुंभात शेवटचे स्नान केले जाणार आहे. अमृत स्नान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पवित्र स्नानात सहभागी होण्यासाठी मोठ्या संख्येत भाविकांचे येणे सुरू झाले आहे

## यावेळी कुंभस्नानाची संधी हुकली?

**प्रयागराजमध्ये** १२ वर्षांतून एकदा महाकुंभ आयोजित केला जातो, तर हरिद्वार, उज्जैन आणि नाशिकमध्ये दर ६ वर्षांनी सामान्य कुंभ आयोजित केला जातो. पुढील कुंभ २०२७ मध्ये नाशिक येथे होणार आहे. यापूर्वी, २०१५ मध्ये नाशिक येथे महाकुंभाचे आयोजन करण्यात आले होते. महाकुंभातील स्नान हे धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. महाकुंभात स्नान केल्याने पापांचा नाश होऊन पुण्य प्राप्त होते, असा समज आहे. .

**पुढचा कुंभमेळा नाशकात**

पुराणांमध्ये आढळलेल्या वर्णनानुसार, समुद्रमंथनातून निघालेल्या अमृत पात्रातील थेंब चार ठिकाणी सांडले. पृथ्वीवरील ही चार ठिकाणे प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक. अमृत कलशातून सांडलेले थेंब प्रयागराजमधील गंगा, यमुना आणि सरस्वती नदी, उज्जैनमधील क्षिप्रा नदी, हरिद्वारमधील गंगा नदी आणि नाशिकमधील गोदावरी नदीच्या संगमात पडले. यामुळे या नद्यांच्या काठावर दर १२ वर्षांनी महाकुंभमेळ्याचे आयोजन केले जाते.

# महाकुंभ मेळ्याचा आज शेवटचा दिवस

**१३ जानेवारीला** सुरू झालेला महाकुंभ बुधवारी समाप्त होणार आहे. त्यानिमित्ताने उत्तरप्रदेश सरकारने चोख नियोजन केले आहे. महाकुंभ परिसरात पूर्णपणे नो झोन व्हेईकल जाहीर करण्यात आला असून, जवळच्या घाटावर जाऊन स्नान करण्याचे आवाहन भाविकांना करण्यात आले आहे.

संपूर्ण महाकुंभ परिसरात मंगळवारी दुपारी चार वाजल्यापासून वाहन प्रवेश बंदी लागू करण्यात आली होती; तर प्रयागराज येथे सायंकाळी सहा वाजल्यापासून हे निर्बंध लागू करण्यात आले. गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या काळात फक्त आवश्यक वस्तूंची सेवा करणाऱ्या वाहनांना वाहतुकीची परवानगी देण्यात आली आहे.

भाविकांनी त्यांच्या प्रवेशद्वार नुसार जवळच उभारलेल्या घाटांवर स्नान करावे. दक्षिणी झुंसी मार्गावरून येणाऱ्यांनी अरैल घाटाचा वापर करावा, तर उत्तरी झुंसी मार्गावरून येणाऱ्यांनी हरिश्चंद्र घाट आणि जुना जीटी घाटाचा वापर करावा.

## चित्रपट

### अनुपम खेर करणार राजकारणात प्रवेश?



**मुंबई** : अनुपम खेर यांनी अलिकडेच अभिनय सोडून राजकारणात येण्याच्या सुरू असलेल्या चर्चांवर प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी आपल्या एक्स हॅंडलवर एका चाहत्याच्या प्रश्नाचे उत्तर देताना लिहिले आहे की, त्यांना केवळ एक चांगला नागरिक म्हणून राहायचे आहे. मात्र, तुम्ही मला एक चांगला सल्ला दिला, त्याबद्दल धन्यवाद. अलिकडेच अनुपम खेर यांचे एक्स अकाऊंट लॉक करण्यात आले होते. त्यांनी स्वतः एका पोस्टमध्ये ही माहिती शेअर केली होती. त्यांच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, ते नुकतेच कंगना राणावतच्या 'इमर्जन्सी' चित्रपटात दिसले होते.

### जयपूरच्या महाराणी गायत्री देवींवर बनणार सीरिज



**मुंबई** : बॉलिवूडमध्ये बायोपिक चित्रपट आणि वेबसीरिजचे युग वेगाने वाढत आहे. आता आणखी एक भव्य प्रकल्प प्रेक्षकांसमोर येणार आहे. महाराणी गायत्री देवींवर बनवली जाणारी एक वेबसीरिज. ही मालिका भारताचा राजेशाही वारसा, बदल आणि एका सशक्त महिलेची कहाणी दर्शविणारी असेल. महाराणी गायत्री देवी केवळ त्यांच्या राजेशाही प्रतिष्ठेसाठीच नव्हे, तर त्यांच्या विचारसरणी, आत्मविश्वास आणि निर्णयांसाठी देखील ओळखल्या जात होत्या. ही केवळ एका राजघराण्याची कहाणी नाही, तर एका महिलेची कहाणी आहे; जिने धैर्य आणि बदलाचे उदाहरण मांडले. या प्रकल्पावर चार वर्षांपासून सखोल संशोधन सुरू आहे. जयपूरच्या राजघराण्याने या वेबसीरिजला हिरवा कंदील दिला आहे आणि प्रत्येक ऐतिहासिक पैलूचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. अद्याप यात मुख्य भूमिका कोणती अभिनेत्री साकारणार हे ठरवण्यात आलेले नाही.

### ४९ वर्षीय सुष्मिता सेनला लग्न करण्याची इच्छा



**मुंबई** : सुष्मिता सेनने अलिकडेच तिच्या इंस्टाग्राम लाईव्ह सत्राद्वारे चाहते आणि फॉलोअर्सशी संवाद साधला. यावेळी तिने लग्नाबद्दलचे आपले विचार मांडले. ती म्हणाली की, तिला लग्न करायचे आहे, पण तिला योग्य जीवनसाथी शोधावा लागेल. खरेतर, इंस्टाग्रामवर लाईव्ह सेशनदरम्यान सुष्मिता सेनने सांगितले की, ती जयपूरमध्ये एका लग्नात सहभागी झाली होती. यावर एका युजरने सुष्मिताला तिच्या लग्नाबद्दल प्रश्न विचारला. त्यावर ती म्हणाली, 'मलाही लग्न करायचे आहे.' मला लग्नासाठी योग्य असा कोणीतरी शोधायला हवा. लग्न असे होत नाही. असे म्हणतात की, मनाचे नाते खूप रोमँटिक पद्धतीने घडते. संदेश हृदयापर्यंत पोहोचला पाहिजे. मी पण लग्न करेन.सुष्मिता सेनने मॉडेल रोहमन शॉलला अडीच वर्षे डेट केले. दोघांमध्ये १५ वर्षांचा फरक होता. दोघेही लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये होते. रोहमनचे सुष्मिताच्या दोन्ही मुली रेनी आणि अलिसा यांच्याशीही खूप चांगले संबंध आहेत. पण, २०२१ मध्ये दोघांचा ब्रेकअप झाला. सुष्मिताने स्वतः एका इंस्टाग्राम पोस्टद्वारे ही माहिती दिली. तिने लिहिले होते, 'आम्ही सुरुवात मित्र म्हणून केली, आम्ही मित्रच राहिलो!' नाते खूप जुने झाले होते... प्रेम अजूनही आहे. पण, तरीही दोघेही अनेक वेळा एकत्र दिसतात.

## अग्रलेख

# फिक्सर आवडे सर्वांना...

महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारमध्ये विशेष कार्यकारी अधिकारी आणि स्वीय सहायकांच्या नियुक्त्या करण्यावरून सुरू झालेल्या चर्चांना पूर्णविराम देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेली 'फिक्सर नेमू देणार नाही' ही भूमिका अत्यंत स्वागतार्ह आहे. ही भूमिका घेतल्याबद्दल फडणवीसांचे अभिनंदन. 'फिक्सर आवडे सर्वांना, दलाल भावे सगळ्यांना' अशी परिस्थिती असतानादेखील अशा प्रकारचा निर्णय घेणारे फडणवीस हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आहेत. त्यांच्या या निर्णयामुळे राज्याचा कारभार आणखी सुधारण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महायुती सरकारमधील काही मंत्र्यांकडून काही विशिष्ट व्यक्तींची आपापल्या आस्थापनांवर ओएसडी किंवा पीए म्हणून नियुक्ती करण्यासंबंधीचे प्रस्ताव पाठविण्यात आले. त्यातील काही प्रस्ताव मुख्यमंत्र्यांनी रोखले किंवा फेटाळले. बहुतांशी नियुक्त्यांना त्यांनी मंजुरी दिली आहे. शासन-प्रशासनात ज्यांना 'फिक्सर' म्हणून ओळखले जाते, ज्यांच्या चौकशा सुरू आहेत, अशांच्या नियुक्त्या मुख्यमंत्र्यांनी केलेल्या नाहीत. त्यावरून त्यांच्याच मंत्रिमंडळातील एका मंत्र्याने थोडा राग दरबारी आळवला खरा; पण त्यालाही मुख्यमंत्र्यांनी दम देऊन गप्प केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दीर्घकाळ राजकारणात आहेत. त्यांना शासन-प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यामुळे त्यांना यातले बारकावे कळतात. कोण बदमाश आहे, हेही त्यांना चांगलेच ठाऊक आहे. मंत्रालयात, विशेषतः मंत्र्यांच्या आस्थापनांवर काम करणारे अनेक ओएसडी किंवा पीए-पीएस हे मुलखाचे बदनाम आहेत. खरे तर 'फिक्सर' हा शब्द त्यांच्यासाठी अंमळ मवाळच म्हटला पाहिजे. त्यांना लावायचे विशेषण 'दलाल' हेच असले पाहिजे. गेल्या तीन-चार दशकांपासून अशा दलालांचेच मंत्रालयात साम्राज्य आहे. बदली, बढती, टेंडर, अकृषक जमिनीचा विषय, भूमी अधिग्रहण, विशेष बाब म्हणून काही कामांना मिळणाऱ्या मंजुरी, सप्लाय, पोषण आहार, खरेदी-विक्री किंवा असे कोणतेही काम सांगा, ते करून देणारी दलालांची पिलावळं ओएसडी आणि पीए-पीएस पदावर विराजमान आहे. सरकारे बदलली, मंत्री बदलले; पण अशा दलालांच्या खुर्च्या मंत्रालयात कायम आहेत. त्यांची दालने बदलली किंवा खाती बदलली एवढीच. हे वास्तव मुख्यमंत्र्यांनी ध्यानात घेतले आणि त्याबद्दल कठोर भूमिका घेतली, हे कौतुकास्पद आणि प्रशंसास्पद आहे.

अशा फिक्सरांची एक मोडस ऑपरेंडी म्हणजे काम करण्याची पद्धत असते. त्यात त्यांचे शासन-प्रशासनातील 'साहेब' बहुतेकदा सहभागी असतात किंवा त्यांची या कामांना मूक संमती असते. आपला हिस्सा मिळाला की, 'साहेब' कानाडोळा करतात, हे अशा फिक्सरांना माहिती असते. तेवढे काम ते निगुतीने करतात. सामान्य माणसांना मंत्रालयात जाणे अवघड आणि प्रवेश मिळालाच तर काम करून घेणे त्याहून अवघड. त्यामुळे दलालीचे नेटवर्क निर्माण झाले आणि वाढले. एखादा मंत्रालयबाह्य दलाल ओळखीतून अशा ओएसडी किंवा पीएकडे येतो. बोलणे होते, सौदा ठरतो. काही रक्कम अग्रिमात दिली किंवा पोहोचविली जाते. साहेबांना त्याची माहिती योग्य वेळी दिली जाते आणि त्यांना त्यांचा वाटाही मिळतो. त्या विषयाची कागदपत्रे या टेबलावरून त्या टेबलापर्यंत नेण्याचे आणि अंतिम मंजुरीसाठी स्वाक्षरी मिळविण्याचे महान कार्य हे 'विशेष' कार्यात निपुण असलेले मंत्रालयीन दलालच करीत असतात. फायनल सेटलमेंटच्या वेळी पुन्हा रक्कम मिळविण्याची व त्याच्या वाटपाची जबाबदारी त्यांचीच असते. यात ते भक्कम मलाई कमावतात. मंत्रालयात पीए-पीएस किंवा ओएसडी राहिलेले व बदनाम झालेले अधिकारी-कर्मचारी कमी नाहीत. अशातल्या काहींच्या चौकशा सुरू आहेत. खरे तर दीर्घ काळ मंत्रालयात पीए-पीएस, ओएसडी म्हणून काम केलेल्या प्रत्येकाचीच चौकशी लावली पाहिजे. त्यातले किमान ५० टक्के भ्रष्ट सापडतील. त्यांच्या मालमत्ता मुंबईत व गावाकडे आहेत. त्यांचे फार्म हाऊसेस आहेत. त्यांच्याकडे आलिशान गाड्यांचे ताफे आहेत. त्यांच्या घरी मोठ्या प्रमाणात सोने-जवाहिरात आहे. त्यांची मुले विदेशात शिकतात. त्यांचे पगार किती आणि त्यांचा खर्च किती, याचा ताळमेळ कुठेच जुळत नाही. त्यांचे लागेबांधे असलेले लोक महाराष्ट्रात सर्वदूर आहे. एकट्या नागपुरातच शोधले तर किमान शंभर एक्सपर्ट दलाल असे सापडतील, की ते मंत्रालयातील कोणतेही काम करून आणू शकतात. त्यांचे मंत्रालयातील या पदासीन दलालांशी साटेलोटे असते. प्रत्यक्षात या दलालांकडे कोणतेही पद नसते. असलेच तर ते किरकोळीचे असते किंवा एखाद्या राजकीय पक्षाचे छूटभय्ये पदाधिकारी म्हणून ते वावरत असतात. प्रत्यक्षात ते व्यवसाय-नोकरी यातले काहीही करीत नाहीत. त्यांच्या उत्पन्नाचा अधिकृत स्रोत नाही. तरीही ते शोफर ड्रिव्हन आलिशान गाडीतून फिरतात. उंची सवयींचे गुलाम असतात. मंत्रालयातील पदासीन दलालांचे ते एजंट असतात. याशिवाय, काही मंत्र्यांनी गतकाळात आणि आताही असे एजंट जागोजागी पेरून ठेवलेले आहेत. तेही अशा कामांत तरबेज असतात. मंत्र्यांचे त्या गावी आगमन झाले की, त्यांची सारी बडदास्त ठेवण्यासाठी जो आगेपीछे करीत असतो, धडपडत असतो, तो त्याचा एजंट असतो, असे बिनधास्त समजावे म्हणतात. याचा अर्थ असा की, फिक्सर्स केवळ मंत्रालयात नाहीत. त्यांनी समस्त महाराष्ट्र व्यापलेला आहे. त्यांनी संपूर्ण व्यवस्था वेठीस धरलेली आहे. सरकारचे कोणतेही कार्यालय असो, तेथे दलाल आहे. तेथे साहेबांचा एजंट असतो. साहेबांचा खास माणूस म्हणून दलाली करणारे लोक आहेत. तेथे ब्लॅकमेलिंग व दलाली असा दुहेरी धंदा करणारे लोकही आहेत. काही तथाकथित पत्रकार किंवा मानवाधिकारवादी किंवा भ्रष्टाचारविरोधी संघटनेचे पदाधिकारी म्हणून वावरणारेही त्यात आहेत. या सर्वांनी मिळून भ्रष्टाचाराला संस्थात्मक व्यवस्थेचे अधिष्ठान दिलेले आहे. पैसा खर्च केल्याविना कोणतेही काम होत नाही. सिटी सर्व्हे किंवा रिअल इस्टेटच्या रजिस्ट्रार कार्यालयात दिवसाढवळ्या लाचखोरी होते. त्यांना त्यांच्या आकांचे संरक्षण असते. कितीही तक्रारी करा, त्यांच्यावर कारवाई होत नाही. भ्रष्टाचार रोखण्यासाठी नेमलेल्या यंत्रणांमध्ये भ्रष्टाचार आहे. आरटीओ, इरिगेशन, रेव्हेन्यू, पीडब्ल्यूडी यांच्याकडून नियमित हप्ते दिले जातात. पोलिसांकडून हप्ते घेणारेही महाभाग आहेत. व्हिजिलन्सची जबाबदारी असलेले लोक भ्रष्ट आहेत. एकूणात संपूर्ण व्यवस्था भ्रष्टाचार व दलालीने सडलेली आहे. ती सुधारण्याच्या दिशेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिले पाऊल टाकले आहे. त्यामुळे त्यांना शासन-प्रशासनातील प्रत्येकाने साथ दिली पाहिजे, अशी अपेक्षा करणे स्वाभाविक आहे. प्रत्यक्षात तसे होण्याची शक्यता यासाठी कमी आहे की, भ्रष्टाचाराच्या माध्यमातून अतोनात पैसा कमावणे हे यापैकी बहुतेकांचे व्यसन आहे आणि त्यामुळे फडणवीस हे त्यांना त्यांचे शत्रू वाटू शकतात. यांत गाव तेथे प्रॉपर्टी असलेले अनेक अधिकारी आहेत. ज्या-ज्या गावात-शहरात त्यांची बदली होते, तेथे ते घर, शेतीवाडी, फार्म हाऊस, किरायाने द्यावयाच्या शोरूम्स अशी प्रॉपर्टी निर्माण करतात. त्यातून त्यांचे वेगळे उत्पन्न सुरू असते. येथे कुणाचेही नाव घेण्याचे कारण नसले, तरी असे अधिकारी अनेकांना परिचित आहेत. ते मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, ठाणे, छत्रपती संभाजी नगर, कोल्हापूर-सोलापूरसह चंद्रपूर-गडचिरोलीतही आहेत किंवा राहिलेले आहेत. या सर्वांनी सामान्य आणि गरिबांच्या नाकी नऊ आणलेले आहेत. मुख्यमंत्र्यांनी आपल्या सहकारी मंत्र्यांच्या स्टाफच्या संदर्भात अशी कठोर भूमिका घेतली असेल तर त्यांनी आता कुणाचीही मुर्वत न करता कारवाईचा रेटा पुढे नेला पाहिजे. यानिमित्ताने सगळ्या शासन-प्रशासन व्यवस्थेची अधिकाधिक स्वच्छता झाली पाहिजे. फिक्सर, सेटर, दलाल यांना ग्रामपंचायतीपासून मंत्रालयापर्यंत कुठेही थारा असता कामा नये. फडणवीस यांच्यात ती धमक आहे. त्यांचा दरारा आहे. त्यांनी आता महाराष्ट्राचे हेडमास्तर झाले पाहिजे. गुंडांना, गुन्हेगारांना त्यांनी जरब बसविली आहे. दलाल-फिक्सर हे तर व्हाईट कॉलर्ड गुन्हेगार आहेत. त्यांना एक दट्ट्या दिला तरी ते सरळ होतील. ज्याच्याबद्दल जरासाही संशय असेल, ज्याच्या विरोधात छोटीशीही तक्रार असेल, त्याची चौकशी लावली पाहिजे. मग तो अधिकारी मंत्रालयातला असो वा गडचिरोलीतल्या कुठल्या शासकीय कार्यालयातला. सरकारी व्यवस्था सुधारायची असेल आणि महायुती सरकारच्या योजनांचे, कार्यांचे लाभ सामान्यांना, गरिबांना व्यवस्थित पोहोचवायचे असतील तर सर्व स्तरांतील अशा दलाल, फिक्सर्स, सेटर्सवर अंकुश आणलाच पाहिजे. काँग्रेसच्या काळापासूनची ही पिलावळं आहे आणि ती भक्कम माजलेली आहे. त्यांचे हात भ्रष्टाचाराने बरबटलेले आहेत. मुख्यमंत्र्यांनी सुरुवात केलीच आहे तर त्यांच्या मागे हात धुऊन लागावे किंवा त्यांना स्वतःहून स्वच्छ होण्यास भाग पाडावे. तसे झाले तर महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्या इतिहासात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल आणि त्यांना सामान्यांची, गरिबांची दुवा मिळेल. मुख्यमंत्र्यांना शुभेच्छा!

## चिंतन

# भारत-अमेरिका : व्यापार धोरणाला नवे वळण

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील बहुचर्चित कूटनीतिक बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीत दोन्ही देशांमधील व्यापार, संरक्षण, स्थलांतर धोरण, जागतिक राजकारण आणि सामरिक भागीदारी यासंदर्भात चर्चा झाली. या चर्चेचा केंद्रबिंदू अमेरिकेच्या आर्थिक आणि सामरिक धोरणांचा प्रभाव भारतावर कसा पडेल, यावर होता. ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' धोरण कायम ठेवत अमेरिकेच्या व्यावसायिक फायद्यांवर भर दिला, तर भारताने आपल्या राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला.

अमेरिका आणि भारत यांच्यात सध्या ४५ अब्ज डॉलर्सची व्यापार तूट आहे. ट्रम्प यांनी हे अंतर कमी करण्यासाठी भारताला एफ-३५ लढाऊ विमाने, तेल, वायू आणि लष्करी उपकरणे विकण्याचा प्रस्ताव दिला. मात्र, भारत सरकारने याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. भारताकडे आधीपासूनच रशियन एसयू-५७ फायटर जेटचा स्वस्त आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम पर्याय उपलब्ध आहे. विशेषतः रशिया हे विमान भारतातच उत्पादन करण्यास तयार आहे, तर अमेरिकेने त्याच्या तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणास नकार दिला आहे. भारत 'मेक इन इंडिया' धोरणांतर्गत संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर बनण्यावर भर देत असल्याने अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर लष्करी उपकरणे आयात करणे भारताच्या संरक्षण धोरणाशी विसंगत ठरू शकते. भारत आणि अमेरिका यांच्यात सह-उत्पादन आणि तंत्रज्ञान हस्तांतरण यावर भर दिला जाऊ शकला असता, पण अमेरिका याबाबत इच्छुक दिसली नाही.

भारत आणि अमेरिकेच्या व्यापार संबंधांकडे पाहता, भारत अमेरिकेतून सुमारे २ लाख कोटी रुपयांच्या मालाची आयात करतो, तर ४ लाख कोटी रुपयांचा माल निर्यात करतो. त्यामुळे २ लाख कोटी रुपयांचा व्यापार नफा भारताच्या बाजूने आहे. ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर अधिक शुल्क लादण्याचा इशारा दिला आणि भारताने अमेरिकन वस्तूंवरील कर कमी करण्यास सांगितले. मोदी सरकारने २०३० पर्यंत भारत-अमेरिका व्यापार दुप्पट करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. भारताने गेल्या काही वर्षांत व्यापार व्यवहारांसाठी डॉलरच्या वापरावर अवलंबित्व कमी करण्यासाठी रुपया-रशियन रुबल किंवा इतर चलनांमध्ये व्यवहार करण्याचा प्रयत्न केला आहे. अमेरिकेच्या दडपशाहीमुळे भारताच्या या धोरणावर काहीसा परिणाम होऊ शकतो. भारताने काही कृषी उत्पादनांवर (जसे की बदाम, अक्रोड आणि डाळी) अमेरिकन निर्यातदारांना काही सवलती दिल्या आहेत, पण अमेरिकेने अजूनही भारतीय कृषी उत्पादनांवर कठोर आयात धोरण ठेवले आहे. भारताने यावर दबाव आणणे अपेक्षित होते.

अमेरिकेत बेकायदेशीररीत्या राहत असलेल्या भारतीय नागरिकांचा प्रश्न चर्चेत आला. ट्रम्प प्रशासनाने यापूर्वी अनेक भारतीयांना परत पाठवले होते; काहींना तर हातकड्या आणि बेड्या घालून पाठवण्यात आले होते, यावर भारताने आक्षेप घेतला. मोदींनी स्पष्ट केले की, योग्य प्रक्रियेनुसार सत्यापन झाल्यास भारत त्यांना परत घेण्यास तयार आहे, परंतु त्यांच्या मानवी हक्कांचे संरक्षण व्हायला हवे. तसेच, एच-१बी व्हिसावर कोणताही स्पष्ट निर्णय झाला नाही; ज्यामुळे भारतीय आयटी व्यावसायिकांसाठी अनिश्चितता कायम आहे. अमेरिकन कंपन्या आणि सरकार भारताच्या डिजिटल डेटा आणि तंत्रज्ञान धोरणावर लक्ष ठेवून आहेत. भारताच्या डेटा संरक्षण कायद्यावर अमेरिकेने नाराजी व्यक्त केली आहे. कारण भारतीय नागरिकांचा डेटा भारतातच साठवण्याचा भारत सरकारचा प्रयत्न आहे.

मुंबईवरील २००८ च्या दहशतवादी हल्ल्याचा मुख्य आरोपी तहव्वूर राणा याला भारतात प्रत्यार्पित करण्याच्या अमेरिकेच्या निर्णयाबद्दल मोदींनी आभार मानले. तसेच, अमेरिका आणि भारत यांनी दहशतवादाविरोधात सहकार्य वाढविण्याचा निर्णय घेतला. भारत आणि अमेरिकेतील वाढती मैत्री 'हाऊडी मोदी' (ह्युस्टन) आणि 'नमस्ते ट्रम्प' (अहमदाबाद) या सार्वजनिक कार्यक्रमांमधूनही दिसून आली. अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापारयुद्ध पुन्हा वाढण्याची शक्यता चर्चेदरम्यान व्यक्त झाली. सध्या अमेरिका-चीन व्यापार संतुलनात चीनचा प्रभाव मोठा आहे आणि त्यामुळे अमेरिकेला २९५ अब्ज डॉलर्सचा तोटा सहन करावा लागत आहे. अमेरिका भारताला चीनविरोधी आघाडीत अधिक सक्रिय सहभागी होण्यास प्रवृत्त करत आहे. अमेरिका आणि भारत यांच्यातील नौदल सहकार्य (मलाबार एक्सरसाईज) आणि भारताच्या अंदमान-निकोबार बेटांचे धोरणात्मक महत्त्व या चर्चेत आले असते तर अधिक व्यापक चित्र स्पष्ट झाले असते. विशेषतः भारत आणि चीन यांच्यातील तणाव लडाखमधील संघर्षामुळे वाढला आहे. ट्रम्प यांनी या संघर्षाला 'दुर्दैवी' म्हटले आणि अमेरिका यात मदत करू शकते, असे सांगितले. भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या देशांनी मिळून तयार केलेल्या क्वॉड युतीचा चीनच्या विस्तारवादी धोरणांवर प्रतिकार करण्यासाठी उपयोग केला जात आहे.



भारत पूर्वी अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर तेल आणि वायू खरेदी करत होता, परंतु रशिया-युक्रेन युद्धानंतर भारताने रशियन तेल स्वस्तात खरेदी करण्यास सुरुवात केली. ट्रम्प यांनी भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला असला, तरी भारत आपली ऊर्जा गरजा स्वतःच्या राष्ट्रीय हितानुसार ठरवेल. इराणच्या चाबहार बंदर प्रकल्पावरील भारताची गुंतवणूकदेखील महत्त्वाची आहे. अमेरिका या प्रकल्पावर नाराज असली, तरी भारताने त्यात पुढे जाण्याचे ठरवले आहे. कारण तो मध्य आशियाशी भारताची थेट जोडणी साधतो.

तैवानच्या मुद्यावर भारताने सावध भूमिका घेतली आहे. अमेरिका भारताला अधिक उघडपणे तैवानच्या बाजूने बोलण्यास प्रवृत्त करत आहे, पण भारताने आपल्या धोरणात संतुलन ठेवले आहे. भविष्यात या मुद्यावर भारताला अधिक स्पष्ट भूमिका घ्यावी लागेल. अमेरिकेत भारतीय वंशाचे अनेक प्रभावी राजकारणी (कमला हॅरिस, विवेक रामास्वामी, बॉबी जिंदाल) आहेत. भारत-अमेरिका संबंध सुधारण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरू शकते, पण त्याबद्दल चर्चा झाली नाही. भारत-अमेरिका संबंध अनेक स्तरांवर विस्तारत आहेत; परंतु काही मुद्दे अजूनही चर्चेत आलेले नाहीत. विशेषतः संरक्षण उत्पादन, तंत्रज्ञान हस्तांतरण, डेटा सुरक्षा आणि कृषी व्यापार यावर अधिक ठोस निर्णय होण्याची गरज आहे. अमेरिकेने आपल्या व्यावसायिक हितांना जास्त महत्त्व दिले, तर भारतानेही आपल्या राष्ट्रीय हितांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला. व्यापार, संरक्षण आणि सामरिक भागीदारी यासंदर्भात काही ठोस निर्णय झाले असले, तरी भारतीय अप्रवासी, एच-१बी व्हिसा आणि करप्रणालीसंदर्भात कोणतीही स्पष्टता मिळाली नाही. भविष्यात भारत-अमेरिका संबंध अधिक दृढ होतील, पण भारत आपली स्वायत्तता टिकवून ठेवत धोरणात्मक निर्णय घेत राहील.

९९८७७४६७७६

## वेध

**गिरीश शेरेकर**

# सोन्याची दरवाढ

भारतात पुरुषांपेक्षा महिलांसाठी सोने जिव्हाळ्याचा विषय आहे. सोन्याचे दागदागिने महिलांना हवेच असतात. आपल्याकडे आजही लग्नकार्यात पाहुणे मंडळी आवर्जून एक प्रश्न विचारतात, तो म्हणजे मुली व मुलीला किती तोळे सोने दिले. त्यावरून प्रतिष्ठेचे अंदाज बांधले जातात. निश्चित परताव्याची हमी असल्याने अनेकांकडून गुंतवणूक म्हणून सोने खरेदी केले जाते. बदलत्या आर्थिक व्यवस्थेत गुंतवणुकीचे अनेक पर्याय उपलब्ध असताना सोन्यावरचा विश्वास थोडासापण कमी झालेला नाही. विशेष म्हणजे सातत्याने दरवाढ होऊन सुद्धा सोने खरेदीत वाढ नोंदविली जात आहे. सोन्याचे दर वाढण्याची अनेक कारणे आहेत. इतिहासात पहिल्यांदाच मध्यवर्ती बँकांनी सलग तिसऱ्या वर्षी १००० टनांपेक्षा जास्त सोने खरेदी केले आहे. सोन्याची मागणी व दर १९४४ पासून सतत वाढत आहे. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे चीन, अमेरिका आपल्या तिजोरीतील ठेवी विकून सोने खरेदी करत आहे. चीन आणि भारतातील सोन्याच्या साठ्याने आतापर्यंतचा उच्चांक गाठला आहे. याशिवाय तुर्की, पोलंड, नेदरलंड आणि पोर्तुगाल देखील त्यांचे सोन्याचे साठे वेगाने वाढवत आहेत. अमेरिकेतील कर्ज संकट आणि महागाईमुळे गुंतवणूकदार हे सोन्याकडे वळत आहेत. कोरोना महामारीनंतर अमेरिकेचे कर्ज १३ ट्रिलियन डॉलर्सने वाढले आहे तर अमेरिकन डॉलरचे मूल्य २५ टक्के कमी झाले आहे. या कारणास्तव गुंतवणूकदार सोन्याला सुरक्षित गुंतवणूक मानत असल्याने दरात दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. मागणी आणि पुरवठा या सूत्राचाही परिणाम दरवाढीवर झाला आहे.

लंडन बुलियन मार्केट सोन्याची किमत ठरवते. मोठमोठे खाणमालक, मोठे उद्योगपती या संघटनेत आहेत. दुसऱ्या बाजूला भारतीय रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत खाली आला आहे. भारतातील सोन्याचे भाव वाढण्यामागचे हे देखील एक कारण आहे. याशिवाय आयात शुल्क, युक्रेन व हमासची युद्धजन्य परिस्थिती आदी कारणांमुळे देखील भाव वधारले आहेत. जगाच्या तुलनेत भारताकडे सोन्याचे साठे अंत्यत कमी आहे. भारत दरवर्षी सरासरी ८०० टन सोने आयात करतो. स्वित्झर्लंड, दक्षिण आफ्रिका, दुबई इत्यादी देशांतून सोन्याची आयात केली जाते. भारतात १९४४ साली एक तोळा सोन्याची किमत फक्त ४४ रुपये होती. १९९५ मध्ये ४ हजार ६८० होती. २००५ मध्ये ७ हजार, २०१० साली १८ हजार ५००, २०१५ मध्ये २६ हजार ३४३, २०१९ मध्ये ३५ हजार २२०, २०२१ मध्ये ४८ हजार ७२१ आणि २०२५ मध्ये एक तोळा सोन्याची किमत ८५ हजार ५८० आहे. गेल्या पाच वर्षात सोन्याचे भाव दुपटीने वाढले आहे. वर नोंदविलेली कारणेच त्यासाठी कारणीभूत आहेत. दरवाढ होत असली तरी क्षमतेनुसार सर्वांचीच सोने खरेदी सुरू असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. यातील मोजकेच खरेदीदार हे लग्नकार्यातील आवश्यकता म्हणून तर उर्वरित गुंतवणूक म्हणूनच सोने खरेदी करतात.

जागतिकस्तरावर सोन्याच्या साठ्यावरून एखाद्या देशाच्या आर्थिक ताकदीचा अंदाज बांधला जातो. अमेरिकेकडे सर्वाधिक सुवर्णसाठा असल्याने त्याची आर्थिक ताकद सर्वाधिक मानली जाते. जगात अस्थिरता निर्माण झाल्यावर सोन्याकडे महत्त्वाचे साधन म्हणून पाहिले जाते. सोने केवळ अमूल्य धातू नसून, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक स्थिरतेसाठी महत्त्वाचा घटक आहे. १८ व्या शतकापासून सोने हे जागतिक अर्थव्यवस्थेचा अविभाज्य भाग राहिले आहे. अनेक देशांनी त्यांचे चलन सोन्याच्या साठ्याशी निगडित ठेवले होते. २० व्या शतकामध्ये तर अनेक देशांनी त्यांचे चलन सोन्याच्या मूल्याशी निगडित ठेवले होते. या प्रकारास 'गोल्ड स्टॅण्डर्ड' म्हणतात. एखाद्या देशावर आर्थिक संकट आल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारात सोन्याचा साठा उपयोगी पडतो. कर्ज मिळवण्यासाठी सोन्याचा उपयोग होतो. जगभरात २.४४ लाख मेट्रिक टन सोने उपलब्ध आहे. यापैकी १ लाख ८७ हजार मेट्रिक टन सोन्याचे उत्पादन झाले असून ५७ हजार मेट्रिक टन सोन्याचे अद्याप उत्खनन व्हायचे आहे. चीन, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेतील खाणींमध्ये सर्वाधिक सोने आढळून आले आहे. सोन्याचा सर्वाधिक साठा असलेले एकूण २० देश आहे. त्यात अमेरिका पहिल्या स्थानी आहे. त्या खालोखाल जर्मनी, इटली, फ्रान्स, रशिया, चीन, जपान अनुक्रमे आपल्या स्थानावर आहे. भारत ८४०.७६ टनासह आठव्या स्थानावर आहे. भविष्यात भारतासह इतर देशांच्या साठ्यातही वाढ होणारच असून प्रतिष्ठा म्हणून साठ्याची स्पर्धा होणार आहे. एका अंदाजानुसार सोने पुढच्या काळात १ लाखापर्यंत पोहोचण्याची शक्यता वर्तविली जात आहे. ही शक्यता लक्षात घेऊनच आताच्या सोने खरेदीकडे पाहिले जात आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# मांडूक्योपनिषद - ओंकार स्वरूपाचे दर्शन!

**दिलीप जोशी**

दशोपनिषदातील सर्वांत लहान कलेवर असलेला सर्वांत महान उपनिषद म्हणजे मांडूक्य उपनिषद आहे. हे उपनिषद अथर्ववेदांतर्गत असून या उपनिषदाचे केवळ बारा मंत्र आहेत. खरं म्हणजे ते उपनिषदात आहेत म्हणून मंत्र; प्रत्यक्षात ती बारा वाक्येच आहेत. गद्यात असलेला हा उपनिषद आहे. आद्य शंकराचार्यांचे गुरू श्रीश्री गोविंदपादाचार्य आणि त्यांचे गुरू श्रीश्री गौडपादाचार्य यांनी या बारा मंत्रांवर २१५ श्लोकांची प्रथम कारीका लिहिली. यावरून या उपनिषदाचे महत्त्व लक्षात येईल. ज्यांना मोक्ष पाहिजे त्यांनी हा उपनिषद अभ्यासावा. 'मुक्तै मांडुक्य एव अलम्' मुक्तीसाठी मांडूक्य उपनिषद एकमेव आहे, असे विद्वान म्हणतात. या उपनिषदाचे कर्ते ऋषी मांडूक्य ऋषी आहेत.

याबाबत विविध मतप्रवाह आहेत. त्यातील एका मतानुसार एकदा पृथ्वीवर प्रचंड दुष्काळ पडला तेव्हा महर्षी वशिष्ठांनी वृष्टिसूक्त लिहिले आणि त्या सूक्ताने ते ईश्वराची आराधना करू लागले. एक दिवस आराधनेनंतर त्यांना जमिनीतून आवाज येऊ लागला. त्यांच्या लक्षात आले की, हा आवाज मंडूक म्हणजे बेडकाचा आहे. बेडूक शीतकाल समाधीत म्हणजे उन्हाळ्यात स्वतःला गाडून घेतो आणि पाऊस येण्याची वेळ आली की, तो विशिष्ट आवाज करतो. महर्षी वशिष्ठांना तो शुभसंकेत आणि अनुष्ठानाला अनुमोदन वाटले. त्यांनी त्या मंडुकाला आशीर्वाद दिला कील तुझ्या कुळात किंवा तुझ्या नामाचा द्रष्टा ऋषी जन्माला येईल. त्यातून मांडूक्य ऋषींचा जन्म झाला, ज्यांनी मांडूक्य उपनिषदाचे निर्माण केले.

दुसरा प्रघात असा की, बेडूक उड्या मारत दोन-चार उड्यातच स्थान गाठतो. या उपनिषदात केवळ १२ मंत्रात विश्वाचे आर्त प्रकट केले आहे. मंडुकासम विषय प्रतिपादित केला. याला मंडूक न्याय म्हणतात. म्हणून मांडूक्य उपनिषद.

अजून एक प्रवाह असाही आहे की, बेडूक पाण्यात अंडी घालतो. त्यातून माशासारखी पिले (टॅड पोल्स) पाण्यात असतात, ज्यांना माशासारखी शेपूट आणि तुरा असतो. पुढे ते आपली शेपटी आणि डोक्यावरचा तुरा काढून टाकतात आणि मग बेडूक रूपात उभयचर बनतात. शास्त्रात संन्यास धर्म शेंडी काढून, अहंकारादी उपाध्या टाकून मंडुकासारखे स्वतःला समाधीत गाडून घेण्याची तयारी ठेवण्याची वृत्ती हा उपनिषद सांगतो म्हणूनही हा मांडूक्य उपनिषद. ऋषी मांडूक्य याचे कर्ते ऋषी हे आपण लक्षात घेऊ.

या उपनिषदात ओंकाराचे विराट स्वरूप विशद केले आहे. या उपनिषदाची सुरुवातच ओंकार या आदिबीज शब्दब्रह्माने केली आहे.

ॐ इत्येतदक्षरमिदं सर्वं तस्योपव्याख्यानं
भूतं भवद्भविष्यदिति सर्वमोङ्कार एव ।
यच्चान्यत् त्रिकालातीतं तदप्योङ्कार एव ॥

ॐ नावाचे अक्षर जगातील सर्वांत आद्य असून ते भूत-भविष्य-वर्तमानाच्या पलीकडले आहे. ते त्रिकालत्रयातीत आहे. संत ज्ञानेश्वर माउलींनी-

अकार चरण युगुल, उकार उदर विशाल ।
मकार महामंडल, मस्तकाकारे ।
हे तिन्ही एकवटले, तेथ शब्दब्रह्म कवळले ।
ते मियां गुरुकृपा नमिले, आदिबीज ।

ओंकाराला शब्दब्रह्म, आदिबीज आणि परमात्म्याची अक्षर मूर्ती म्हटले आहे.

सर्वं ह्येतद्ब्रह्मायमात्मा ब्रह्म सोऽयमात्मा चतुष्पात् ॥

हे ओंकारच ब्रह्म आहे. आत्मा आणि परमात्माही हेच ब्रह्म आहे. तो चतुष्पाद म्हणजे चार पायांचा आहे.

जागरितस्थानो बहिष्प्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः
स्थूलभुग्वैश्वानरः प्रथमः पादः ॥

जागृती अवस्थेत त्याची चेतना बाह्य बाबींकडे झुकलेली असते. त्याला सात अंग, एकोणवीस मुखे आणि स्थूल विषय वास्तूंचा अनुभव असलेला आहे. त्याचा पहिला पाय वैश्वानर आहे. हाच वैश्वानर ओंकारातील अ कार आहे.

स्वप्नस्थानोऽन्तःप्रज्ञः सप्ताङ्ग
एकोनविंशतिमुखः प्रविविक्तभुक् तैजसों द्वितीयः पादः ॥

या आत्म्याची दुसरी अवस्था स्वप्नावस्था आहे, ज्याची चेतना अंतर्मुख आहे. विषय सूक्ष्म असून तेजस नावाचा दुसरा पाय आहे. हा तेजस म्हणजे ओंकारातील उ कार होय.

यस्मिन् सुप्तः न कञ्चन कामं कामयते
न कञ्चन स्वप्नं पश्यति तत् सुषुप्तम् ।
सुषुप्तस्थानः एकीभूतः प्रज्ञानघनः
एवाऽऽनन्दमयो ह्यानन्दभुक् चेतोमुखः प्राज्ञस्तृतीयः पादः ॥

आत्म्याची तिसरी अवस्था सुषुप्ती आहे. इथे चेतना घनिभूत, आनंदमयी आहे. प्राज्ञ हा तिसरा पाय असून प्राज्ञ हा ओंकाराचा म कार आहे.

एष सर्वेष्वरः एष सर्वज्ञः एषोऽन्तर्याम्येष
योनिः सर्वस्य प्रभवाप्ययौ हि भूतानाम् ।
नान्तः प्रज्ञं न बहिष्प्रज्ञं न उभयतः प्रज्ञं न प्रज्ञानघनं न प्रज्ञं नाप्रज्ञम् ।
अदृष्टम् अव्यवहार्यमग्राह्यमलक्षणं
अचिन्त्यमव्यपदेश्यमेकात्म प्रत्ययसारं प्रपञ्चोपशमं
शान्तं शिवमद्वैतम् चतुर्थं मन्यन्ते स आत्मा स विज्ञेयः ॥

आत्म्याची चौथी अवस्था म्हणजे तुरिया अवस्था, ज्यात चेतना ना आत आहे ना बाहेर, जी जाणता आहे ना नेणता. जिची इंद्रियाद्वारे अनुभूती नाही. प्रपंचरहित शांत, शिव, अद्वैत हाच त्याचा चौथा पाय.

सोऽयम-आत्मा अध्यक्षर-ओंकारो धीमत्रं
पद मात्रा मात्राश्च पद अकार उकारो मकर इति वे चार

हा ओंकार जागृती, स्वप्न, सुषुप्ती म्हणजे अ, उ, म असला तरी तो शुद्ध चेतन आहे. या सर्व अवस्थांच्या पलीकडली अवस्था म्हणजे चौथी तुरिया अवस्था होय. या अवस्थेची अनुभूती घेता आली पाहिजे.

खरं सांगायचं तर मांडूक्य उपनिषद हे करा! हे करू नका ! हे काहीही सांगत नाही तर हे उपनिषद फक्त परब्रह्माचे स्वरूप सांगते. दृवरूप ज्ञानावरूनच आपल्याला त्याच्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग सोपान आहे. तसे सर्वच उपनिषदात ओंकार माहात्म्य सांगितले, पण मांडूक्य उपनिषद परमेश्वराचे ओंकार स्वरूप सांगून ओंकारच परमात्म्याचे मूळ नाव आहे, ओंकारच मोक्ष मार्ग आहे, असे प्रतिपादन करतात. अ उ म या तीन अक्षरातच सर्व संसार सामावला असून ॐ म्हणजेच ब्रह्मांड आहे. ॐ चे विस्तारीकरण म्हणजेच ब्रह्मांड असल्याचे मांडूक्य उपनिषद सांगतो.

सर्व उपनिषदांपैकी हा उपनिषद असा आहे की, ज्यावर सर्वांत प्रथम मांडूक्य कारीका हे भाष्य आदिशंकराचार्यांचे प्रगुरू म्हणजे गुरूंचे गुरू गौडपादाचार्यांनी लिहिले. असा हा महत्त्वाचा उपनिषद आहे. 'अणुपासोनी ब्रह्मांडा एवढा' म्हणजे मंत्र अणूप्रमाणे केवळ १२ आहेत; पण विचार ब्रह्मांडाएवढा प्रचंड आहे .म्हणून हा उपनिषद मोक्षदायी आहे म्हणून तो अभ्यासावा.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### कॉपी बहाद्दरांना शिक्षा हवी

सध्या दहावी-बारावीच्या परीक्षा सुरु आहेत. या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडाव्यात म्हणून, प्रशासन विशेष मोहीम राबवीत आहे. बैठी आणि भरारी पथके नेमली आहेत, पण ही मोहीम चक्क मोडीत काढून कॉपी बहाद्दर बिनधास्तपणे कॉफी करताना आढळून येत आहेत. २१ तारखेला दहावीच्या मराठी पेपरला मोठ्या प्रमाणात कॉपी झाल्याचे वृत्त आहे. संभाजी नगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील एका उच्च माध्यमिक विद्यालयात बारावीच्या गणित विषयाला सामूहिक कॉपीचा प्रकार उघडकीस आला आहे. जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीणा यांना हा प्रकार समजल्यावर त्यांनी कारवाईला सुरुवात केल्याचे कळते. परीक्षा केंद्रातील पथकच अशा निंद्य प्रकाराला खतपाणी घालीत असल्याचे आढळून आले आहे. असे प्रकार कमी अधिक प्रमाणात जिथे सुरू असतील त्या ठिकाणी प्रशासनाने अधिक लक्ष घालावे. अशा शाळा-महाविद्यालयांवर नुसता गुन्हा दाखल न करता कॉपी करणाऱ्यांवर व त्याला खतपाणी घालणा यांवर कडक कारवाई करावी, तरच इतरांवर जरब बसेल.

म्हातारी मेल्याचं दुःख नाही; पण काळ सोकावतो आहे, म्हणून यातून कोणाचीही सुटका होऊ नये, कारण ही शिक्षण क्षेत्राला लागलेली एक कीड आहे.

अरुणकुमार धुमाळ/ ९८९०९०२९२३

●● ●●

### शिवपूजेत कापूर आणि भस्माचे महत्त्व

आज महाशिवरात्र आहे. भगवान शिव रात्रीच्या एका प्रहरी विश्रांती घेतात. त्या प्रहराला, म्हणजे शंकराच्या विश्रांती घेण्याच्या काळाला 'महाशि वरात्री' असे म्हणतात. महाशिवरात्रीच्या दिवशी भगवान शिवाची पूजा विशेष विधीने केली जाते. या पूजेत भस्म आणि कापूर यांना महत्त्वाचे स्थान आहे.

भस्म आणि कापूर यामध्ये लयाशी संबंधित शक्ती अधिक प्रमाणात कार्यरत असते. भगवान शिव हे लयाचे देवता असल्यामुळे त्यांच्या उपासनेत या दोन्ही घटकांचा उपयोग केला जातो. शिवपिंडी किंवा शिवमूर्तीवर भस्माचे तीन आडवे पट्टे लावले जातात. यामुळे वायू आणि आकाश या स्तरांवरील निर्गुण शिवतत्त्व लवकर आकृष्ट होते. भस्माचे पट्टे लावल्यामुळे मूर्ती किंवा पिंडी यामध्ये जागृत झालेले शिवतत्त्व वातावरणात लवकर मिसळून सर्वत्र पसरते. शिवपिंडीला भस्म लावल्यामुळे पिंडीतील शक्तीचा लाभ भाविकांना होतो. तसेच, शिवतत्त्व वातावरणात पसरल्याने संपूर्ण परिसर सात्त्विक आणि पवित्र बनते. त्यामुळे महाशिव त्रीच्या दिवशी शिवपूजेत भस्म आणि कापूर यांचा वापर करणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

वर्षा आवदे/ नागपूर

●●●●

### पांढरपेशा दरोडेखोरांवर लगाम हवी!

विमान आस्थापनाने वाढवलेले अव्वाच्या सव्वा भाडे असे दर्शवते की, महाकुंभ आयोजित केला तो फक्त यांच्या फायद्यासाठी. महाकुंभाच्या काळात, मकर संक्रांतीच्या दिवसांमध्ये जेवढे जास्त दान करू त्याचा जास्तीत जास्त लाभ आपल्या स्वतःच्या उन्नतीसाठी होतो. हा आध्यात्मिक भाग तर दूरच परंतु या संधीचा कसा फायदा उचलून स्वतःची व्यावहारिक प्रगती करता येईल या स्वार्थी विचाराने ग्रस्त या आस्थापनांनी देशातून कुठल्याही भागातून प्रयागराजला जाणाऱ्या विमानाचे तिकीट दुप्पट, तिप्पट प्रमाणात वाढवले आहे. विदेशात जाणे कमी खर्चाचे परंतु भारतातल्या भारतात कुंभमेळ्याला जाणे मात्र खर्चीक करून ठेवलेले आहे. रेल्वेचे आरक्षण पूर्ण झाल्यामुळे भाविकांना विमानाने जावे लागत आहे. परंतु त्यांच्या या अडचणीचा गैरफायदा घेणारे, प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणारे नव्हेत का, अशी संधिसाधू वृत्ती महाकुंभासारख्या पर्वासाठी असणे चुकीचे नाही का, याचे चिंतन अशा आस्थापनाने नक्की करावे. सरकारने दखल घेतल्यानंतरसुद्धा त्यांनी प्रवासाचे भाडे कमी करणे उचित समजले नाही, अशा आस्थापनांचा देशाला काय उपयोग? त्यांच्यावर कारवाई संबंधित मंत्रालयाकडून होणे अपेक्षित आहे. हिंदूंच्या पर्वकाळात त्यांना ठगवणारी ही आस्थापने हिंदूद्रोही आहेत असे वाटले.

**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/ ९४२१७७३९९९

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त

### उसने दिलेले पैसे मागितल्याने लोखंडी रॉडने मारहाण

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी -**

हात उसने दिलेले पैसे परत मागितल्याने लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केले. हा प्रकार सोलापूर विद्यापीठांसमोरील रस्त्यावर १९ फेब्रुवारी रोजी रात्री ११:४५ च्या सुमारास घडला.सचिन अर्जुन शिरसट ( वय ३२, या. भोगाव तालुका उत्तर सोलापूर) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. घटनेच्या दिवशी रात्री ११:४५ सुमारास फिर्यादी हा मित्र जयपाल सोबत रिक्षातून सोलापूरकडे येत होता. दरम्यान विद्यापीठांसमोरील रस्त्यावर रिक्षा थांबून फिर्यादी लघुशंकेसाठी थांबला होता. त्यावेळी यातील आरोपी तेथे आले. तेव्हा फिर्यादी सचिन याने यातील आरोपीला हात उसने दिलेले ३ हजार ५०० रुपये परत मागितले. त्यावर चिडलेल्या अश्विनी कांबळे या महिलेने पैसे परत देणार नाही असे म्हणून शिवीगाळ करत दमदाटी केली. त्यावेळी महिलेसोबत असलेल्या राहुल शिंदे व इतर दोन यांनी फिर्यादीस मारहाण केले. दरम्यान आरोपींसोबत असलेल्या अनोळखी व्यक्तीने त्याच्या दुचाकीस असलेला लोखंडी रॉड काढून फिर्यादीच्या डोक्यात मारून जखमी केले. याबाबत सचिन शिरसट यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अश्विनी कांबळे, या राहुल शिंदे व इतर अनोळखी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास हवालदार घुगे करत आहेत.



# सोलापूर विद्यापीठाला उपविजेतेपद

### उत्कर्ष महोत्सव : ललित कला विभागात मिळाले सर्वसाधारण विजेतेपद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झालेल्या राज्यस्तरीय उत्कर्ष महोत्सवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने सहा बक्षीस जिंकत सलग दुसऱ्यांदा सर्वसाधारण उपविजेतेपद पटकाविले. ललितकला विभागात सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. सलग दोन वर्षे उत्कर्ष महोत्सवात सोलापूर विद्यापीठाची चमकदार कामगिरी राहिली आहे. एकूण १९ विद्यापीठात झालेल्या या महोत्सवात विद्यापीठाने विविध कला प्रकारात बक्षीसांचीची लय लूट करत आपली मोहोर उमटविली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दरवर्षी उत्कर्ष महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यंदाच्या वर्षी पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे उत्कर्ष महोत्सवात राज्यातील एकूण १९ विद्यापीठांनी सहभाग नोंदवला. यंदाही वर्षी कमी वेळेत सोलापूर विद्यापीठाने उत्कृष्ट अशी कामगिरी करत सलग दुसऱ्या वर्षी उपविजेतेपद पटकाविले. विद्यापीठाच्या परिसरात विद्यापीठाचा सराव शिबिर घेण्यात आला होता. संघाला सराव करण्यासाठी कमी वेळ मिळाला. त्यामुळे अवघ्या दोन गुणांनी सर्वसाधारण विजेतेपदाने हुलकावणी दिली. त्यामुळे विद्यापीठाने संघाला सरावासाठी जास्तीत जास्त वेळ द्यावा अशी मागणी ही प्रशिक्षक संघप्रमुख व राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी -विद्यार्थिनी करीत आहेत. विजेत्या टीमचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, कुलसचिव योगिनी घारे, प्र-कुलगुरू लक्ष्मीकांत दामा, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक राजेंद्र वडजे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक, जिल्हा समन्वयक विरभद्र दंडे यांनी अभिनंदन केले आहे. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. धनंजय मोगले, संघप्रमुख प्रा.पंकज पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ, सहप्रशिक्षक विशाल चव्हाण, मनोज अंकुश, आकाश साठे यांनी काम पाहिले.

**कामगिरी :** फोटोग्राफी (प्रथम), भारतीय लोककला (प्रथम), पथनाट्य (द्वितीय), भारतीय लोकवाद्य (द्वितीय), वक्तृत्व (तृतीय), निबंध (तृतीय).

#### कलाकारांच्या श्रमाचे यश

अनेक अडथळ्यांची शर्यत पार करत आम्ही सर्वसाधारण उपविजेतेपद मिळवू शकलो. त्यासाठी कलाकारांनी घेतलेले श्रम, संचालकांनी दिलेले स्वातंत्र्य यामुळे सलग दुसऱ्यांदा उपविजेतेपद मिळाले.

**- प्रा.पंकज पवार**
**संघप्रशिक्षक, सोलापूर विद्यापीठ**

#### कमी वेळात कामगिरी

उशिरा झालेला पत्रव्यवहार, मिळालेला कमी वेळ, कमी प्रतिसादा अभावी २ वेळा घ्यावी लागलेली निवड चाचणी अशा आव्हानाचा पाठलाग करत सर्वसाधारण उपविजेतापदावर सलग दुसऱ्यांदा राष्ट्रीय सेवा योजनेच्या कलाकारांनी नाव कोरले.

**- राजेंद्र वडजे, संचालक,**
**राष्ट्रीय सेवा योजना**

मनोरमा परिवार अंतर्गत

## ट्रीन सिटी अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर

विमल कॉम्प्लेक्स, माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर

### ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर

६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर

९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क : ०२१७२३०३३१२

दिपक सुरवसे, चेअरमन (९१७५१८३६९९) | नितीन भोसले, व्हा. चेअरमन (९८८१५१५५३३) | दिपमाला जाधव, व्यवस्थापिका (मो.८३२९२८७३१२)

### जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाण किरकोळ अर्ज नं. १७/२०२५

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर साहेब यांचे न्यायालयात**

१) **स्वयम सचिन मेहता, वय- १२ वर्षे, (अज्ञान)**
धंदा- शिक्षण, रा. खानापुर रोड, सोमवार पेठ,
बार्शी ता. बार्शी, जि. सोलापुर

२ ) २) **कौशिक सचिन मेहता, वय- १७ वर्षे, (अज्ञान)** -- अर्जदार
धंदा व रा. सदर

३) **श्रीमती. प्रिती सचिन मेहता,**
वय- ४३ वर्षे, धंदा- घरकाम रा. सदर स्वतः करिता व
अर्जदार नं. १ व २ चे अ.पा.क. आई म्हणुने

**विरुध्द**

**महाराष्ट्र शासन (यांचे समन्स/ नोटीस सहाय्यक सरकारी अभियोक्ता बार्शी यांना बजावण्यात यावे)** -- सामनेवाला

याअर्थी, यातील अर्जदार यांनी मौजे बार्शी येथील शेतजमिन गट नं. ८९९/१/ब पैकी पैकी उत्तरेकडुन मधील बाजुचे क्षेत्र ०० हे ११ आर तसेच गट नं. १२९६/१/अ/२ पैकी क्षेत्र ०० हे २३.४६ आर या क्षेत्रापैकी अर्जदार यांचे १/२ हक्क हिस्याच्या अज्ञानाच्या शेतजमिनी विकणेकामी परवानगी मिळणेसाठीचा अर्ज मे. कोर्टात आणलेला असुन सदर शेतजमिनी विक्री करणेकामी कोणाची कोणत्याही प्रकारचा हरकत असेल तर किंवा सदर मिळकतीसंबंधी कोणताही खरेदी, विक्री, गहाण, दान, बोजा, लिज, चोळी, बांगडी, पोटगी, अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध व हरकत असेल तर सदर प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख दि. १/०४/२०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी. त्याअर्थी, कोणाचेही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदर शेतजमिन विक्री करणेबाबत परवानगी देण्यात येईल. कळावे. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता. २५/०२/२०२५

सही/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी

# सराईत गुन्हेगार हिरा गुंजले दुसऱ्यांदा कारागृहात स्थानबध्द

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी -**

अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशन हद्दीतील सराईत गुन्हेगार हिरा उर्फ पुरुषोत्तम उर्फ मलप्पा गुंजले (रा. ब्यागेहळी रोड, अक्कलकोट, जि. सोलापुर) यास दुसऱ्यांदा एमपीडीए कायद्यान्वये कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिले.

हिरा गुंजले हा शरिराविषयक व मालाविषयक गंभीर गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार आहे. तो मागील अनेक वर्षांपासून त्याची दहशत व भिती राहावी याकरीता नागरीकांशी गुन्हेगारी वर्तन करत होता. त्याच्या विरूध्द खंडणी मागणे, इच्छापुर्वक दुखापत पोहोचवणे, अवैधरित्या हत्यार बाळगणे, अश्या स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यास यापवुर्वी सन २०१६ मध्ये व २०१९ मध्ये महाराष्ट्र पोलीस अधिनियमान्वये हद्दपार करण्यात आले होते. त्यानंतर २०२२ मध्ये अंतर्गत स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आलेली होती. स्थानबध्दतेतुन मुक्तता झाल्यानंतर पुन्हा त्याने त्याचे गुन्हेगारी कृत्य चालुच ठेवून अक्कलकोट येथील ट्रॉली चालकाकडे खंडणी मागून जिवे ठार मारण्याची धमकी दिल्यानेत्याच्याविरूध्द गंभीर गुन्हा दाखल झाला आहे. अश्या स्वरूपाचे गुन्हेगारी कृत्य करुन हिरा गंजुले याने परिसरात दहशत व भिती निर्माण करुन सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण करून स्वतःस धोकादायक इसम म्हणून सिध्द केले होते. याकरीता पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाम ध्ये एम.पी.डी.ए. अंतर्गत कारवाई बाबतचा प्रस्ताव जिल्हादंडाधिकारी यांच्या कार्यालयास पाठविण्यात आला होता. जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी गुन्हेगार हिरा उर्फ पुरषोत्तम गंजले याचेवर दाखल असलेले गुन्हे व त्याचे गुन्हेगारी वर्तन पाहुन त्याच्यावर वेळीच प्रतिधंक करण्यासाठी अधिनियम अन्वये १ वर्षाच्या कालावधी करीता पुणे येथील येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे स्थानबध्द करण्याचे आदेश दिल्याने त्यास स्थानबध्द करण्यात आले आहे. ही कारवाई जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर, निवासी उपजिल्हादंडाधिकारी श्रीमती मनिषा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर, अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राजेंद्र टाकणे, सहायक फौजदार निलकंठ जाधवर, हवालदार अनिस शेख, रमजान पाटील, अनभुले, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचे नायब तहसिलदार बालाजी बनसोडे, व विलास म्हैत्रे यांनी केली.





### मराठा समाजाचा आज वधू वर परिचय मेळावा

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

भारतीय मराठा महासंघ, शिवश्री प्रतिष्ठान सोलापूर व सकल मराठा वधूवर सूचक केंद्र औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.२६) शिंदे चौकातील शिवस्मारक हॉलमध्ये वधू-वर मेळावा होईल. हा मेळावा सकाळी ११ ते ३ यावेळेत होईल. संपर्क : ९८९०१६९८३०/९३७०३६९९०

### CHANGE IN NAME

I am changing my name from PATEL SIDRAH MD SAJID to SHAIKH SIDRA JAHAN SALMAN for passport issuance.

### जाहीर समन्स

एस.व्ही. गेंट्याल ॲडव्होकेट
आर.टी.एस.अपील नं.३२०/२०२१

**सोलापूर येथील मे.उपविभागीय अधिकारी क्र.१ सो यांचे न्यायालयात**

**आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित तर्फे कर्मचारी श्री. सतीश रामचंद्र शिंदे**
वय - ४० वर्षे, धंदा- नोकरी,
रा.१५४, गोल्डफिंच पेठ, आर्यनंदी भवन, -- अर्जदार
सावरकर मैदान समोर, नवी पेठ, सोलापूर

**विरुद्ध**

१ ) **श्री. समाधान विष्णूपंत ननवरे**
रा.बी.बी.दारफळ, ता.उ.सोलापूर, जि. सोलापूर

२) **श्री.किसन निवृत्ती जानकर**
रा.बेलाटी, ता.उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

३ ) **श्री. विष्णू लिंबाजी ननवरे** -- सामनेवाला
रा.बी.बी.दारफळ, ता.उ.सोलापूर, जि. सोलापूर

४) **श्री. राजू बाबा परळकर**
रा.गणपती घाट, उत्तर कसबा, सरस्वती मंदिर शेजारी, दत्त चौक, सोलापूर

ज्याअर्थी अर्जदाराने हल्लीचे अपील मा. मंडळ अधिकारी यांनी दि.१६/०१/२०१८ रोजी पारीत केलेल्या आदेशा विरुध्द अपील केलेले आहे. तुम्हांस वारंवार समन्स काढूनही सदरचे समन्स न बजावता परत आले आहे.

त्याअर्थी या लेखावरुन असे कळविण्यात येते की, सदरहू अर्जदाराचे अपीलाबाबत तुमचे काही म्हणणे असल्यास तुम्ही याकामी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत म्हणजे तारीख ०६/०३/२०२५ रोजी कोर्टात सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहून लेखी म्हणणे/कैफियत द्यावी.

याप्रमाणे मुदतीत तुमची कैफियत न दिल्यास तुमची काही तक्रार नाही असे समजून दाव्याचा निकाल केला जाईल व मागूनही तुमची कसलीही तक्रार चालणार नाही.

माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिले. दिनांक २४/०२/२०२५

सही/-
लिपीक

शिक्का

सही/-
अधिक्षक
उपविभागीय अधिकारी क्र.१
सोलापूर

### जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाण किरकोळ अर्ज नं. २९/२०२५
निशाण नं. ५

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर साहेब यांचे न्यायालयात**

१) **श्रीमती उमा प्रकाश उर्फ बसवेश्वर स्वामी**
लग्नापूर्वीचे नाव उमा शिवलिंग स्वामी पुराणिक
वय - ५८ वर्षे, धंदा-सेवा निवृत्त,
रा. शिवाजी आखाडा, बार्शी, ता. बार्शी

२ ) **श्री. यशवंत प्रकाश उर्फ बसवेश्वर स्वामी** -- अर्जदार
वय-४२ वर्षे, धंदा-नोकरी,
रा.-शिवाजी आखाडा, बार्शी, ता. बार्शी

३) **सौ. सिमा श्रेयस काटीकर**
लग्नापूर्वीचे नाव सीमा प्रकाश उर्फ बसवेश्वर स्वामी
वय-३९ वर्षे, धंदा-नोकरी,
रा. सर्व्हे नं. ७१, फ्लॅट नं. २०१, प्रयेजा सिटी बिल्डिंग-सी २,
पुणे शहर, पुणे

**विरुध्द**

**कोणी नाही** -- सामनेवाला

**१)** ज्याअर्थी, अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज यातील अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं.२ व ३ यांचे वडिल प्रकाश उर्फ बसवेश्वर यशवंत स्वामी हे ता.२९/०६/२०२३ रोजी मयत झाले असून अर्जदार नं.१ ते ३ हेच त्यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत व तसे वारस प्रमाणपत्र (डींललशींीळेप उशीींळषळलरींश) मिळणेकरिता या मे. कोर्टात दाखल केला आहे.

**२)** त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, वर नमुद अर्जदारांचे अर्जातील मागणी व विधाना संबंधाने जर कोणाचेही आक्षेप असतील तर हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेली ता. ११/०४/२०२५ रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विद्वीज्ञा मार्फत हजर होवून आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदती नंतर मे. कोर्टात पुढील हुकूम होतील.

हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्द केले असे.
ता. २४/०२/२०२५

सही/-
कनिष्ठ लिपीक

शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
(दिवाणी न्या.क.स्तर, बार्शी)

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.In वर ऑनलाइन ई-निविदा मागवतात. निविदा क्रमांक: SUR/L/T/2024/37R कामाचे नाव: 2025 आणि 2026 च्या सलग 2 उन्हाळी हंगामासाठी (प्रत्येक वर्षातील 105 उन्हाळ्याच्या दिवसांसाठी) एअर कूलरची तरतूद (पुन्हा आमंत्रण), अंदाजे किंमत: 68,51,235.30/- प्रतिपूर्ती सुरक्षा 1,37,000.00/- पूर्ण कालावधी 24 महिने ऑफरची वैधता : 60 दिवस निविदा वेबसाइटवर बंद होण्याची तारीख आणि वेळ : 18/03/2025 15.00 वाजता. प्रतिपूर्ती सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जाईल. ANJ-36

तुमची जनावरे रेल्वे रुळांपासून दूर ठेवा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवतात. निविदा क्र. SUR/TD/T/2025/07. कामाचे नाव:- वाडी यार्डच्या शिफ्टिंग संबंधात कामाचा इलेक्ट्रिकल TRD भाग- NRD लाईन्सचा CSL वाढवण्यासाठी पॉइंट आणि स्टार्टर सिग्नलचे सोलापूरच्या टोकाकडे 40 मी. अंदाजे किंमत:-1,13,00,772.98/- प्रतिपूर्ती सुरक्षा:- रु. 2,06,500/- पूर्ण होण्याचा कालावधी:- 12 महिने ऑफरची वैधता :- 60 दिवस, तारीख आणि वेबसाइटवर निविदा बंद होण्याची वेळ :-24/03/2025 15.00 वाजता. ANJ-37

तुमची जनावरे रेल्वे रुळांपासून दूर ठेवा

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर व ता. बार्शी येथील लोकांना व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचे अशिल इश्वर महावीर बोथरा, रा. वाणीप्लॉट, कॅन्सर हॉस्पीटलजवळ, आगळगांव रोड, बार्शी, ता. बार्शी येथील रहिवासी असून दि. २४/०२/२०२५ रोजी ते बार्शी ते प्रवासासाठी तेबार्शी एस.टी. स्टॅण्डवर थांबले असता अनावधानाने बॅग गहाळ झालेली आहे सदर बॅग मध्ये ता.२६/०२/२०१८ रोजी साईराज डेव्हलपर्सचे भागीदार श्री सतिश मालन अंधारे व अमोल वसंत ढवळे यांनी कुणाल नरेश शहा यांना लिहून नोंदवून दिलेले खरेदीखताचा दस्त नं.८८९/२०१८ चा अस्सलदस्त गहाळ झाला असून तो शोध घेवूनही तो आढळून आलेला नाही त्याबाबत ता. २५/०२/२०२५ रोजी बार्शी शहर पोलिस स्टेशनला रितसर तक्रारही दिलेली आहे.

तरी वरील नमूद कागदपत्रे/खरेदीदस्त जर कोणाला सापडली असतील तर ती आमचे खालील नमूद पत्त्यावर आणून द्यावीत त्यास आमचे अशिल यथायोग्य बक्षिस देवून आभार मानतील ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. २५/०२/२०२५

सही/-
श्री. प्रसाद जे.कुलकर्णी, ॲडव्होकेट
लक्ष्मीनृसिंह, कासारवाडी, सिध्देश्वर नगर,
बार्शी, ता. बार्शी (अशिलातर्फे ॲडव्होकेट)
मो.नं. ९४२३३३२०४८

## Classifieds

**विकणे आहे**

सैफुल ओमगर्जना चौक, प्लॉट नं. १७ व १८ प्रत्येकी ३,००० स्क्वे. फूट, खुला N.A. क्लिअर टायटल प्लॉट विकणे आहे.
संपर्क : ९७६६१५५२१४
८२७७४९९६२९

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूरातील तमाम लोकांना, विशेषतः साई नगर, मजरेवाडी, सोलापूर हद्दीतील परिसरातील सर्व रहिवांशाना आणि वित्तीय संस्थाना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं.३३६/३ याचे नवीन सर्व्हे नं.९६/३ या पैकी नियोजित साई नगर मधील प्लॉट नं.१९ याचे हद्द पुर्व (दक्षिणोत्तर) ११.२५ मी. पश्चिमेस (दक्षिणोत्तर) ११.७५ मी. दक्षिणेकडील (पुर्वपश्चिम) १६ मी. असे एकुण क्षेत्र १८४.०० चौ.मी. किंवा १.८४.०० आर.चौ.मी. इतके होत आहे. यासी चतुःसिमा पुढीलप्रमाणे आहे. पुर्वेस - प्लॉट नं.२०, पश्चिमेस-प्लॉट नं.१८, दक्षिणेस-रस्ता, उत्तरेस - स.नं. ३३६/२ ची जमीन. येणेप्रमाणे मिळकतीचे मालक शोण जयवंत यादव हे असून त्यांचे वैयक्तिक कारणास्तव आमचे अशिल सौ. सुनंदा सुभाष होटकर व श्री. सचिन सुभाष होटकर यांना कायमखुश खरेदी देण्याचे ठरविले व इसारापोटी काही रक्कम स्वीकारले आहेत.

सबब वर नमूद मिळकती विषयी कोणाचा वाद, वहिवाट, करार, मार्गेज, देणी, इसारा, कर्ज, पावती, अगर इतर कुठल्याही प्रकारचे हितसंबंध असल्यास त्यांनी खालील नमूद वकीलाकडे योग्य त्या कागदपत्रानिशी ८ (आठ) दिवसाच्या आत समक्ष भेटून लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर वर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची सबंधितानी नोंद घ्यावी. ही जाहिर नोटीस दिली दि. २६/०२/२०२५

सही/-
ॲड. बसवराज सावळगी
ॲडव्होकेट नोटरी
रा-१, नाथ पॅरागॉन लष्कर राम मंदिर शेजारी,
सात रस्ता रोड, सोलापूर - ४१३००३.
मो.९४२३०६७२३३, अशिल मो. ७२१९४३६००६

## अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट

### निविदा सूचना

जा.क्र. २०२५/न.प.अ.कोट/आरोग्य १०/संकलन-१/आरआर/कावि दि. २५/०२/२०२५

अक्कलकोट नगरपरिषदेकडील खालील नमूद केलेल्या कामाकरिता संबंधित मक्तेदाराकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. कामाबाबतचा संपूर्ण तपशील व अटी शर्ती कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत (सुट्टीच्या दिवसा व्यतिरिक्त) नगरपरिषद आरोग्य विभागाकडे पहावयास मिळू शकेल. कोरे निविदा फॉर्म अभिलेख कार्यालयात मिळतील. त्याकरिता ठेकेदारांनी रोख रक्कम भरणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव/ वाहनाचा प्रकार | अंदाजित रक्कम (रु.) | बयाणा रक्कम (रु.) | निविदा फॉर्म |
|---|---|---|---|---|
| १ | अक्कलकोट नगरपरिषद हद्दीतील हत्ती तलावातील गाळ काढणे. | ९,९९,९९९/- | १०,०००/- | १,०००/- |
| २ | अक्कलकोट नगरपरिषदेकडील वाहनांची दुरूस्ती करणे. | ५,००,०००/- | ५,०००/- | ५००/- |
| ३ | अक्कलकोट नगरपरिषदेस भाडे तत्वावर वाहन पुरवठा करणे. | ५,००,०००/- | ५,०००/- | ५००/- |

वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. २७/०२/२०२५ पासून दि. १०/०३/२०२५ अखेर पर्यंत नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी १.०० वाजेपर्यंत मिळतील. बयाणा रक्कम स्विकारणेची अंतिम तारीख १०/०३/२०२५ दुपारी २.०० वाजेपर्यंत राहील. बयाणा रक्कम रोखीने भरणेची आहे. बयाणा रक्कम भरल्याशिवाय निविदा स्विकारले जाणार नाही. सिलबंद निविदा दि. १०/०३/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्विकारले जाईल. सिलबंद निविदा नगरपरिषद कार्यालयात आवक-जावक लिपिक यांचेकडे समक्ष आणून देणेत यावे. निविदेसंबंधी आवश्यक असलेली सर्व तांत्रिक कागदपत्रे एका लिफाप्या मध्ये (लिफाफा-अ) सिलबंद करणेचे आहे व भरलेली निविदा फॉर्म दुसऱ्या लिफाप्यामध्ये (लिफाफा-ब) सिलबंद करून सादर करणेचे आहे व दोन्ही लिफाफे मिळून मोठ्या लिफाफ्यामध्ये एकत्रितरीत्या सिलबंद करून देणेची आहे. मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. दाखल झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी सायं. ५.०० वाजता उघडण्यात येतील. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क नगरपरिषदेला राहील. त्याची कारणे देणे नगरपरिषदेवर बंधनकारक राहणार नाहीत. निविदासंबंधी लागू असलेले नगरपरिषदेचे सर्व नियम मक्तेदारांवर बंधनकारक राहतील. बयाणा रक्कमेची मूळ पावती निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. आवश्यक ते सर्व कागदपत्रे निविदासोबत जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही. वरील कामांकरिता निधी उपलब्धतेनुसार बिले अदा करणेत येतील.

शिक्का

सही/-
रमाकांत डाके
मुख्याधिकारी तभा प्रशासक

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur

आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

आज़ादी का अमृत महोत्सव

### नियम - 8 (1)
### ताबा सूचना

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे बँक ऑफ महाराष्ट्रचे सिक्युरिटायझेशन आणि फायनान्शिअल रिकन्ट्रक्शन अंतर्गत अधिकृत अधिकारी आहेत. मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, 2002 आणि कलमाच्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 सह 13 वाचले, 31/08/2024 रोजी मागणी सूचना जारी करून खालील गोष्टींना आवाहन केले. नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचा उल्लेख कर्जदार आणि जामीनदारांनी केला आहे.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सामान्य जनतेला नोटीस दिली जाते की खाली स्वाक्षरीने त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे 20/02/2025 रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या अधिनियमाच्या कलम 13 च्या उप कलम (4) अंतर्गत.

विशेषत: कर्जदाराला आणि सामान्यत: जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि त्यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. वर नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असतील.

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे. सुरक्षित मालमत्ता.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | मागणी सूचना तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा - SSPM**<br>**कर्जदार -**<br>**1. श्री. रघुनाथ जयदेव तोगे**<br>प्लॉट क्र. 20 बाहेर गेट क्र. 1300/3 वाणी प्लॉट ता. बार्शी, जि. सोलापूर पिन कोड 413401.<br>**2. सौ. मिनाक्षी रघुनाथ तोगे**<br>प्लॉट क्र. 20 बाहेर गेट क्र. 1300/3 वाणी प्लॉट ता. बार्शी, जि, सोलापूर पिन कोड 413401<br>**3. श्री. गणेश रघुनाथ तोगे.**<br>प्लॉट क्र. 20 बाहेर गेट क्र. 1300/3 वाणी प्लॉट ता. बार्शी, जि. सोलापूर पिन कोड 413401 | **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन नावे मालमत्ता गहाण ठेवली सौ. मिनाक्षी रघुनाथ तोगे.**<br>वसलेल्या जमिनीचा सर्व तुकडा आणि पार्सल ता. बार्शी या गावी पडून आहे. जिल्हा सोलापूर 193.97 चौ.मी. मोजणारा मीटर आणि बेअरिंग CTS/सर्व्हे क्र. गट BNo.1300/3 प्लॉट क्र.20.<br>**खालीलप्रमाणे सीमा:-**<br>उत्तर :- भूखंड क्रमांक 21<br>पूर्व :- गॅट क्र.1303<br>पश्चिम :- प्लॉट क्र. 18 आणि 20<br>दक्षिण :- 6 मीटर रस्ता<br>इमारती आणि संरचना एकत्र /निवासी ब्लॉकचे बांधकाम/करायचे आहे. त्यावर 69.76 मोजमाप बांधले sq.mtrs कार्पेट म्हणजे 69.76 sq.mtrs | **मागणी सूचना:**<br>दि. 31/08/2024<br>रु.8,74,707.93/- (रुपये आठ लाख चौऱ्याहत्तर हजार सातशे सात आणि त्र्याणव पैसे) अधिक लागू न केलेले व्याज w.e.f. 31/08/2024 च्या प्राप्तीपर्यंत कर्ज<br>**सांकेतिक ताबा तारीख:**<br>20/02/2025 |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २५/०२/२०२५

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन

## महत्त्वाचे

### बॉक्सिंग महासंघाच्या संचालनासाठी समिती स्थापन

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय बॉक्सिंग महासंघाच्या निवडणुका वेळेवर घेण्यात अपयशी ठरल्यानंतर भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने (आयओए) देशातील बॉक्सिंगचे कामकाज चालविण्यासाठी पाच सदस्यांची तदर्थ समिती स्थापन केली. भारतीय ॲथ्लेटिक्स फेडरेशन (एएफआय) चे माजी कोषाध्यक्ष मधुकांत पाठक यांच्या नेतृत्वाखालील ॲड-हॉक पॅनेलला आयओएने भारतीय बॉक्सिंग फेडरेशन (बीएफआय) च्या निवडणुका लवकरात लवकर घेण्यास सांगितले होते. आयओए भारतीय बॉक्सिंग महासंघाच्या प्रशासकीय बाबींवर बारकाईने लक्ष ठेवून आहे, असे आयओएच्या अध्यक्षा पी. टी. उषा यांनी म्हटले आहे. कार्यकारी नियमांनुसार, बीएफआयच्या निवडणुका २ फेब्रुवारी २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी घ्यायच्या होत्या. निर्धारित वेळेनंतरही निवडणुका झाल्या नाहीत, ज्यामुळे महासंघात प्रशासकीय अस्थिरता निर्माण झाली आहे. ते म्हणाले, वरील बाबी लक्षात घेता आणि आयओएला मिळालेल्या अधिकारांनुसार, भारतीय बॉक्सिंग फेडरेशनच्या कारभारावर देखरेख ठेवण्यासाठी आणि मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका होईपर्यंत त्यांच्या क्रियाकलापांचे सुरळीत कामकाज सुनिश्चित करण्यासाठी एक तदर्थ समिती स्थापन करण्यात येत आहे. पी. टी. उषा म्हणाल्या, बीएफआयच्या दैनंदिन प्रशासनासाठी देखील तदर्थ समिती जबाबदार असेल.

### ऑनलाईन क्रिकेट सट्टेबाजी करणाऱ्या दोघांना अटक

**दिल्ली :** पोलिसांनी ऑनलाईन क्रिकेट बेटिंग रॅकेटचा पर्दाफाश केल्याचा दावा केला असून,२३ फेब्रुवारी रोजी भारत-पाकिस्तान सामन्यावर सट्टा लावणाऱ्या दोघांना अटक केली.एका माहितीच्या आधारे ,पोलिसांच्या पथकाने मालवीय नगरमधील एका घरावर छापा टाकला, जेथे अयान आणि निजाम उर्फ भुट्टो हे ऑनलाइन बेटिंग अर्जाद्वारे सट्टा स्वीकारताना आढळले असे,पोलिस उपायुक्त अंकित चौहान यांनी एका निवेदनात सांगितले. आरोपींनी १३ रुपयांचा सट्टा लावला होता.आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा पुढील तपास सुरू आहे,

### बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनची याचिका फेटाळली

**बंगळुरू :** भारतीय बॅडमटनपटू लक्ष्य सेनला कर्नाटक उच्च न्यायालयाने मोठा झटका दिला आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाने लक्ष्य सेन, त्याचे कुटुंब आणि प्रशिक्षक विमल कुमार यांनी जन्म प्रमाणपत्रात छेडछाड केल्याच्या आरोपाखाली दाखल केलेल्या याचिका फेटाळून लावल्या आहेत. एम. जी. नागराज यांनी खेळाडूवर हेराफेरी आणि बनावट कागदपत्रे सादर केल्याचा आरोप करत खाजगी तक्रार दाखल केली होती. लक्ष्य सेनचे पालक धीरेंद्र आणि निर्मला सेन, त्याचा भाऊ चिराग सेन, प्रशिक्षक यू विमल कुमार आणि कर्नाटक बॅडमटन असोसिएशनच्या एका कर्मचाऱ्याने जन्म नोंदी खोट्या केल्याचा आरोप त्यांनी केला होता. उच्च न्यायालयाने म्हटले की, या प्रकरणात प्रथमदर्शनी पुरावे आहेत जे तपासाची आवश्यकता दर्शवितात. तक्रारीनुसार, आरोपींनी लक्ष्य आणि चिराग सेन यांचे वय त्यांच्या जन्म प्रमाणपत्रांमध्ये सुमारे दोन वर्षे आणि सहा महिन्यांनी कमी केले आहे. नागराज यांनी माहिती अधिकार (आरटीआय) कायद्यांतर्गत मिळवलेल्या कागदपत्रांसह आपला दावा सादर केला आणि न्यायालयाला भारतीय क्रीडा प्राधिकरण (एसएआय) आणि क्रीडा मंत्रालयाकडून मूळ नोंदी मागवण्याची विनंती केली. उच्च न्यायालयाने हाय ग्राउंड्स पोलिस स्टेशनला या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले.

### रोहित शर्माच्या निशाण्यावर ख्रिस गेलचा विक्रम

**दुबई :** आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने शानदार कामगिरी केली आहे. स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात टीम इंडियाने बांगलादेशला हरवले आणि त्यानंतर दुसऱ्या सामन्यात कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानला ६ विकेट्स राखून धूळ चारली. यानंतर, न्यूझीलंडकडून बांगलादेशचा पराभव होताच किवी संघ आणि टीम इंडियाने उपांत्य फेरीत गाठली. परिणामी, बांगलादेश आणि यजमान पाकिस्तान स्पर्धेतून बाहेर पडले. आता भारत आणि न्यूझीलंड २ मार्च रोजी आमनेसामने येतील. दोन्ही संघांचा हा तिसरा आणि शेवटचा गट सामना असेल. या सामन्यात, दोन्ही संघ जिंकून गट अ मध्ये अव्वल स्थान मिळवण्याचा प्रयत्न करतील.

भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्ध विजयी मालिका सुरू ठेवण्यास सज्ज आहे. या सामन्यात भारतीय कर्णधार रोहित शर्माच्या निशाण्यावर ख्रिस गेलचा एका मोठा विक्रम असेल. खरंतर, हिटमॅनने भारतासाठी ४९६ सामन्यांच्या ५२९ डावांमध्ये १९,५८१ धावा केल्या आहेत. यामध्ये ४९ शतके आणि १०७ अर्धशतकांचा समावेश आहे. जर रोहितने न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात फक्त १३ धावा केल्या, तर तो गेलला मागे टाकेल आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये धावा करण्याच्या बाबतीत १४ व्या स्थानावर पोहोचेल.

# केरळविरुद्ध घरच्या मैदानाचा फायदा घेणार विदर्भ

## आजपासून रणजी अंतिम सामना

◆ **नागपूर, २५ फेब्रुवारी**

आपल्या प्रमुख खेळाडूंच्या उत्कृष्ट फॉर्म आणि घरच्या मैदानावर माजी विजेता विदर्भ बुधवारपासून येथे सुरू होणाऱ्या रणजी ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात केरळविरुद्ध लढणार आहे. अक्षय वाडकरच्या नेतृत्वाखालील विदर्भ संघाने या हंगामात आतापर्यंत चमकदार कामगिरी केली आहे. त्यांनी आतापर्यंत नऊपैकी आठ सामने जिंकले आहेत आणि एक सामना अनिर्णीत राखला. विदर्भाने गटात सात पैकी सहा सामने जिंकले. यानंतर, त्यांनी उपांत्य पूर्वमध्ये तामिळनाडूचा १९८ धावांनी आणि उपांत्यमध्ये गतविजेत्या मुंबईचा ८० धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला.

विदर्भ २०१७-१८ आणि २०१८-१९ मध्ये रणजी चषक जिंकला तर केरळ संघ पहिल्यांदाच अंतिम फेरीत पोहोचला आहे. विदर्भ संघाने चौथ्यांदा अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. गेल्या वर्षी अंतिम फेरीत तो मुंबईकडून हरला होता. या वर्षी तो त्याची भरपाई करण्याच्या इराद्याने मैदानात उतरणार आहे. विदर्भ संघाने आपल्या कामगिरीत सातत्य राखले आहे. त्याने यावर्षी विजय हजारे ट्रॉफीच्या अंतिम फेरीतही प्रवेश केला. या हंगामात विदर्भाच्या फलंदाजांनी आतापर्यंत चमकदार कामगिरी केली आहे. त्याच्याकडून यश राठोडने ५८.१३ च्या सरासरीने ९३३ धावा केल्या आहेत ज्यात पाच शतके आणि तीन अर्धशतकांचा समावेश आहे. कर्णधार वाडकरने चांगले नेतृत्व केले आहे.

त्याने ४८.१४ च्या सरासरीने ६७४ धावा केल्या आहेत. अनुभवी फलंदाज करुण नायरही त्याच्या मागे नाही. त्याने ४५.८५ च्या सरासरीने ६४२ धावा केल्या आहेत. त्याच्याशिवाय, दानिश मालेवारने ५५७ धावा करून आपली भूमिका चांगली बजावली आहे आणि ध्रुव शोरीने ४४६ धावा केल्या आहेत. गोलंदाजीत, २२ वर्षीय हर्ष दुबेने विदर्भासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्याने आतापर्यंत ६६ गडी बाद केले आणि रणजी हंगामात सर्वाधिक गडी बाद करण्याच्या विक्रमापासून तो फक्त दोन गडी दूर आहे. हा विक्रम बिहारच्या आशुतोष अमनच्या नावावर आहे ज्याने २०१८-१९ च्या हंगामात ६८ गडी बाद केले. दुसरीकडे, सचिन बेबीच्या नेतृत्वाखालील केरळ संघ पहिल्यांदाच अंतिम फेरीत पोहोचला असेल, तर त्यात नशिबाचीही मोठी भूमिका आहे. (वृत्तसंस्था)



# ऑस्ट्रेलिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका सामना पावसामुळे रद्द!



◆ **रावळपिंडी, २५ फेब्रुवारी**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचा सातवा सामना २५ फेब्रुवारी रोजी रावळपिंडी येथे विश्वविजेता ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळला जाणार होता; परंतु पावसाने सर्व आशा धुळीस मिळवल्या. खराब हवामानामुळे टॉस होऊ शकला नाही. रावळपिंडीमध्ये सकाळपासूनच पाऊस पडत होता, त्यामुळे जमीन पाण्याखाली गेली होती. सामना अधिकाऱ्यांनी सामना सुरू होण्याची बराच वेळ वाट पाहिली पण काही उपयोग झाला नाही. यानंतर परिस्थिती आणखी बिकट होत असल्याचे पाहून सामना अधिकाऱ्यांनी अखेर खेळ रद्द केला.

दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील चॅम्पियन्स ट्रॉफी सामना २५ फेब्रुवारी रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी २.३० वाजता सुरू होणार होता; परंतु पावसामुळे टॉसला उशीर झाला. दुपारी दोन वाजता नाणेफेक होणार होती, पण हलक्या पावसामुळे दोन्ही कर्णधार मैदानात येऊ शकले नाहीत. या वेळी खेळपट्टी कव्हरने झाकलेली होती. सामना सुरू होण्यासाठी सुमारे चार तास वाट पाहावी लागली; पण शेवटी पावसाने संपूर्ण सामना खराब केला. दोन्ही संघांना १-१ गुणांवर समाधान मानावे लागले.

**ग्रुप-बची लढाई रोमांचक झाली**

ऑस्ट्रेलिया विरुद्ध दक्षिण आफ्रिका सामना रद्द झाल्यामुळे आज होणारा स्पर्धेतील आठव सामना नॉकआऊट सामना बनल आहे, ज्याते इंग्लंडचा सामन अफगाणिस्तानशी होईल. आत आजच्या सामन्याचा निकाल कोणाच्या बाजूने जाईल, हे पाहणे रंजक ठरेल. ग्रुप बीमध्ये इंग्लंड आणि अफगाणिस्तान यांच्यातील सामन खेळवला जाईल. दोन्ही संघांनी आपला पहिला सामना गमावल आहे. अशा परिस्थितीत आजच्य सामन्यात पराभूत होणाऱ्या संघाच प्रवास स्पर्धेत संपेल, तर जिंकणार संघ उपांत्य फेरीच्या शर्यतीत राहील. (वृत्तसंस्था)

# आव्हान कायम ठेवण्यासाठी इंग्लंड-अफगाणिस्तान आमनेसामने

◆ **लाहोर, २५ फेब्रुवारी**

ऑस्ट्रेलियाविरुद्ध मोठी धावसंख्या उभारूनही पराभवामुळे निराश झालेल्या इंग्लंडला चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आपल्या आशा जिवंत ठेवण्यासाठी बुधवारी येथे अफगाणिस्तानच्या फिरकी गोलंदाजांच्या कठीण परीक्षेला सामोरे जावे लागेल.

इंग्लंड आणि अफगाणिस्तानला त्यांच्या पहिल्या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आणि त्यामुळे हा सामना दोन्ही संघांसाठी 'करो या मरो' असा झाला आहे. ग्रुप बी मध्ये, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाने त्यांचे पहिले सामने जिंकले. मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये इंग्लंडचे वर्चस्व आता भूतकाळात जमा झाले आहे.





ऑस्ट्रेलियाविरुद्ध, जर त्यांच्या फलंदाजांनी चांगली कामगिरी केली, तर त्यांच्या गोलंदाजांनी निराशा केली कारण त्यांना ३५० पेक्षा जास्त धावसंख्येचा बचाव करता आला नाही. पहिल्या सामन्यात इंग्लंडच्या फलंदाजीचा विचार केला तर ऑस्ट्रेलियाचे प्रमुख गोलंदाज या स्पर्धेत खेळत नाहीत. इंग्लंडच्या फलंदाजांनी त्यांच्या अननुभवी गोलंदाजीचा पुरेपूर फायदा घेत पहिल्या सामन्यात मोठी धावसंख्या उभारली. त्यामुळे अफगाणिस्तानविरुद्ध जिंकण्यासाठी इंग्लंडला फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही विभागात चांगली कामगिरी करावी लागेल. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारताविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत इंग्लंडच्या फलंदाजांना फिरकी गोलंदाजांना खेळवण्यात खूप त्रास झाला. अफगाणिस्तानकडे रशीद खान, नूर अहमद आणि मोहम्मद नबीसारखे जागतिक दर्जाचे फिरकी गोलंदाज आहेत जे कोणत्याही फलंदाजीला अडचणीत आणण्यास सक्षम आहेत. येथील खेळपट्टी संथ गोलंदाजांना मदत करेल अशी अपेक्षा आहे आणि अशा परिस्थितीत इंग्लंडच्या फलंदाजांना कठीण परीक्षेला सामोरे जावे लागेल. अफगाणिस्तान संघात जवळजवळ तेच खेळाडू आहेत ज्यांनी गेल्या वर्षी टी-२० च्या उपांत्य फेरीत प्रवेश केला होता. जर अफगाणिस्तानला उपांत्य फेरी गाठण्याच्या आशा जिवंत ठेवायच्या असतील तर त्यांच्या खेळाडूंना एकजुटीने कामगिरी करावी लागेल. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**
**अफगाणिस्तान वि. इंग्लंड**
**स्थळ :** गडाफी स्टेडियम, लाहोर
**वेळ :** दुपारी २.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# एकाच ठिकाणी खेळण्याचा भारताला फायदा

### पीट कमिन्सने मांडले मत

◆ **सिडनी, २५ फेब्रुवारी**

भारतीय संघाने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पहिले दोन्ही सामने जिंकून उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघ आतापर्यंत स्पर्धेत अपराजित आहे, त्यांनी गट टप्प्यात बांगलादेश आणि पाकिस्तानला पराभूत केले आहे. आता भारताचा सामना २ मार्च रोजी न्यूझीलंडशी होईल. या स्पर्धेसाठी भारतीय संघाने पाकिस्तानला जाण्यास नकार दिला होता, त्यानंतर आयसीसीने हायब्रिड मॉडेल अंतर्गत भारताचे सामने दुबईमध्ये आयोजित केले होते. आता ऑस्ट्रेलियाचा नियमित कर्णधार पॅट कमिन्सने यावर आपले मत मांडले आहे.



तो म्हणाला की, भारताला एकाच ठिकाणी खेळण्याचा फायदा मिळत आहे. कमिन्स चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी ऑस्ट्रेलियन संघाचा भाग नाही. दुखापतीमुळे तो या आयसीसी स्पर्धेत खेळलेला नाही. कमिन्स म्हणाला, स्पर्धा आयोजित होत आहे हे चांगले आहे पण त्याच मैदानावर खेळण्याचा भारताला मोठा फायदा होतो हे स्पष्ट आहे. त्यांचा संघ आधीच खूप मजबूत आहे आणि त्यांना त्यांचे सर्व सामने एकाच ठिकाणी खेळण्याचा स्पष्ट फायदा आहे. तो आधीच खूप मजबूत दिसत होता आणि त्याला दुबईमध्ये सर्व सामने खेळण्याचा फायदा मिळाला.

चॅम्पियन्स ट्रॉफी न खेळण्याच्या निर्णयाबद्दल बोलताना कमिन्स म्हणाला घरी असणे चांगले आहे आणि सर्व काही ठीक चालले आहे. घोट्याचे पुनर्वसन देखील सुरू आहे,

म्हणून मी या आठवड्यात गोलंदाजी सुरू करेन. पुढील महिन्यापासून आयपीएल सुरू होणार आहे आणि त्यानंतर आपल्याला जागतिक कसोटी अजिंक्यपदचा अंतिम सामनाही खेळायचा आहे. यानंतर आपल्याला वेस्ट इंडिजचा दौरा करायचा आहे.

कमिन्सच्या अनुपस्थितीत स्टीव्ह स्मिथ संघाचे नेतृत्व करत आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पहिल्या सामन्यात इंग्लंडला हरवून ऑस्ट्रेलियाने विजयी सुरुवात केली आहे. (वृत्तसंस्था)

# राज्य दांडपट्टा स्पर्धेत सोलापूरची १६ पदकांची कमाई



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

कोल्हापूर येथे झालेल्या पहिल्या राज्य दांडपट्टा स्पर्धेत येथील खेळाडूंनी ४ सुवर्ण, ५ रौप्य व ७ कास्य अशी १६ पदकांची कमाई केली. या विद्यार्थ्यांचे विवेक मिस्कीन, साक्षी कानगुडे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी आदर्श गुरुवर्य योगीनाथ फुलारी, विवेक मिस्कीन यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आले.दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप लाड , उपाध्यक्ष सुभाष मोहिते, सचिव बाला साठे, सहसचिव अजय शहा , सहखजिनदार महमद रफि शेख व दानपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन सोलापूरचे अध्यक्ष तुकाराम भुसारे, उपाध्यक्ष योगीनाथ फुलारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

**कामगिरी : मुली : १० वर्षाखालील- कांस्य :** दुर्वा रोहिटे, भविष्या सिंदम. **१२ वर्षाखालील- कांस्य:** जानवी म्हेत्रे, स्वप्नाली जमादार.

**१४ वर्षाखालील- सुवर्ण :** अदिती नल्ला, गौरी माळी, बिंदूप्रिया कुने, सोनाक्षी माडे. कांस्य : पल्लवी बिनगुंडी, मान्यता रोहिटे. **१६ वर्षाखालील- रौप्य :** वेंनला वरकल. **१८ वर्षावरील- रौप्य:** भावाना गड्डम, ममता मंडल.

**मुले : १४ वर्षाखालील- रौप्य :** भावेश कुने, अजिंक्य गायकवाड, कांस्य : अथर्व बुरबुरे.

# 'शुद्धोहम् चषक' बुद्धिबळ स्पर्धा रविवारी सोलापुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

सोलापुर चेस अकॅडमीने सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने रविवार २ मार्च रोजी सकाळी १० वाजता शांतीसागर मंगल कार्यालय, एम्प्लॉयमेंट चौक येथे १९ वर्षाखालील तसेच १३, ११, ९ व ७ वर्षाखालील बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा शुद्धोहम् ज्वेलर्स यांनी प्रायोजित केलेल्या आहेत. स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या स्विस लीग नियमानुसार खेळाडूंच्या संख्येनुसार ५ ते ८ फेऱ्यात होणार असुन खेळाडूंना प्रत्येकी १५ मिनिटे व प्रत्येक चालीला ५ सेकंद वाढीव वेळ देण्यात येणार आहे. १९ वर्षाखालील गटातील प्रथम क्रमांकासाठी पंधराशे, एक हजार, आठशे, सहाशे, पाचशे, चारशे, तीनशे व दोनशे तसेच १३, ११, ९ व ७ वर्षाखालील गटात देखील रोख पारितोषिकांसह ५५ बक्षिसे ठेवण्यात आलेली आहेत. विजेत्या खेळाडूंना एकूण रु. २० हजार रुपयेपर्यंतची रोख बक्षिसे, 'शुद्धोहम् चषक' व मेडल्स देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी प्रवेश फी रु. २०० असुन इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी उदय वगरे मो.क्र. ८८८८०४५३४४ व प्रशांत पिसे मो.क्र. ९१५६८१५९६३ यांच्याकडे संपर्क साधावा असे संस्थेचे सोलापुर चेस अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर व सचिव आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड यांनी कळविले आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले आहे.



# मन्नेपल्ली जर्मन ओपनच्या मुख्य ड्रॉमध्ये

◆ **मुल्हेम (जर्मनी), २५ फेब्रुवारी**

भारताच्या टी मन्नेपल्लीने जर्मन ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश केला तर शंकर सुब्रमण्यम आणि रित्विक सतीश कुमार यांना मंगळवारी येथे सुपर ३०० स्पर्धेच्या पात्रता फेरीत पराभव पत्करावा लागला. जागतिक क्रमवारीत ५९ व्या क्रमांकावर असलेल्या मन्नेपल्लीने पात्रता फेरीच्या पहिल्या फेरीत चायनीज तैपेईच्या लियाओ झुओ-फूचा २१-११, २२-२० असा पराभव केला आणि त्यानंतर पुढच्या फेरीत इस्रायलच्या खालच्या क्रमांकाच्या मीशा झिलबरमनचा २१-१४, १६-२१, २१-११ असा पराभव केला. मुख्य ड्रॉच्या पहिल्या फेरीत त्याचा सामना जागतिक क्रमवारीत ५४ व्या स्थानावर असलेल्या डेन्मार्कच्या मॅग्नस जोहानसनशी होईल. पात्रता फेरीच्या पहिल्या फेरीत सुब्रमण्यमने जोनाथन मॅटियासचा ४२ मिनिटांत २१-१९, २१-९ असा पराभव केला पण एक तास १२ मिनिटे चाललेल्या सामन्यात त्याला फ्रेंच खेळाडू अर्नो मर्केलकडून २३-२१, १४-२१, ९-२१ असा पराभव पत्करावा लागला. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तान संघाचा कोच बनायला हरकत काय? : योगराज सिंग

◆ **चंदिगड, २५ फेब्रुवारी**

चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये न्यूझीलंड आणि भारताकडून झालेल्या दारुण पराभवानंतर पाकिस्तानचा प्रवास संपला आहे. न्यूझीलंडने बांगलादेशविरुद्ध विजय मिळवल्यानंतर अवघ्या सहा दिवसांतच पाकिस्तान चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर पडला. पाकिस्तान संघ या स्पर्धेचा यजमान होता, पण सलग दोन सामने गमावल्यानंतर त्यांच्या स्पर्धेबाहेर पडण्याने चाहत्यांचे मन दुखावले आहे. वसीम अक्रम, वकार युनूस आणि शोएब अख्तरसारखे माजी क्रिकेटपटू संपूर्ण पाकिस्तान संघ बदलण्याबद्दल बोलत आहेत. दरम्यान, युवराज सिंगचे वडील आणि टीम इंडियाचे माजी वेगवान गोलंदाज योगराज सिंग यांचा एक मुलाखत समोर आली आहे ज्यामध्ये ते म्हणत आहे की, जर त्यांना पाकिस्तान संघाचे प्रशिक्षक बनवले गेले तर ते या संघाची स्थिती बदलतील.

एका मुलाखतीत ते म्हणाले, कधीकधी मला वाटतं की मी पाकिस्तान संघाला फोन करून सांगावे की, जर तुमच्याकडे प्रशिक्षक नसेल, तर हा संघ मला एक वर्षासाठी द्या. मी त्यांना सिंहासारखे बनवीन. यानंतर योगराज यांना विचारण्यात आले की, ते पाकिस्तानचे प्रशिक्षक होणार का, ज्यावर त्यांनी उत्तर दिले की, यात काय अडचण आहे.



पाकिस्तानी खेळाडूंमध्ये प्रतिभा आहे. त्यांच्याकडे मोठे स्टार आहेत. पाकिस्तानकडे १५० पेक्षा जास्त वेगाने गोलंदाजी करणारे खेळाडू आहेत, परंतु या संघात चांगली प्रणाली नाही.

योगराज सिंग हे एक उत्तम प्रशिक्षक आहेत, यात शंका नाही. योगराज यांनी स्वतः भारताच्या सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक असलेल्या युवराज सिंगला तयार केले आहे. योगराज यांचा मुलगा युवराज कधीच क्रिकेटर बनू इच्छित नव्हता. पण, योगराजच्या चिकाटीने युवराजला केवळ क्रिकेटपटू बनवले नाही, तर या खेळाडूने देशाला दोन विश्वचषक जिंकून दिले. अलिकडेच योगराज सिंगने सचिनचा मुलगा अर्जुन तेंडुलकरलाही प्रशिक्षण दिले आणि या खेळाडूने रणजी क्रिकेटमध्ये शानदार शतक झळकावले आहे. (वृत्तसंस्था)

# आशियाई पॅरासायकलिंग: आरकालला २ रौप्य

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

फिचित, थायलँड येथे झालेल्या आशियाई पॅरा सायकलिंग हॅंडसायकल श्रेणीच्या चॅम्पियनशिपमध्ये येथील प्रशांत सुदर्शन आरकालने २ रौप्य पदके पटकाविली. ७ व ८ फेब्रुवारी दरम्यान या स्पर्धेत प्रशांतने २०.५६ किमी टाईम ट्रायल ही ३५ मिनीटे ४२ सेकंदात पूर्ण करुन पहिले रौप्य पदक व ६४.२ किमी रोड रेस १ तास ५२ मिनीट ४८ सेकंतदात पूर्ण करुन दुसरे रौप्य पदक मिळविले. या वेळी तो फक्त ३ सेंकदाच्या फरकाने सुवर्णपदकापासून दूर राहिला. या स्पर्धेत सहभाग घेण्यास त्यास आदित्य मेहता फौंडेशनचे सहकार्य लाभले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### स्वाभिमानी मराठा महासंघ इतिहास आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी महेंद्र निंबाळकर

**वैराग, दि.२५ फेब्रुवारी-**



राष्ट्रीय स्वाभिमानी मराठा महासंघ इतिहास आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी महेंद्र नाईक निंबाळकर यांची निवड करण्यात आली. महासंघाच्या वैराग येथे झालेल्या मेळाव्यात संस्थापक डॉ कृषिराज टकले पाटील यांनी निवडीचे पत्र निंबाळकर यांना देण्यात आले. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष आर. सागर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष निलेश धुमाळ पाटील, राजवीर सिंह, सुनील सूर्यवंशी, कोकिळा पवार पदाधिकारी उपस्थित होते.

### आरडी चित्रपटाचा दमदार टीजर लॉन्च

**सोलापूर , दि.२५ फेब्रुवारी-**

आयुष्यात एखादी चूक घडते. पण ती चूक किती मोठी त्यावर त्याचे परिणाम अवलंबून असतात. अशाच एका तरूणाच्या चुकीमुळे घडणाऱ्या नाट्यमय परिणामांची थरारक कहाणी ''आरडी'' या आगामी चित्रपटातून मोठ्या पडद्यावर येणार आहे.२१ मार्चला प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटाचा रंजक टीजर नुकताच सोशल मीडियावर लाँच करण्यात आला आहे.साद एंटरटेन्मेंट,कमल एंटरप्राइझेस यांनी झेब्रा पिक्चर्स आणि हेलिक्स प्रॉडक्शन्स यांच्या सहाय्याने आरडी चित्रपटाची निर्मिती केली आहे.आदित्य नाईक,साहिल वढवेकर, हंसराज भक्तावाला,इस्तेखार अहमद शेख हे चित्रपटाचे निर्माते तर ऋग्वेद डेंगळे, शिवराज पवार,गणेश शिंदे हे सहनिर्माते आहेत.चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन गणेश शिंदे यांनी केलं आहे.बी.आप्पासाहेब यांनी सहलेखन आणि सहदिग्दर्शन,हर्षवर्धन जाधव आणि मयूर सातपुते यांनी संकलन,तन्मय ढोक यांनी छायांकन,सुरेश पंडित,वरूण लिखाते यांनी संगीत दिग्दर्शन केलं आहे.चित्रपटात गणेश शिंदे,अवंतिका कवठेकर,राहुल फलटणकर,बुशरा शेख,केतन पवार,सानवी वाळके यांच्या प्रमुख भूमिका आहे.

### पालकमंत्री जयकुमार गोरे यांना पितृशोक

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**



महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे वडील भगवानराव रामचंद्र गोरे यांचे मंगळवार, २५ फेब्रुवारी रोजी पहाटे दीर्घ आजाराने निधन झाले. भगवानराव गोरे यांच्यावर मागील काही दिवसांपासून पुण्यातील रुग्णालयात उपचार सुरू होते. बोराटवाडी (ता. माण) जिल्हा सातारा येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### 'तरुण भारत'चे नातेपुते प्रतिनिधी विलास भोसले यांना मातृशोक

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**



दै. 'तरुण भारत'चे नातेपुते प्रतिनिधी विलास एकनाथ भोसले यांच्या मातोश्री सोनाबाई एकनाथ भोसले (वय ८८) यांचे २५ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७.१५ वाजण्याच्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच विवाहित मुले, तीन विवाहित मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. दै. 'तरुण भारत'चे संपादक प्रशांत माने यांनी शोक संदेश पाठवून भोसले परिवाराचे 'तरुण भारत' परिवाराच्यावतीने सांत्वन केले.

## निधन वृत्त...

### सीमा हैद्राबादवाले

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**



रेल्वे लाईन येथील सीमा सुरेंद्रकुमार हैद्राबादवाले (६९) यांचे मंगळवार २५ फेब्रुवारी पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. बुधवार २६ रोजी सकाळी १० वाजता मोदी विद्युत दाहिनी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. मरणोत्तर त्यांचे नेत्रदान करण्यात आले. कानू कलेक्शनचे सपना भावीन रांभिया यांच्या त्या मातोश्री होत.

### राजश्री जाधव

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**



राजश्री सुर्यकांत जाधव (वय ६२) यांचे नुकतेच अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पती, सासू व एक मुलगी असा परिवार आहे. सेवानिवृत्त पोलिस अधिकारी सुर्यकांत जाधव यांच्या त्या पत्नी होत.

### अभ्युदय जोशी

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**



जुळे सोलापुरातील ज्ञानेश्वर नगर येथील अभ्युदय मधुकर जोशी (वय ५०) यांचे नुकतेच अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पत्नी, २ मुले, सासू, भाऊ व बहीण असा परिवार आहे. कोषागार कार्यालयतील निवृत्त उपलेखापाल मालती जोशी यांचे ते चिरंजीव आहेत.

### नागनाथ वाकसे

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**



सलगरवस्ती येथील नागनाथ अंबादास वाकसे (वय ६४) यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पत्नी, दोन मुले व २ मुली, सूना, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

### संभाजी शिंदे

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**



पंढरपूर एसटी डेपोचे निवृत्त वाहनचालक संभाजी सदाशिव शिंदे (वय ७६) यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पत्नी, ५ मुले, सूना व नातवंडे असा परिवार आहे.

### भास्करराव कदम

**बार्शी, दि. २५ फेब्रुवारी-**



वि.हिं.प.चे प्रखंड मंत्री बापूसाहेब कदम तथा भाजप बार्शी शहराध्यक्ष तथा उद्योजक महावीर कदम यांचे वडील भास्करराव श्रीपती कदम (वय ८१) यांचे अल्पशा आजाराने सोमवार दि.२४ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

---

प्रेमसंबंधातून दुहेरी मृत्यू

# पतीच्या हत्येचा कट रचणाऱ्या प्रियकराचाही बुडून मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२५ फेब्रुवारी-**

प्रेमसंबंधात अडथळा ठरत असल्याच्या संशयावरुन एका विवाहित महिलेने प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या करण्याचा कट रचला. मात्र, नियतीने वेगळेच लिहिले होते. कट आखणारा प्रियकरदेखील या घटनेत मृत्युमुखी पडला. बार्शी तालुक्यातील महागाव पुलावर येथील तळ्यात बुडून त्याचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेत प्रियकर गणेश अनिल सपाटे (वय २६, रा. अलीपूर रोड, बार्शी) तर पती शंकर पटाडे यांचा मृतदेह दि. १९ फेब्रुवारी रोजी पाण्यावर तरंगताना दिसून आले होते. याप्रकरणी बार्शी पोलिसांनी विवाहित महिला रुपाली शंकर पटाडे (वय ३५, रा. यशवंतनगर, तुळजापूर रोड, बार्शी) हिच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

गणेश अनिल सपाटे (वय २६, रा. अलीपूर रोड, बार्शी) याचे रुपाली पटाडे हिच्यासोबत प्रेमसंबंध होते. मात्र, तिचा पती शंकर पटाडे हा त्यांच्या संबंधात अडथळा ठरत होता. रुपाली हिला वारंवार त्रास देत होता. त्यामुळे रुपाली हिने गणेश सपाटे यास पतीची हत्या करण्यास प्रवृत्त केले. दि. १७ फेब्रुवारी रोजी दुपारी गणेश सपाटे याने मित्र गणेश खरात याला फोन करुन दारु पार्टीसाठी जाण्याचे ठरविले. चारचाकी वाहन घेऊन संध्याकाळी दोघांनी बार्शीतील वाईन शॉपमधून दारु घेतली आणि तुळजापूर रोडने पुढे गेले. वाटेत त्यांनी सपाटे याचा मित्र शंकर पटाडे याला गाडीत घेतले. तिघे मिळून बावी हद्दीतील एका हॉटेलमध्ये दारु प्यायल्यानंतर गणेश सपाटे याने तुळजापूर मार्गे धाराशिव येथे थिएटरला बारीला जाण्याचे कारण सांगून त्यांना गाडीतून महागाव तळ्याजवळ नेले.

**महिलेची कबुली, पोलिसांनी केला गुन्हा दाखल**

पोलिसांनी तपासाअंती रुपाली पटाडे हिला चौकशीसाठी ताब्यात घेतले. चौकशी दरम्यान तिने गणेश सपाटे सोबतचे प्रेमसंबंध व पती शंकर पटाडे सतत अडथळा आणत असल्याचा खुलासा केला. तिने गणेशला शंकर मामाला संपव असे सांगितले होते, अशी कबुली दिली. या प्रकरणाचा अधिक तपास पांगरी पोलीस करत आहेत.

**नियोजन उलटे पडले, प्रियकराचाही मृत्यू**

महागाव पुलावर पोहोचल्यावर येथे डान्स करु फोटो काढून म्हणून गणेश सपाटे याने गाडी थांबवली. तिघांनी मोठ्या आवाजात डीजे लावून नाचण्यास सुरुवात केली. गणेश सपाटे याने त्याच्या मोबाईलमध्ये फोटोही काढले. दरम्यान, गणेश खरात सिगारेट ओढण्यासाठी गाडीत गेला. यावेळी गणेश सपाटे व शंकर पटाडे हे दोघेच पुलावर उभे बोलत होते. दोघेजन मस्ती करत असताना अचानक, गणेश सपाटे याने शंकरला उचलून घेतले पाण्यात ढकलेले. मात्र, प्रतिकारादरम्यान शंकर पटाडे याने गणेश सपाटे याचा गळा पकडला आणि तोही त्याच्यासोबत पाण्यात पडला. हे पाहून गणेश खरात याने त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र ते दोघेही दिसले नाहीत. त्याने मित्राला फोन करुन बोलावले व नंतर घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर रात्री उशिरा तो घटनास्थळी परतला, परंतु दोघांचा थांगपत्ता लागला नाही. अखेर, तेथेच गाडीत झोपण्याचा निर्णय त्याने घेतला.

---



# विधीज्ञ संघ व विधी सेवा समितीतर्फे कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ फेब्रुवारी-**

विद्यार्थ्यांच्या प्रबोधनासाठी तालुका विधी सेवा समिती व विधिज्ञ संघ,सांगोला यांच्या वतीने सांगोला महाविद्यालय येथे कायदेविषयक शिबिर घेण्यात आले. शिबिराच्या अध्यक्षस्थानी सांगोला न्यायालयाच्या न्यायाधीश बी. एम. पोतदार तर विधिज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड. आर. पी.चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक एस.व्ही. चव्हाण, संस्था सचिव ॲड. उदय घोंगडे उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांनी केले. पॉश कायदा-२०१३ या कायद्याचा एस.व्ही. चव्हाण यांनी अभ्यासपूर्वक उहापोह केला. मानसिक व शारीरिक ताणतणाव यावर डॉ. स्मिता गव्हाणे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील अनुभव मार्गदर्शन केले. न्यायाधीश बी. एम. पोतदार यांनी कामाच्या ठिकाणी महिलावर होणाऱ्या अत्याचाराविषयी कायद्यातील तरतुदी सांगितल्या तसेच महिलांना अशा प्रकारच्या अन्यायाला तोंड देताना नेमके काय करावे यावर मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या संयोजनासाठी महिला तक्रार निवारण समितीच्या ॲड. राजेश्वरी केदार, लिपीक हाके व आय.क्यु. ए.सी. यांचे सहकार्य मिळाले. सूत्रसंचालन प्रा. संतोष कांबळे यांनी तर आभार प्रा. चित्रा जांभळे यांनी मानले.

---

# तरुणाला जातीवाचक शिवीगाळ; ॲट्रॉसिटीचा गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ फेब्रुवारी-**

शहरातील बाळेश्वर नाका येथे एका युवकास जबर मारहाण करुन जातीवाचक शिवीगाळी केल्याची घटना घडली आहे. आकाश सुभाष खुणे (रा. सोलापूर रोड, बार्शी) या युवकाने दिलेल्या जबाबानुसार, ओम क्षीरसागर (रा. कासारवाडी रोड, बार्शी) व त्याच्या साथीदारांनी हा हल्ला केला. याबाबत बार्शी शहर पोलिसांत ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला आहे.

दि. २१ फेब्रुवारी रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास आकाश खुणे आणि त्याचा मित्र सिद्धार्थ शेवते जेवणासाठी बार्शी-कुर्दुवाडी रोडवरील हॉटेल गौरी येथे गेले होते. त्याच वेळी ओम क्षीरसागर आणि त्याच्यासोबत असलेल्या दोन अनोळखी इसमांशी किरकोळ वाद झाला होता. त्यानंतर रात्री १०.४५ च्या सुमारास आकाश आपल्या मित्रांसह घराजवळ बसला असताना ओम क्षीरसागर पुन्हा तेथे आला आणि भांडण मिटवण्याच्या बहाण्याने त्याला मोटारसायकलवरुन बाळेश्वर नाका येथे घेऊन गेला. तेथे आधीपासूनच तिघेजण उपस्थित होते. ओमने मी पाणी घेऊन येतो, असे सांगून निघून गेल्यावर तिघांनी आकाशला जबरदस्तीने मोटारसायकलवर बसवून कासारवाडी रोडवरील पवार प्लॉट येथे नेले. तेथे त्यांनी त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यानंतर ओम क्षीरसागर परत आला आणि लोखंडी गजाने आकाशच्या डाव्या पायावर जोरदार मारहाण करुन गंभीर जखमी केले. यावेळी त्याने जातीवाचक शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली, असे फिर्यादीत म्हटले आहे. या हल्ल्यानंतर आकाशने ११२ पोलीस हेल्पलाईनवर संपर्क साधून घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि जखमी अवस्थेत त्याला उपचारासाठी जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी येथे दाखल केले. सद्यस्थितीत त्याच्यावर उपचार सुरु आहेत. याप्रकरणी ओम क्षीरसागर आणि त्याच्या तीन साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

# उद्यापासून कर्मवीर चषक पासिंग व्हॉलिबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ फेब्रुवारी-**



शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय आयोजित कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त भव्य कर्मवीर चषक राज्यस्तरीय निमंत्रितांची पासिंग व्हॉलिबॉल स्पर्धा २०२५ चे आयोजन दि. २७ व २८ फेब्रुवारी रोजी अध्यापक विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ दि. २७ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता पार पडणार आहे. या उद्घाटन समारंभासाठी राष्ट्रीय हॉलीबॉल खेळाडू अरुण बारबोले, जयकुमार शितोळे, शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाच्या शालेय समितीचे चेअरमन डॉ. जी. एम. पाटील हे उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेसाठी जवळपास दहा संघाने आतापर्यंत नोंदणी केलेली आहे. यामध्ये मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, लातूर, सोलापूर, धाराशिव, खामगाव, बार्शी अशा विविध ठिकाणाहून राज्यातून संघ येणार आहेत. या स्पर्धेसाठी विजेत्या संघांना रोख रक्कम व ट्रॉफी देण्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. प्रथम क्रमांकाचे बक्षीस रुपये १५ हजार व ट्रॉफी हे श्री रमेश घोलप, जिल्हाधिकारी चतरा, झारखंड यांच्यातर्फे देण्यात येणार आहे. द्वितीय १० हजार रुपयाचं बक्षीस रोख रक्कम व ट्रॉफी हे धीरज मांजरे, तहसीलदार, संगमनेर, जि. अहिल्यानगर यांच्यामार्फत देण्यात येणार आहे. तृतीय बक्षीस रुपये सात हजार हे ठोंबरे एजन्सीज बार्शी यांच्यातर्फे देण्यात येणार आहे. तर चतुर्थ बक्षीस साई डेव्हलपर्स यांच्यामार्फत देण्यात येणार आहे. बक्षीस वितरणाचा कार्यक्रम हा दि. २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजता आयोजित केलेला आहे. बक्षीस वितरणासाठी राष्ट्रीय खेळाडू सुभाष सद्दीवाल, किसन पवार, संस्थेचे सचिव पी. टी. पाटील उपस्थित राहणार आहेत. सर्व संघाची राहण्याची तसेच भोजनाची व्यवस्था ही करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे नियोजन हे शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केलेले आहे.

---




# कुसमोड येथे प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेअंतर्गत मंजूरी पत्राचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २५ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत मंजुर ५३ लाभार्थींना मंजुरी आदेश वाटपाचा व घरकुल बांधकाम मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन कुसमोड येथे सरपंच महावीर धायगुडे, उपसरपंच स्वाती मदने,ग्रामपंचायत सदस्य बाळकृष्ण धायगुडे यांच्या व लाभार्थी ज्ञानेश्वर धायगुडे, विनायक मदने, श्रीमंत लेंगरे, अनिल धायगुडे, वैभव मदने,अनिल धायगुडे, सचिन व्होनमाने,कचरे, बोडरे, माने, उमाजी बोडरे उपस्थित होते. सदरच्या घरकुलांना दोन लाख रुपये एवढे अनुदान, सोलर सिस्टीम, शौचालय, वाळू पुरविणे तर ज्या लाभार्थींना जागा नाही त्यासाठी पन्नास हजारांऐवजी एक लाख रुपये निधी देणार आहे. यामुळे महागाईच्या काळात सर्व सामान्यांना दिलासा मिळाला आहे.

> भाजपा सरकारने एवढया मोठ्या प्रमाणात घरकुल देऊन दिलासा तर दिला आहेच पण महागाईच्या काळात अनुदान दोन लाख रुपये केले आहे तसेच सोलर सिस्टीम बसविणार आहेत .यामुळे सर्व सामान्यांना फार मोठा फायदा होणार आहे. हा भाजपा सरकारचा सर्व सामान्यांसाठी ऐतिहासिक निर्णय आहे
>
> **- विलास मदने-पाटील, लाभार्थी**

---

# महालिंगेश्वर मंदिरात आज कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २५ फेब्रुवारी-**

मोडनिंब (ता.माढा) येथील श्री महालिंगेश्वर मंदिरात महाशिवरात्री निमित्त शिवलीलामृत ११ वा अध्याय व जप होणार असल्याची माहिती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष किरण तोडकरी यांनी दिली. त्यानंतर दुपारी पंढरपूर येथील सिध्दिविनायक महिला भजनी मंडळ यांचा संकीर्तन भजनाचा कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी शहरातून पालखी सोहळा होणार असून त्यानंतर महाआरती होणार आहे. महाशिवरात्री निमित्त महालिंगेश्वर मंदिरात भाविकांसाठी दिवसभर फराळाचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिर परिसराची स्वच्छता करून फुलांची सजावट करण्यात आली. श्री महालिंगेश्वर देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष परिमल तोडकरी, सचिव जयंत समुद्र पुजारी चंदन गुरव, शिवराज पाटील आदी उपस्थित होते.

---



# डॉ. तारानाथ स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**अणदूर, दि.२५ फेब्रुवारी-**

तुळजापूर तालुक्यातील नंदगाव येथील डॉ. तारानाथ इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेल उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिध्देश्वर कोरे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून हंगरगा (नळ) चे सरपंच अतुल कलशेट्टी, बोरगावचे चेअरमन बसवंत मुळे, डॉ. स्वास्तिक शहा, राजेंद्र पाटिल, लोहगावचे माजी ग्रामपंचायत सदस्य निजाम शेख, पत्रकार अजय अणदूरकर, सचिन तोग्गी, मल्लीनाथ गुड्डे, प्रज्वला शेवाळे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष आकाश मंगरूळे, उपाध्यक्ष गुलाब नदाफ, सागर पाटील, निल्लाप्पा समन उपस्थित होते. स्नेह संमेलनाची सुरुवात स्वागत गीताच्या नृत्याने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेली हिंदी, मराठी गितासह शेतकरी गीत, कोळीनृत्य, देशभक्तीपर गीताने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका गिरीजा शहा, सहशिक्षक लखन देडे, सारिका चीनगुडे, तबसुम बागवान,ज्योती निरगुंडे, विठाई डमडरे, प्रज्ञा निरगुंडे, प्रीती करंडे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन लखन देडे तर प्रास्ताविक गीरीजा शहा व आभार निहारिका शहा यांनी मानले.

---

# टेंभुर्णीत राज्यस्तरीय वैद्यकीय परिषद संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. २५ फेब्रुवारी-**




डॉक्टर्स असोसिएशन टेंभुर्णी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली एकदिवसीय राज्यस्तरीय वैद्यकीय परिषद टेंभुर्णीकॉन-२०२५ संत सावता माळी मंगल कार्यालय, अकलूज रोड टेंभुर्णी येथे संपन्न झाली.

या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी राज्यभरातून मान्यवर डॉक्टर्स उपस्थित होते. डॉ.एम के इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली व वळसंगकर हॉस्पिटलचे डॉ शिरीष वळसंगकर सर , अपेक्स हॉस्पिटल अकलूजचे डॉ राजीव कविटकर-राणे, डॉक्टर्स असोसिएशन टेंभुर्णीचे अध्यक्ष डॉ उमेश झाडबुके , टेंभुर्णीकॉनचे कार्याध्यक्ष डॉ पांडुरंग गायकवाड व महिला प्रतिनिधी डॉ स्मिता भोसले, सोलापूर निमाचे (खझझ)डॉ रवि गायकवाड, डॉ तानाजी कदम, डॉ अंजली कदम व कविवर्य नारायण सुमंत यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले.

यावेळी दरवर्षी प्रमाणे डॉक्टर्स असोसिएशन टेंभुर्णीच्या वतीने देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. डॉ. भरत त्रिवेदी, डॉ. औदुंबर पावले व डॉ शीतल मेहता यांना त्यांनी केलेल्या अथक रूग्ण सेवेसाठी सन २०२५ चा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच तीन चार महिन्यांपूर्वी डॉ सचिन ढवळे यांच्या मुलाचा दुर्दैवी अपघात झाला होता, कोणी मदतीसाठी पुढे येत नव्हते पण श्री नितीन हुंबे यांनी एखाद्या देवदूताप्रमाणे, कसलाही विचार न करता धैर्य व धाडस करून त्या मुलास हॉस्पिटलमध्ये पोचवले व त्याचे प्राण वाचले. या देवदूतास देवदूत पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तर राष्ट्रीय पातळीवर ऑलिंपिक खेळलेल्या खेळाडू पराभूत करत धनुर्विद्यामध्ये दोन सुवर्णपदके जिंकून टेंभुर्णीचा नावलौकिक वाढविल्याबद्दल कु. गाथा आनंदराव खडके हीस अर्जुन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. डॉ. अमोल माने-शेंडगे, डॉ. शिवराज भोसले, डॉ जमदाडे, डॉ. सुरेश व्यवहारे, डॉ. लालासाहेब शेंडगे, डॉ. अमोल घाडगे, डॉ. विजयकुमार चोपडे, बालरोग तज्ज्ञ डॉ. कदम, डॉ. रमाकांत आयाचित, डॉ.जड्डीमनी, डॉ. प्रवीण पाटील, डॉ. मनोज भायगुडे डॉ श्री व सौ प्रशांत कोल्हे आदी डॉक्टर्स उपस्थित होते. सर्वांना टेंभुर्णीकॉन-२०२५ स्मरणिकेचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचलन डॉ आनंदराव खडके व डॉ सचिन खटके यांनी केले.डॉ पांडुरंग गायकवाड यांनी आभार मानले.

## संक्षिप्त वृत्त

### उच्च व तंत्रशिक्षण तथा संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील उद्या सोलापुरात

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**



राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण तथा संसदीय कार्य मंत्री  चंद्रकांतदादा पाटील हे सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे. गुरुवार दि.२७ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.३० वाजता  कोथरूड निवासस्थान, पुणे येथून वाहनाने सोलापूरकडे प्रयाण, सकाळी १०.३० वाजता सोलापूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. दुपारी १२.०० वाजता सोलापूर येथून वाहनाने बार्शी जिल्हा सोलापूरकडे प्रयाण, दुपारी १.०० वाजता बार्शी येथे माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या निवासस्थानी आगमन व राखीव, दुपारी ३.०० वाजता बार्शी, जिल्हा सोलापूर येथून वाहनाने पुणेकडे प्रयाण करतील.

### संजय नगर कुमठा नाका जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी रोहन गायकवाड

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंती निमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती संजय नगर कुमठा नाका सोलापूर नविन पदाधिकारी निवड बैठक समितीचे संस्थापक प्रवीण निकाळजे यांच्या उपस्थितीत करण्यात आली. अध्यक्ष म्हणून रोहन गायकवाड यांची तर उपाध्यक्षपदी प्रवीण माने यांची निवड करण्यात आली. अन्य पदाधिकारी असे :सचिव-समर्थ जगधाने, सहसचिव-श्रीजित ओगे, खजिनदार- दत्ता गायकवाड, मिरवणूक प्रमुख-फहीम सय्यद, शीतल माने,विरेश येवले, राज साबळे, जक्रिया सय्यद. सल्लागार-दिपक भोसले, श्रीधर काटकर,सुनील गायकवाड, शैलेश घाडगे, महेश मस्के, सुधीर शिंदे,सिद्राम रामनवर, रेणुका चलवादी, सुरेखा साबळे, माई शिवशरण.

### बंथनाळ मठात आज विविध कार्यक्रम

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**



जुळे सोलापूर येथील बंथनाळ मठात महाशिवरात्री निमित्त येथे दि.२६ फेब्रुवारी, बुधवार रोजी महाशिवरात्री निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे ५ वाजता महारुद्र अभिषेक व महाआरती करण्यात येईल. महाशिवरात्री निमित्त १० ते रात्री १० वाजेपर्यंत प्रसाद वाटप संध्याकाळी ६ वाजता भक्ति जागरण भजन, रात्री ७ वाजता दीपोत्सव कार्यक्रम होणार आहे. हा कार्यक्रम रात्री १० पर्यंत चालेल शिव महादेवाचे रूपचे दर्शन भाविकांसाठी दिवसभर दर्शन खुले ठेवण्यात आले आहे, अशी माहिती महेश घाडगे यांनी दिली.



### दयानंद महाविद्यालयात संविधानाचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय व दयानंद विधी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संविधानाचा अमृत महोत्सव या उपक्रमांतर्गत 'भारतीय संविधानातील मुल्य धर्मनिरपेक्षता' या विषयावर प्रा.डॉ. प्रदीप जगताप यांचे व्याख्यान शुक्रवारी आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. एस. जे. गायकवाड ह्या होते. प्रा. डॉ. प्रदीप जगताप यांनी आपल्या भाषणात समानतेचा हक्क, जगण्याचा धार्मिक हक्क याविषयी घटनात्मक तरतुदी सांगितल्या. भारतीय संविधानामुळे हा देश आजपर्यंत अखंड राष्ट्रीय एकात्मता टिकवून आहे. संविधान साक्षरता व संविधानात्मक नागरिकांची, राज्यकर्ते प्रशासक यांना कायद्याची ओळख होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. बी.एच. दामजी यांनी केले.कार्यक्रमाचा उद्देश व प्रास्ताविक प्रा.मोहन कटप यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय व आभार प्रा. जी.एस. घनाते यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अष्टमी माशाळकर हिने केले. कार्यक्रमास प्रा. एस.जी. दंतकाळे, प्रा. अरविंद देढे, प्रा. रवींद्र चलवादी, प्रा. प्रथमेश शिंदे, प्रा. शटगार, प्रा.बुगडे, प्रा. रेखा मलजी, प्रा. हिंगमिरे, प्रा. गढवालकर, प्रा. स्वप्ना वळसंगे, प्रा. रेखा परदेशी व प्रा.के.जे. राठोड यांच्यासमवेत बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# ऊन वाढले तरी शाळांच्या वेळा जैसे थे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**



सोलापूर जिल्ह्यात फेब्रुवारी महिन्यातच ऊन्हाचा पारा वाढत चालल्याने जिल्हा परीषद शाळेच्या मुलांना पाणीटंचाईसह ऊन्हाच्या झळा सहन करावे लागत आहे. म्हणून अनेक पालक व शिक्षक संघटनांकडून सकाळच्या सत्रात शाळा भरविण्याची मागणी करण्यात येत आहे . मात्र शिक्षण विभागाकडून शाळांच्या वेळेत बदल नसल्याचे सांगण्यात येत आहे.

माध्यमिक शाळांमध्ये दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू झाल्याने १० फेब्रुवारीपासून माध्यमिक शाळा सकाळच्या सत्रात भरत आहेत. फेब्रुवारी महिन्याच्या सुरूवातीपासूनच ऊन्हाचा पारा वाढत चालला आहे. त्यामुळे माध्यमिक शाळांप्रमाणे १ मार्चपासून जिल्हा परीषद प्राथमिक शाळा सुरू करण्याची मागणी होत आहे. मात्र जिल्हा परीषद शिक्षण समितीच्या निर्णयानंतरच शाळांच्या वेळेत बदल होण्याची शक्यता आहे. फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवडयात ऊन्हाने ३५ अंशाच्या पुढे पारा गाठला आहे. त्यामुळे अनेक वाडी वस्ती वरील शाळांच्या ठिकाणी पाणीटंचाई सुरू झाली आहे. शिवाय दिवसेंदिवस ऊन  वाढतच चालल्याने दुपारच्या सत्रात ऊष्माघातासारखी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक शाळा लोखंडी पत्र्यांच्या खोलीत असल्याने ऊन्हामुळे विद्यार्थ्यांना उकाडा सहन करावा लागत आहे. म्हणून पालक व शिक्षकांकडून शाळेच्या वेळेत बदल करून सकाळच्या सत्रात शाळा सुरू करण्याची मागणी होत आहे.

सध्या शनिवारी सकाळी साडे नऊ वाजता सकाळची शाळा भरते. मात्र अनेक ठिकाणी ऊन वाढत असल्याने सकाळी नऊ वाजण्याच्या आत शाळा भरविण्याची मागणी झाल्यानंतर प्राथमिक शिक्षण विभागाने त्यांच्या मागणीनुसार शनिवारसाठी वेळेत बदल सुचविला आहे. मात्र अनेक शाळा शनिवारी सकाळी साडेनऊ वाजता भरवून दुपारी साडेबारा वाजता सुट्टी देत आहेत. त्यामुळे भरदुपारी ऊन्हाच्या तीव्रतेत वाडी वस्तीला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना ऊन्हाचे चटके सहन करावे लागत आहे. म्हणून उर्वरित शाळांनीही शनिवारी नऊ वाजण्यापूर्वी शाळा भरविण्याची मागणी होत आहे. सोलापूर जिल्हा विस्तीर्ण पसरला आहे. सांगोलासारख्या माळरान व दुर्गम भागात दुपारच्या सत्रातील शाळांमुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. अनेक शाळांमध्ये पाणीटंचाई असल्याने मध्यान्ह भोजन व विद्यार्थ्यांसाठी पाणी मिळणे मुश्कील बनले आहे. शिवाय दुपारी ऊन्हामुळे उकाडा वाढून अध्यापनातही व्यत्यय येत आहे. त्यामुळे जिल्हा परीषद शाळा सकाळच्या सत्रात सुरू करून सकाळी आठ ते अकरा वेळ ठेवण्याची मागणी होत आहे.

#### प्राथमिक शाळांच्या वेळेत बदल नाही

अनेक तालुक्यातील शाळांनी शनिवारच्या शाळेची वेळ बदलण्याची मागणी केली असुन त्यांना वेळेत बदल सुचविला आहे. मात्र सर्वच शाळा सकाळच्या सत्रात सुरू करण्या संदर्भात अद्याप निर्णय झाला नाही. ऊन्हाची तीव्रता वाढत असल्याने जिल्हा परीषद शिक्षण समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात येईल.

**-कादर शेख, शिक्षण अधिकारी प्राथमिक , जिल्हा परीषद सोलापूर.**

#### सकाळी शाळा सुरू करा

ऊन्हाची तीव्रता वाढत असताना ३५ अंशाच्यावर पारा गेला आहे. ऊन्हाच्या तीव्रतेमुळे लहान मुलांना शाळेत पाणीटंचाई व उष्माघातसह अनेक समस्या उद्भवत आहेत. वाडी वस्तीवरील विद्यार्थ्यांना ऊन्हामुळे त्रास होत आहे. म्हणून प्राथमिक शिक्षण विभागाने शाळा सकाळच्या सत्रात आठ ते अकरा पर्यंत भरवावेत.

**- राम गोसावी, अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती, मंद्रुप**

#### पालकांकडून वेळेत बदल करण्याची मागणी

फेब्रुवारी महिन्यातच ऊन्हाच्या झळा बसत असल्याने वाडी वस्तीवरील पालकांकडून शाळा सकाळी भरविण्याची मागणी करण्यात येत आहे. वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार शाळा सुरू राहणार आहे.

**- प्रकाश कुंभार, केंद्रिय मुख्याद्यापक,जि.प. मुलांची शाळा मंद्रुप**



## परमेश्वर माळगे मित्र परिवारातर्फे प्रयागराज येथील गंगाजलाचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

परमेश्वर माळगे मित्र परिवाराच्या वतीने प्रयागराजमधील पवित्र त्रिवेणी संगमामधील गंगाजलाचे वितरण एक हजार कुटुंबियांना करण्यात आले. 'सनातन गर्व महाकुंभ पर्व' सनातन धर्मात अतिशय महत्त्वाचे असलेले अमृतस्नान यावर्षी १४४ वर्षांनी महाकुंभ मेळावा प्रयागराज मध्ये संपन्न होत आहे.

ज्यांना जाता आले नाही त्यांच्यासाठी माळगे मित्र परिवाराने पुढाकार घेतला असून परमेश्वर माळगे गंगाजलाचे वाटप करत आहेत. हे गंगाजल कल्याण नगर, आशिर्वाद नगर, समर्थ नगर, सिद्धेश्वर नगर, संस्कार शाळा व बॉम्बे पार्क व जुळे सोलापूर येथील कुटुंबीयांना घरपोच देण्यात आले. महाशिवरात्रीच्या दिवशी पवित्र गंगाजलाने पूजापाठ करावी, असे आवाहन परमेश्वर मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. गंगाजल वाटपासाठी ज्येष्ठ समाज सेवक प्रकाश कुलकर्णी, शंकर माने, सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर माळगे, गोरख चौधरी, धर्मराज नाशी, राम चौधरी, रितेश किलजे, ओंकार भंडारी, हर्षद काकडे, प्रथमेश माळगे, ओंकार कुलकर्णी, कमलेश गोरे, गुरु वाकीटोळ यांचे सहकार्य लाभले.

## रक्तपेढ्यांसाठी आधुनीक उपकरणे ही काळाची गरज : डॉ. सुहासिनी शहा

▶▶ प्रिसिजन फाऊंडेशनकडून डॉ. हेडगेवार रक्तपेढीस १६ लाखांची मशीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ फेब्रुवारी-**

रक्ताची तपासणी करुन जास्तीत जास्त उपयुक्त रक्त गरजु रुग्णांपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच कमी वेळेत दर्जेदार सेवा देता यावी, यासाठी रक्तपेढ्यांकडे आधुनिक उपकरणे असणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रिसिजन फौंडेशनच्या अध्यक्षा डॉ.सुहासिनी शहा यांनी केले.

डॉ. हेडगेवार रक्तपेढीस प्रिसिजन फौंडेशनच्या वतीने सी.एस.आर.फंडातून १६ लाखांची सेंट्रीफ्युज मशिन देण्यात आली. त्याच्या हस्तांतरण कार्यक्रमात डॉ. शहा बोलत होत्या. यावेळी रक्तपेढीचे अध्यक्ष रमेश विश्वरुपे, उपाध्यक्ष विष्णुदास मालु, कोषाध्यक्ष सुहास जोशी, संचालक डॉ. विजय शिवपुजे, मिलींद फडके, प्रकाश कुलकर्णी, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुमेधा कंदलगांवकर तसेच माधव देशपांडे उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. शहा म्हणाल्या, एका रक्तदात्यामुळे तीन जणांचे जीव वाचविता येते. उन्हाळ्यात रक्ताचा तुटवडा जाणवतो, अशा वेळेस रक्तदात्यांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. रक्तदान चळवळीचा तो महत्त्वाचा घटक आहे. रक्तपेढीचे अध्यक्ष रमेश विश्वरुपे म्हणाले, डॉ. हेडगेवार रक्तपेढीकडून थॅलेसेमिया, सिकलसेल, हिमोफिलीया, कॅन्सर, स्वेच्छा रक्तदाते, गरीब रुग्ण यांना मोफत वा सवलतीने रक्तघटक पुरवठा केला जातो. त्यासाठी रक्तपेढींना अशा सामाजिक संस्थांनी सी.एस.आर. च्या माध्यमातून निधी दिला तर रक्तपेढ्या अधिक सक्षमतेने काम करतील. प्रारंभी रक्तपेढीचे अध्यक्ष विश्वरुपे यांनी डॉ. शहा यांचे पुष्पगुच्छ, शाल आणि प्रयागराज येथील त्रिवेणी संगमातील गंगाजल देऊन स्वागत केले. त्यानंतर सेंट्रीफ्युज मशिन कक्षाचे उद्घाटन डॉ. शहा यांच्याहस्ते करण्यात आले. प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष सुहास जोशी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व्यवस्थापक रंगनाथ जोशी यांनी करुन दिला. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी संगिता मेंथे-कोरे यांनी केला.



**सोलापूर : डॉ. हेडगेवार रक्तपेढीस देण्यात आलेल्या सेंट्रीफ्युज मशिन कक्षाचे फित कापून उद्घाटन करताना डॉ. सुहासिनी शहा आणि रक्तपेढीचे पदाधिकारी संचालक.**

## संभाजी ब्रिगेडच्यावतीने प्रशांत कोरटकर याच्या प्रतिमेला जोडेमार आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी -**

राष्ट्रमाता जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या बद्दल गलिच्छ वक्तव्य करून जेम्स लेण्याच्या विकृत लेखनाचे समर्थन करणाऱ्या प्रशांत कोरडकर याच्या प्रतिमेला संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर जोडेमार आंदोलन करण्यात आले.




सोशल मीडियावरील क्लिपची चौकशी गुन्हा दाखल करून इतिहासकार इंद्रजीत सावंत यांना तात्काळ पोलीस संरक्षण देण्याची मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोलापूरचे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे व ईमेलद्वारे करण्यात आली.

विविध माध्यमांचा वापर करून समाजामध्ये जातीय तीळ निर्माण करण्याचा प्रयत्न वारंवार होत असतो अशा प्रयत्नातून इतिहासाची प्रचंड तोडफोड केली जाते आणि चुकीचा इतिहास लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न होत असतो इतिहास अशा प्रयत्नामुळे कधीही बदलत नाही आणि खरा इतिहासच लोकांच्या समोर आणण्याचे काम इतिहास तज्ञ करीत असतात. कोल्हापुरातील इतिहास तज्ञ इंद्रजीत सावंत यांनी ऐतिहासिक दाखल्यावरून केलेल्या काही वक्तव्यावरून नाराज झालेल्या एका व्यक्तीने त्यांना फोन करून प्रचंड शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिली आहे. सदर व्यक्तीने आपल्या नावाच्या आणि जातीचा हे उल्लेख करत सदर धमकी देताना केलेला असणे अत्यंत अशोबनीय आणि निंदनीय आहे. देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री आहात आणि या राज्यातील सर्व जाती धर्माच्या लोकांचे प्रमुख आहेत सदर व्यक्तीने दिलेल्या धमकी बद्दल पुढील कारवाई तर होईलच तथापि मुख्यमंत्री म्हणून आपल्या नावाचा स्पष्ट समावेश असल्याने सदर प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी बाजू मांडणे अत्यंत आवश्यक असून याप्रकरणी मुख्यमंत्र्यांनी खुलासा करणे आणि इतिहास तज्ञ इंद्रजीत सावंत यांना योग्य ती सुरक्षा पुरवणे अत्यंत आवश्यक आहे अन्यथा धमकी देणाऱ्याला मुख्यमंत्री यांनी पाठीशी घातल्यासारखे होईल आणि यापुढे आपल्या नावाचा कोणीही गैरवापर करेल तरी आपण त्वरित खुलासा व योग्य ती कारवाई करावी ही मागणी संभाजी ब्रिगेडचे वतीने करण्यात आली आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, कार्याध्यक्ष अरविंद शेळके, संपर्कप्रमुख छत्रगुण माने, दक्षिण तालुका अध्यक्ष शेखर चौगुले, संभाजी ब्रिगेड वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेश कदम, रमेश भंडारे, संदीप सरोदे, शेखर कंटीकर आदी उपस्थित होते.

## सावंत यांना धमकी देणाऱ्या कोरटकरवर कारवाई करा

### सकल मराठा समाजाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेले अपमान कारक वक्तव्य आणि इंद्रजीत सावंत यांना धमकी देणाऱ्या प्रशांत कोरटकर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

इंद्रजीत सावंत सरांना मिळालेल्या धमकीबद्दल तसेच छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेले वक्तव्य ऐकून दुःख झाले. मुख्यमंत्री यांचे नाव घेऊन प्रशांत कोरटकर नावाचा एक मराठाद्रोही ब्राम्हण धमक्या देत आहे. मराठ्यांना आणि इंद्रजीत सावंत यांना अशा धमक्या नवीन नाहीत. पण यांचे शिवरायांच्या बद्दलचे विचार किती घाणेरडे आहेत.

हे व्हायरल रेकॉर्डिंग वरून स्पष्ट होत आहे.  राज्य सरकारने सदर व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करावी. सावंत यांना संरक्षण आमच्यासाठी महत्त्वाचं आहे. या कठीण प्रसंगात आम्ही तुमच्यासोबत आहोत. त्या व्यक्तीस कठोर शासन राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री करतील हा विश्वास आहे. नाही केले तर लोकशाही मार्गाने ठोकशाही अवलंबून छत्रपती शिवाजी महाराजांविरोधात गरळ ओकणाऱ्या आणि इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी देणाऱ्याला शिक्षा करण्यास आम्ही समर्थ आहोत.

## महावितरणचे टेलिस्कोपिक बिल लागू होण्याआधी सोलर सिस्टम बुक करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**





संपतकुमार धूत

महावितरणच्या सुधारित टेलिस्कोपिक बिलिंगमुळे सौर ग्राहकांच्या बिलांमध्ये होणार वाढ होणार आहे. त्यामुळे  सुधारित टेलिस्कोपिक बिलिंग लागू होण्यापूर्वी सोलार सिस्टीम बुक करण्याचे फायदेशीर ठरेल, असे मत एल्ग्रीस सोलर सिस्टमचे व्यवस्थापकीय संचालक संपतकुमार धूत यानी केले आहे.

त्यामुळे सौर ग्राहकांच्या बिलांमध्ये वाढ आधीच आपली सिस्टम बुक करण्यासाठी इच्छुक ग्राहकांनी एल्ग्रीस सोलरशी ०२० ७१५३ ००२७ संपर्क साधावा. महावितरणने जाहीर केलेल्या निवेदनात सध्या, जर ग्राहक ५२० यूनिट्स वापरत असेल, ज्यापैकी ४०० सौरऊर्जे पासून निर्माण होत असतील आणि उर्वरित १२० तो महावितरणकडून खरेदी करत असेल, तर त्यांना सुरुवातीच्या स्लॅबनुसार

N.R. Dhoot Group
ELGRIS
Solar Roof Top Systems

१२० यूनिट्ससाठी बिल भरावे लागेल, ज्याचे दर कमी आहेत.

तथापि, आता महावितरणने प्रस्तावित केले आहे की सौरऊर्जेपासून मोफत निर्माण होणाऱ्या ४०० युनिट्सचा प्रारंभिक दर स्लॅब अंतर्गत विचार केला जाईल, तर महावितरणकडून खरेदी केलेले १२० युनिट्स, ज्यावर बिल भरावे लागेल, त्या उच्च स्लॅबमध्ये जातील, ज्यांचे दर जास्त आहेत, असे सौर ऊर्जा तज्ञ संपतकुमार धूत म्हणाले.

**टेलिस्कोपिक बिलिंग म्हणजे काय?**

उपभोगाच्या प्रत्येक स्लॅबसाठी ऊर्जा शुल्क (टेरिफ) बदलले जाते, उच्च वापराच्या स्लॅबवर हळूहळू वाढणारे दर आकारले जातात. याला टेलिस्कोपिक विलिंग म्हणतात.  हा नवीन प्रस्ताव १ एप्रिल, २०२५ पासून लागू होण्याची शक्यता तज्ञांनी वर्तविली आहे.

## बाजार समिती निवडणूक; सुनावणी पुन्हा लांबणीवर

● उच्च न्यायालयातील न्यायाधीश रजेवर गेल्याने निवडणुकीची सुनावणी गेली पुढे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ फेब्रुवारी**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकी संदर्भातील उच्च न्यायालयात प्रलंबित असलेली सुनावणी आज मंगळवार दि.२५ फेब्रुवारी रोजी संपन्न होणार होती. परंतु उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीशच रजेवर गेल्याने सदरची सुनावणी होऊ शकली नाही. त्यामुळे ही सुनावणी पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आली आहे

दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकी संदर्भात सुनावणी संपन्न होणार होती. परंतु उच्च न्यायालयाच्या बोर्डावर सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकी संदर्भातील विषय आला नसल्याने यावर सुनावणी होऊ शकली नव्हती. मात्र आजच्या सुनावणीकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. कारण आज यावर अंतिम सुनावणी होईल अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र तसे होऊ शकले नाही. बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीचा बिगुल यापूर्वीच वाजला होता.

परंतु विधानसभा निवडणुकीमुळे बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया ३१ डिसेंबर पर्यंत स्थगित करून यापुढे निवडणुकीचे प्रक्रिया ज्या टप्प्यावर थांबवली होती त्या टप्प्यावरून सुरू करण्यासंबंधी आदेश देण्यात आले होते. परंतु प्रारूप मतदार यादीचा विषय समोर आल्याने पुन्हा एकदा निवडणुकीची प्रक्रिया स्थगित करण्यात आली. त्यावरच उच्च न्यायालयात अंतिम सुनावणी होईल. असे सांगण्यात येत होते.

परंतु पुन्हा एकदा ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे. सदरची सुनावणी यापुढे कधी होईल. याबाबत येत्या दोन दिवसात माहिती मिळेल असेही यावेळी सांगण्यात आले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक
**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अज्ञात रिक्षा चालकाच्या धडकेत वृध्दाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**
मडके वस्ती येथील रस्ता ओलांडत असताना अज्ञात रिक्षा चालकाने दिलेल्या धडकेत वृद्ध व्यक्तीचा मृत्यू झाला. हा अपघात ४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडला.

शिवाजी शिरसागर (वय ६९ रा शिवाजीनगर बाळे) असे अपघातात मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याबाबत लता शिवाजी सिरसागर (वय ५९ रा शिवाजीनगर बाळे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात रिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेच्या दिवशी म्हणजेच ४ फेब्रुवारी रोजी यातील फिर्यादी यांचे पती शिवाजी हे मडके वस्ती येथील रस्ता ओलांडत होते. त्यावेळी तेथून जात असलेल्या अज्ञात रिक्षा चालकाने त्यांना धडक दिली. यात शिवाजी हे गंभीर जखमी होऊन मृत पावले. याबाबत २४ फेब्रुवारी रोजी फिर्याद दिली असून हवालदार परीट तपास करत आहेत.



### ▸▸संक्षिप्त वृत्त...

### कौटुंबिक वाद मिटविण्यासाठी गेलेल्या काकास मारहाण

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी -**
पुतणीच्या सासरी त्यांचा कौटुंबिक वाद मिटविण्यासाठी गेल्यानंतर विटाणे डोक्यात मारून काकाला जखमी करण्यात आले. हा प्रकार २३ फेब्रुवारी रोजी रात्री आठ पंधराच्या सुमारास न्यू पाच्छा पेठेत घडला. प्रवीण कुमार दशरथ कोंतम (वय ३२, रा. कुमार स्वामी नगर सोलापूर) असे मारहाण झालेल्या काकाचे नाव आहे. यातील जखमी प्रवीण यांची पुतणी रक्षिता बिंगी हिच्या सासरी कौटुंबिक वाद झाला होता. तो मिटविण्यासाठी प्रवीण त्यांची पत्नी व पुतणी रक्षिता असे तिघेजण गेले होते. त्या ठिकाणी झालेल्या चर्चेतून त्यांच्यात वाद झाला. या वादातून सागर बिंगी याने तेथे पडलेली विट उचलून प्रवीण यांच्या डोक्यात मारून जखमी केले. याबाबत प्रवीण कोंतम यांनी दिलेले फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात सागर बिंगी व अंबादास बिंगी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या गुन्ह्याचा तपास हवालदार गायकवाड करत आहेत.

### अवंतीनगर येथून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी -**
शहरातील जुना पूना नाका परिसरातील अवंती नगर येथून चोरट्याने १५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली.याबाबत माणकराम भवरूराम राईका (वय ३४, रा. अवंती नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ डिसेंबर २०२४ रोजी माणकराम राईका यांनी त्यांची एमएच १३ डीएफ ८६८७ क्रमांकाची दुचाकी हॅन्डल लॉक करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार पाडवी पुढील तपास करीत आहेत.

# राज्यातील पावणेदोनशे लाचखोरांना कारवाई अभावी १३ वर्षांपासून अभय

**● वर्ग एकच्या ३०, दोनच्या २९ अन् वर्ग तीनच्या १०६ अधिकाऱ्यांचा समावेश**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी -**
राज्यामधील पावणेदोनशे लाचखोरांना कारवाईअभावी तब्बल १३ वर्षांपासून अभय मिळाल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने प्रसिद्ध केलेल्या माहितीवरून समोर आले आहे. यात वर्ग एकचे ३०, वर्ग दोनचे २९, तर वर्ग तीनच्या १०६ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

लाचखोर अधिकारी-कर्मचाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचे काम लाचलुचपत प्रतिबंधात्मक विभागाकडून केले जाते. लाचेबाबत नागरिकांनी केलेल्या तक्रारीची तत्काळ दखल एसीबीकडून घेतली जाते. असे असले तरी अनेक सरकारी कार्यालयातील खाबुगिरी काही थांबण्याचे नाव घेत नाही. त्यातच लाचेच्या हव्यासापोटी सामान्य



नागरिकांना वेठीस धरणाऱ्या लाचखोरांना कारागृहाची हवादेखील खाण्यासाठी पाठवले जाते. त्यानंतर त्यांच्यावर निलंबनाची कारवाईही होते. मात्र, काहींना कारवाईपासून अभय मिळतो. असेच अभय राज्यातील पावणेदोनशे सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना २०१२ पासून मिळत आल्याचे निदर्शनास आले आहे.

कारण त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली नाही. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अहवालात तशी नोंदसुद्धा आहे.

| निलंबन न झालेल्या लाचखोरांत शिक्षण विभाग अव्वल | |
|---|---|
| शिक्षण विभाग | ४१ |
| नगरविकास | ३६ |
| मनपा, नगरपालिका, पोलिस, कारागृह, होमगार्ड | २५ |
| जिल्हा परिषद, पंचायत समिती | १७ |
| महसूल, नोंदणी, भूमी अभिलेख | १७ |
| ऊर्जा, उद्योग, कामगार विभाग | ०५ |
| आरोग्य विभाग | ०५ |

| सर्वाधिक निलंबन न झालेल्यांमध्ये | |
|---|---|
| मुंबई विभाग | ४६ |
| ठाणे | ३८ |
| औरंगाबाद | २२ |
| पुणे | १८ |
| नाशिक | १६ |
| नागपूर | १२ |
| अमरावती | ११ |
| नांदेड | १० |
| मुंबई विभाग | ४६ |
| ठाणे | ३८ |

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकारात परिस्थितीचे मूल्यमापन करून निलंबनाची गरज नाही असे ठरवले, तर निलंबन होत नाही. प्रशासनाला वाटत असेल की, संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी सेवेत राहूनही चौकशीत अडथळा आणणार नाही, तर निलंबन टाळले जाते. संबंधित कर्मचाऱ्याने न्यायालयात दाद मागितली आणि न्यायालयाने निलंबनावर स्थगिती दिली, तर तो सेवेत राहतो. सेवानिवृत्तीला कमी कालावधी उरला असल्यास काही वेळा निलंबन होत नाही. काही प्रकरणांत अधिकाऱ्याला चौकशी पूर्ण होईपर्यंत सेवा बजावण्याची मुभा दिली जाऊ शकते.

### विवाहितेच्या छळप्रकरणी चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर :** विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह चौघांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत किर्ती भालचंद्र दाभाडे (वय ४४, रा. उमेदपूर कॉलनी, सेटलमेंट कॉलनी नं. ६, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती भालचंद्र (रा. ज्ञानदा अपार्टमेंट, पवन नगर, सिडको, नाशिक), तनुजा जितेंद्र बाबुळगावकर, जितेंद्र बाबुळगावकर, माधव दाभाडे (रा. रंगराज गल्ली, सराफ मार्केट, नांदेड) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल आला. किर्ती या नाशिक येथे सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती भालचंद्र व त्याच्या घरातील लोकांनी किर्ती यांना मारहाण करून मानसिक व शारीरीक त्रास देऊन तुझ्या वडीलांनी लग्नात सोने घातले नाही व फर्निचर दिले नाही म्हणून घरातून हाकलून दिले. पोलिस हवालदार मुलाणी तपास करीत आहेत.

## पतीचे कान भरणाऱ्या नंदेसह पाचजणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी -**
लग्नात मानपान केला नसल्याच्या कारणातून पतीचे कान भरणाऱ्या दोन नंनदासह पाचजणांविरुद्ध विवाहितेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शिल्पा चव्हाण (वय २८, रा. मित्र नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती अनिल चव्हाण, सासू निर्मला, सासरे शिवाजी व नणंद उषा व सुरेखा राठोड (रा. बोरामणी) यांच्याविरुद्ध एम आयडीसी पोलीस ठाण्यास गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जून २०१९ ते मे २०२४ या काळात फिर्यादी सासरी नांदण्यास होत्या. त्या काळात वरील आरोपीत हे लग्नात मानपान तसेच सोने तसेच हुंडा दिला नसल्याच्या कारणातून त्रास देत होते. त्याचबरोबर माहेरील लोकांना शिवीगाळ करून विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करत होते. उषा आणि सुरेखा या विवाहितेच्या पतीला विवाहितेला माहेरातून सोने व पैसे आणण्यात सांग अन्यथा तिला सोडून दे आम्ही तुझे दुसरे लग्न लावू असे म्हणून कान भरत होते. या गुन्ह्याचा तपास हवालदार जगताप करत आहेत.

## पती-पत्नीचा वाद; मेव्हण्याने भावजीला केली मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी -**
मुलांना घरात सोडून गेल्याचा जाब पत्नीला विचारात असताना मेहुण्याने भाऊजीला मारहाण केली. हा प्रकार स्वागत नगर येथे २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजता घडला.

सिद्धाराम रघुनाथ माडगे (वय ३२, या. स्वागत नगर, सोलापूर) असे मारहाण झालेल्या भाऊजीचे नाव आहे. घटनेच्या एक दिवस अगोदर यातील जखमी सिद्धाराम याची पत्नी वंदना ही घरातून निघून गेली होती. त्यावेळी तिने मुलांना घरीच सोडले होते. दरम्यान घटने दिवशी घरी आल्यानंतर सिद्धाराम यांनी वंदना यांना मुलांना सोडून कोठे गेले होते असा जाब विचारला. त्यावेळी तू कोण मला विचारणार असे म्हणून वंदना यांनी शिवगाळ करून हाताने मारहाण केली. यादरम्यान त्यांचा मेहुना लक्ष्मण व चुलत भाऊ मोरे यांनी फिर्यादीस मारहाण केली. तिथेच पडलेल्या लोखंडी रॉडने फिर्यादीस मारहाण करून जखमी केले. याबाबत सिद्धाराम यांनी दिलेले फिर्यादीवरून पत्नी वंदना, मेहुना लक्ष्मण व चुलत भाऊ मोरे यांच्याविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हवालदार शेख करत आहेत.

# कांद्याची आवक वाढली, दर मात्र वाढेना

### सोलापूर बाजार समितीत कांद्याला सरासरी १८०० रूपये मिळतोय दर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ फेब्रुवारी-**
कांद्याच्या विक्रमी उलाढालीसाठी सुप्रसिद्ध असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत यंदा कांद्याची आवक कमी प्रमाणात येत आहे. गत महिनाभरापासून दररोज १५० ते २०० ट्रक कांद्याची आवक होत होती. मागील आठवड्यात त्यात वाढ होऊन सरासरी ३०० ते ३५० ट्रक कांद्याची आवक होत आहे. दर मात्र सरासरी प्रतिक्विंटल १८०० रुपयांपर्यंत राहिला आहे.

दरम्यान, सोलापूर बाजार समितीत यंदा कांद्याची म्हणावी तशी आवक झाली नाही. दरवर्षी जानेवारी महिन्यात किमान ८०० ट्रक कांद्याची आवक असते. यंदा



मात्र, परतीच्या पावसामुळे पाणी लागून कांद्याच्या उत्पादनच मोठी घट झाली. त्यामुळे जानेवारीत सुरुवातीला सुमारे ४०० ते ४५० ट्रक कांद्याची आवक झाली. त्यानंतर आवक वाढण्याची शक्यता व्यक्त होत होती; मात्र दरात घसरण झाल्याने आवक घटली. काही दिवस केवळ १०० ते १२० ट्रक कांदा विक्रीला येत होता. तेव्हाही दर वाढला नाही; मात्र मागील महिन्यापासून सरासरी दर १८०० ते २००० रुपयांपर्यंत आहे. तर चांगल्या मालाला ३२०० ते ४००० रुपयांपर्यंत दर आहे. परतीच्या पावसानंतर अनेक भागात उन्हाळी कांद्याची लागवड झाली आहे. त्याची आवक आता सुरू झाली आहे. त्यामुळे मागील आठ दिवसांपासून ३०० ते ३५० ट्रक कांद्याची आवक होत आहे. येत्या काही दिवसात आवक आणखी वाढण्याची शक्यता आहे. सद्या बाजारपेठेत दुय्यम प्रतीचा कांदा विक्रीसाठी येत असल्याने घरामध्ये देखील चढउतार होत आहे. पूर्णपणे वाळलेला कांदा विक्रीसाठी येत नसल्याने दर देखील दुय्यम दर्जाचा मिळत आहे.

**▸▸उन्हाळी कांद्याला दर मिळण्याची आशा**
उन्हाळी कांदा जास्त काळ टिकतो. पुणे, अहिल्यानगर भागातील शेतकरी चाळ करून कांदा ठेवतात. दर वाढल्यानंतर विक्रीला आणतात. यंदा सोलापूर जिल्ह्यातही उन्हाळी कांद्याची लागवड मोठ्या प्रमाणात झाल्याने सोलापूरच्या शेतकऱ्यांना चांगला दर मिळण्याची आशा आहे. मात्र, दरच वाढत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत.
**- सादिक बागवान, कांदा अडत व्यापारी**

**▸▸कांदा वाळवून विक्रीसाठी बाजारात आणावा**
सोलापुरात आता कांद्याची आवक पुन्हा वाढू लागली आहे. उन्हाळी कांदा आता विक्रीला येत आहे. चांगला शेतमालही येत आहे. चांगल्या प्रतीच्या कांद्याला ३२०० ते ३५०० रुपयांचा दर आहे. सरासरी दरही चांगला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी गडबड न करता कांदा पूर्णपणे वाळवून विक्रीसाठी बाजारात आणावा. त्यामुळे पूर्णपणे वाळलेल्या कांद्याला चांगला दर मिळेल.
**- नामदेव शेजाळ, कांदा विभागप्रमुख, बाजार समिती**

# बृहमठ होटगी मठात आज विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ फेब्रुवारी-**
महाशिवरात्री व जगद्गुरु पंडिताराध्य व विश्वाराध्य यांच्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

अक्कलकोट रोडवरील श्री वीरतपस्वी मंदिरात बुधवार (दि.२६) फेब्रुवारी रोजी पहाटे ५.०० वा. श्री पंचमुखी परमेश्वर लिंगास रुद्राभिषेक, सहस्त्रबिलवारचन, महामंगलारती, दुपारी १२.०० वा. पंडिताराध्य लिंगोदभव मूर्तीचे श्री वीरतपस्वी मंदिरात आगमन, रथपूजा व शालेय विद्यार्थ्यांचे कला- क्रीडा उत्सव, महामंगलारती व महाप्रसाद वाटप, सायंकाळी ७.०० वा. दीपोत्सव, ८.०० वा. श्री वीरतपस्वी पालखी सोहळा, रात्री ९.०० वा. शोभेचे दारूकाम व महाप्रसाद वाटप, रात्री १०.०० वा. श्री वीरतपस्वी मंदिरात भजन व जागरण आयोजित करण्यात आलेला आहे.

उत्तर कसबा (बाळीवेस)येथील मठात बुधवार दि.२६ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.०० वा. श्री गुरु गादीस रुद्राभिषेक, बिलवारचन, महामंगलारती व महाप्रसाद, सकाळी ७.०० वा. श्री थोबडे यांच्या वाड्यातून श्री पंडिताराध्य लिंगोदभव मूर्तीचे होटगी मठात आगमन, ८.०० वा. श्री १००८ जगदाचार्य मूर्तीस महारुद्राभिषेकानंतर श्री १००८ जगद्गुरु पंडिताराध्य व विश्वाराध्य मूर्तीचे सवाद्य मिरवणूक उत्तर





कसब्यातील होटगी मठातून निघणार आहे. या मिरवणुकीत संस्थेच्या विविध प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, अध्यापक विद्यालय व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे लेझीम, झांज पथक व नृत्य यांच्यासह मोठ्या वैभवात मिरवणूक निघणार आहे. ही मिरवणूक मल्लिकार्जुन मंदिर, बाळीवेस, चाटी गल्ली, मंगळवार पेठ पोलीस चौकी, मधला मारुती, कोतम चौक, कन्ना चौक, जोडबसवणा चौक, पाण्याची टाकी, जुना अक्कलकोट नाका या पारंपारिक मार्गाने निघून अक्कलकोट रोडवरील श्री वीरतपस्वी मंदिरात मिरवणुकीचे महामंगलारतीने सांगता होणार आहे. त्यानंतर भक्तासाठी महाप्रसादाची सोय करण्यात आलेली आहे. मिरवणूक मार्गावर अनेक संस्थांकडून सहभागी विद्यार्थ्यांसाठी व भक्तासाठी प्रसादाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता तयारी पूर्ण**
महाशिवरात्री निमित्त मठात सर्व तयारी करण्यात आली आहे. मठात भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता मंदिराच्या दर्शनी भागात बॅरिगेट्स लावण्यात आले आहेत. त्याच प्रमाणे १०८ शिवलिंग स्वच्छ करून त्याभोवती सभा मंडप उभारण्यात येत आहे. महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांची अलोट गर्दी लक्षात घेऊन पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. सर्व परिसरात नव चैतन्याचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले दिसत आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०४०

**शब्दशस्त्रें झाले क्लेश ।**
**संतीं मानावा उपदेश ।।**

सहजासहजी कोणी कोणाचे मोठेपण, चांगुलपण मान्य करीत नाहीत. काहीतरी नाव ठेवणे, उणीव काढणे, काहीतरी दोष दाखवणे हा अनेकांचा स्वभाव असतो. निस्वार्थ भावाने दुसऱ्याचे मोठेपण, चांगुलपण मान्य करणा-यांची संख्या नगण्य असते. आपला नित्याचा अनुभव असतो की, बरेच लोक तोंडापुरते गोड बोलतात आणि समोरून बाजूला जाताच ज्याच्याशी गोड बोलले, ज्याचे कौतुक केले किंवा ज्यांच्याबददल चांगले बोलले त्याला नाव ठेवतात. स्वतःला समोरच्याचा अनुभव नसला तरीही त्याच्याबद्दल जणू कांही याला अनुभवच आला आहे, अशा अविर्भावात नको ते बोलतात. खरे म्हणजे असा स्वभाव इतरांसाठी तर चांगला नसतोच; पण ख-या अर्थाने अशा नाव ठेवणा-या व्यक्तीसाठीही चांगला नसतो. अशा लोकांना सुधारणे अवघड असले तरीही संत सज्जन अशांना मार्गदर्शन करीत राहतात. असे अकारण नाव ठेवणारे लोक सुधारले तर समाजातील, कुटुंबातील अनेक अकारण निर्माण होणारे प्रश्न निर्माण होत नाहीत. विचित्र हावभाव, नकारात्मक ईशारे, घालून पाडून तसेच टोचून



बोललेले शब्द बोलणा-यांसह इतरांसाठीही नुकसानकारक असतात. आर्थिक व सामाजिक नुकसानीपेक्षा जास्त प्रमाणात भावनिक व मानसिक नुकसान होते. हे नुकसान केवळ समोरच्याच्या नकारात्मक, अहंकारात्मक स्वभावामुळे होते. कधी-कधी संतानाही अशा लोकांच्या बोलण्याचे शिकार व्हावे लागते. श्री ज्ञानदेवही अशा क्लेशकारक तीक्ष्ण शब्दांपासून अलिप्त राहू शकले नाहीत. त्यांनाही क्लेश होतील एवढे लोकांचे अकारण बोलणे खावे लागले. लोकांच्या बोलण्यामुळे त्यांना होत असलेल्या क्लेशांची जाणीव मुक्ताईंना झाल्याने ती म्हणाली, शब्दशस्त्रें झाले क्लेश ख संतीं मानावा उपदेश खख दादा, लोकांच्या बोलण्याचे क्लेश झाले तरीही आपण संताचा उपदेश मानला पाहिजे. अर्थात, लोकांच्या बोलण्याचा विपरीत परिणाम स्वतःवर होऊ न देता आपण लोकोपयोगी, लोकाभिमुख कार्य करीत राहिले पाहिजे. ध्येयापासून विचलीत करणे हेच तर अशा लोकांचे ध्येय असते. आपण त्यांच्या अशा खेळीला बळी पडलो तर हे लोक जिंकतील आणि आपण व आपल्यावर अवलंबून असणारे हरतील. दादा, आपणाला असे होऊ द्यायचे नाही. त्यामुळे आपण संत वचनांवर विश्वास ठेवून क्लेशातून बाहेर पडू या. श्री ज्ञानदेवांना असे सांगण्यासाठी, त्यांना क्लेषातून बाहेर काढण्यासाठी त्यांची मुक्ताई भगिणी त्यांच्या पाठीशी होती. समाजातील अनेकांना मुक्ताई मिळेलच असे नाही. असे असले तरीही मुक्ताईचा ज्ञानप्रकाश हे सदर आपल्या सर्वांसाठी एक प्रकारे मुक्ताईच आहे. या सदराची अनुभूती आपणाला बऱ्याचशा क्लेशातून बाहेर काढण्यास साहाय्यकारी ठरेल यात आम्हास शंका वाटत नाही.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# आयुक्त डॉ.ओंबासेंच्या अधिकाऱ्यांना गंभीर सूचना

## ● कार्यालय स्वच्छ व सुंदर ठेवण्यासह कामकाज वेळेत पूर्ण करण्याचे दिले निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिकेचे नूतन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी महापालिकेतील विविध विभागांच्या कार्यालयांची आज प्रत्यक्ष पाहणी केली. सर्व कार्यालये स्वच्छ आणि सुंदर ठेवा. कामकाज वेळेत पूर्ण करा, अशा सक्त सूचना यावेळी आयुक्त ओंबासे यांनी दिल्या.



सोलापूर महापालिकेचे नूतन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी महापालिका आवारातील प्रशासकीय इमारतीमधील विविध विभागांच्या कार्यालयांना थेट-भेट दिली. प्रशासकीय इमारतीतील मालमत्ता कर विभाग, संगणक विभाग, पाणी पुरवठा विभाग, ड्रेनेज विभाग,आरोग्य विभाग, नगर रचना विभाग, बांधकाम विभाग, नगर अभियंता, मंडई विभाग, मुख्यलेखापाल विभाग, मुख्यलेखा परीक्षक विभाग, अभिलेखपाल, समान्य प्रशासन विभाग, अन्न परवाना विभाग, युसीडी विभाग, अंतर्गत लेखापरीक्षक आधी विभागांच्या कार्यालयांची पाहणी केली.

दरम्यान, संपूर्ण शहरातील सुरक्षा व्यवस्थेवर देखरेख व नियंत्रण करण्यासाठी कार्यान्वित केलेल्या इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरला आयुक्तांनी भेट दिली. या अंतर्गत नियंत्रण कक्ष, घंटागाडी रूट मॅप, शहरातील सीसीटीव्ही, सुरक्षा यंत्रणा, पाणीपुरवठा वितरण, एलईडी दिवे, कचरा संकलन केंद्राच्या गाड्या, पाणीपुरवठा वितरण प्रणाली व स्काड प्रणाली, ड्रेनेज, अग्निशमन विभाग, आपत्ती व्यवस्थापन आदी संदर्भात आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी माहिती घेतली.

यावेळी स्मार्ट सिटीचे मुख्यकार्यकारी अधिकारी गोपीचंद कदम, अतिरिक्त आयुक्त रवी पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, मुख्य लेखापरीक्षक रूपाली कोळी, मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, उप संचालक नगर रचना मनिष भिष्णूरकर, सार्वजनिक आरोग्य कार्यकारी अभियंता व्यंकटेश चौबे, विद्युत कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, अंतर्गत लेखापरीक्षक राहुल कुलकर्णी, संगणक विभाग प्रमुख स्नेहल चपळगावकर, प्रकाश दिवाणजी, रामचंद्र पेंटर, तपण डंके, कामगार कल्याण अधिकारी ओमप्रकाश वाघमारे आदी उपस्थित होते.

### ▸ युसीडी विभाग स्वच्छ आणि नेटका ठेवण्यासाठी सुनावले

प्रशासकीय इमारतीत तिसऱ्या मजल्यावर असलेल्या शहरी नागरी समुदाय विकास (युसीडी) विभागात विस्कळीतपणा दिसून आला. या कार्यालय आवारातील गाठोडे, इतर साहित्य यामुळे विदारक चित्र पाहायला मिळाल्याने आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी संबंधितांना सुनावले. हे कार्यालय नेटके, स्वच्छ - सुंदर करण्यासंदर्भात सूचित केले. बांधकाम व नगर रचना विभाग कार्यालयातील फाइली नेटक्या पद्धतीने ठेवण्याच्या सूचना दिल्या. लवकरच कॉम्पॅक्टर कपाट उपलब्ध करण्यात येईल, असे स्पष्ट केले.

### ▸ नागरिकांना त्रास होणार नाही याची खबरदारी घ्या

या पाहणी दरम्यान, डॉ. सचिन ओम्बासे यांनी कार्यालय प्रमुख आणि कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. यामध्ये सर्वांनी आपले कार्यालय स्वच्छ आणि नेटक्या पद्धतीने ठेवावे. दस्तावेज, कागपत्राचे वर्गीकरण करून सुस्थितीत ठेवणे, नागरिकांना त्रास होणार नाही यांची खबरदारी घेऊन तत्काळ कामाचा निपटारा करावा तसेच सर्व विभागांनी आपल्या कडे दिलेले कामकाज वेळेत पूर्ण करण्याच्या सूचनाही दिल्या.

## महाशिवरात्री निमित्त आज रुद्राभिषेक सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

शेळगी येथील रामराज्य नगर गृहनिर्माण सोसायटी येथे दिनांक २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीनिमित्त रुद्राभिषेक सोहळा व इतर धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन चेअरमन सी जी बिराजदार यांनी केले आहे सालाबादाप्रमाणे याही वर्षी २६ फेब्रुवारी रोजी शेळगी येथील शंभू महादेव मंदिर येथे महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. महाशिवरात्रीनिमित्त या ठिकाणी महारुद्र अभिषेकाचे आयोजन करण्यात आले आहे.

ज्या भक्तांना महाशिवरात्रीनिमित्त महारुद्र अभिषेक करायचा आहे. त्यांनी नोंदणी करून घेणे आवश्यक आहे यासाठी शंभू महादेवाचे महंत श्री प्रकाश हिरेमठ महाराज, सूर्यकांत दोडके, नागेश कोकणे, राजशेखर रोडगीकर, शिवानंद जोकारे, शांत कुमार होळी. शिवाजी चापले यांच्याशी संपर्क साधून रुद्राभिषेक साठी नावे नोंदवावे. सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन सचिव सुनील पुजारी यांनी केले आहे.

# माकपाकडून लाल झेंडा दिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

भारतात सर्वहारा वर्ग आणि आहे रे वर्ग यामध्ये दरी निर्माण करण्याचे काम इथल्या भांडवली व्यवस्थेने जाणीवपूर्वक निर्माण केलेले आहे. त्यामुळे सामाजिक व आर्थिक असमानता अधिक वेगाने रूढ झाली. त्यामुळे अनेक लोक आपल्या निसर्गदत्त न्याय हक्कापासून वंचित आहेत.



अशा वंचित, पिडीत, उपेक्षित घटकाला न्याय मिळवून देणे हे अंतिम ध्येय स्वीकारून आजीवन जनतेची लढाई करण्याचा प्रतिज्ञा घेतलेल्या शहिदांच्या त्यागाचे व रक्ताचे प्रतिक म्हणून लाल झेंडा मानला जातो. हा लाल झेंडा खांद्यावर घेऊन जनतेच्या हितापुढे स्वतःचे हित गौण मानून लढ्यात आलेला लाल सैनिक अर्थातच कॉम्रेड आपले आयुष्य जनतेच्या चळवळीसाठी समर्पित करतो. अशांची स्मृती जागवणारा 'लाल झेंडा दिवस' हा जनतेत रुजला पाहिजे. याकरिता लाल झेंडा दिवस साजरा केल्याची भावना ज्येष्ठनेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम यांनी व्यक्त केले. दत्त नगर लाल बावटा मध्यवर्ती कार्यालय येथे ज्येष्ठनेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

तत्पूर्वी प्रजा नाट्य मंडळाचे शाहीर प्रशांत म्याकल,विशाल पवार, अरुण सामल,चंद्रकांत मंजुळकर व अन्य शाहिरांनी क्रांतिगीते सादर केले. यावेळी मार्गदर्शन करताना कॉ. एम.एच.शेख म्हणाले कि,२७, २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी महाराष्ट्रातील परभणी जिल्ह्यातील सेलू या ठिकाणी पक्षाचे राज्याचे अधिवेशन पार पडणार आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्रात सध्या भेडसावत असलेल्या समस्या, राज्य सरकारची धोरणे, मोठ्या प्रमाणात वाढत असलेली बेरोजगारी, महागाई, विविध क्षेत्रात फोफावलेला भ्रष्टाचार, महिलांवरील अत्याचार, शैक्षणिक क्षेत्रातील मक्तेदारी आणि शिक्षणाचे बाजारीकरण या सर्व आव्हानाविरुध्द लढण्याची रणनीतीची आखणी करण्यात येणार आहे.

यावेळी प्रास्ताविक करताना माकपा जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख (मेजर) म्हणाले कि, पक्षाने दिलेल्या आवाहनानुसार संपूर्ण शहरात व कुंभारी परिसरात लाल झेंडे, फरारी लावून संपूर्ण वातावरण लालमय केले ५३ शाखामार्फत झेंडावंदन करून आपापल्या भागातून कार्यकर्ते जथ्थेकरून पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालय येथे दाखल झाले. लाल झेंडे को लाल सलाम, मार्क्सवाद लेनिनवाद जिंदाबाद, स्वातंत्र लोकशाही समाजवाद जिंदाबाद, शेतकरी-कामगार एकजूटीचा विजय असो, विद्यार्थी युवा महिला एकता जिंदाबाद, धर्म कि लढाई झुठी है, देश कि जनता भूखी है अशा गगनभेदी आवाजात घोषणा देऊन वातावरणामध्ये स्फुल्लिंग चेतावले.

यावेळी मंचावर नसीमा शेख, नलिनी कलबुर्गी, शेवंता देशमुख, व्यंकदेश कोंगारी, रंगप्पा मरेड्डी, ॲड. अनिल वासम यांची उपस्थिती होती.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २६ फेब्रुवारी २०२५ | महाशिवरात्री |
| विक्रम संवत् २०८०-८१ | संत गाडेबाबा जयंती |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. त्रयोदशी (११.०८) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - श्रवण (१७.२३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - परिघ (२७.५७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टी (२२.०५) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या :** लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

# एआय अन् एमएल आजच्या युगातील महत्त्वाचे तंत्रज्ञान

## एचएनच्या बीसीए विभागाच्यावतीने आयोजित परिसंवादात सूर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

ए.आय.आणि एम.एल.च्या माध्यमातून संगणकांना मानवी बुद्धिमत्तेचे अनुकरण करण्याची क्षमता प्राप्त करून देण्यात आली आहे. त्यामुळे आर्टिफिशीयल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग हे आजच्या डिजिटल युगातील अत्यंत महत्त्वाचे तंत्रज्ञान असल्याची माहिती हिराचंद नेमचंद महाविद्यालयातील बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स (बी.सी.ए.) विभागाच्यावतीने आयोजित परिसंवादाच्या उद्घाटनपर भाषणात वालचंद इंस्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. प्रतिभा कालदीप बोलत होत्या.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. के. शाह, एम.बी.ए. विभागाचे डायरेक्टर डॉ.ओ.एम. अष्टनकर, प्रा. अनिता सद्गलगी, प्रा. अनिल साखरे उपस्थित होते. या परिसंवादात १३ विद्यार्थांनी ए.आय. आणि एम.एल. या विषयावर आपले शोधनिबंध सादर केले. ईश्वर जाधव, जयेश जक्का, ओमकार चांगले, अर्चना पल्ली,मेघना मईले, अमन रेंबरसू, श्रेया पांडे, वितुषा रेंबरसू, ध्रुव गोरडिया, आशिष धनवानी, प्रशांत गरदास आणि सुधांशु बोद्दुल, शिवप्रसाद दोरनाल,श्राव्या सिंग्राल या विद्यार्थांच्या शोधनिबंधांना प्रमाणपत्र देण्यात आले. या स्पर्धेत प्रथम-श्रेया पांडे, द्वितीय जयेश जक्का व तृतीय क्रमांक वितुषा रेंबरसू पटकावला.

परिसंवादाच्या प्रथम सत्रात-टाटा कॉम्युनिकेशन्स लिमिटेड,पुणेचे बलवंत गोरड यांनी ए.आय. च्या मदतीने स्वयंचलित वाहनांपासून स्मार्ट ॲसिस्टंट्सपर्यंत अनेक नविन उत्पादने विकसित केली गेली आहेत. डेटा सायन्स आणि बिग डेटा यांच्या मदतीने, मशीन लर्निंग चा वापर अधिक विस्तृत आणि अचूक झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

सिनिअर ए.आय. लीड यांनी आर्टिफिशील इंटेलिजन्सस अँड मशीन लर्निंग आव्हाने या विषयावर उपस्थितांशी संवाद साधला. यासंदर्भात बोलतांना माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात ए.आय. आणि एम.एल. या विषयाचा सखोल अभ्यास कसा करवा व त्यासाठी लागणाऱ्या विविध कौशल्याबद्दल बलवंत गोरड यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन वैष्णवी बामणी व संजना माशाळकर यांनी केले. अनिल साखरे यांनी आभार मानले.

# मारहाण व तोडफोड केल्याप्रकरणी १२ आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवार -**

दर्शनाळ (ता. अक्कलकोट) येथे फिर्यादी हिना पठाण हिचे घरासमोर येऊन यातील आरोपी पारप्पा आण्णप्पा माने, शाहू मसा माने, महादेव मसा माने, योगेश गोपीनाथ माने, ज्ञानेश्वर माने, सुनंदा गौरीशंकर माने, हिराचंद महादेव माने, दिपक हिराचंद मस्के, राणी बंडू लांडगे, श्रीशैल गेनसिध्द माने, पंढरी आप्पाराव माने, अमर विठ्ठल शिरसट यांनी दर्शनाळ येथील लोकांच्या घरावर व मोटार सायकलीवर दगडफेक करुन तोडफोड केल्याप्रकरणी न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांनी सर्वांना अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला.

२१ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी साडेसातच्या दरम्यान हिना पठाण हिचे घरासमोर वरील सर्व आरोपी हे एकत्र येऊन शिवीगाळ करीत होते. त्यावेळी फिर्यादीने तसे न करण्याबाबत सांगत असतांना आरोपींनी फिर्यादीच्या घरावर दगडफेक केली व घरातील भांडयाची तोडफोड केली. तसेच फिर्यादी ही अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशन येथे फिर्याद देण्यास गेली असता सर्व आरोपींनी गावातील इतर लोकांच्या घरावर व मोटार सायकलीवर दगडफेक करुन तोडफोड केल्याचे समजले. त्यावरुन आरोपीविरुध्द अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता.

या गुन्ह्यात अटक होऊ नये म्हणून जिल्हा न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल करण्यात आला होता. यात सरकार पक्षातर्फे ॲड. दत्तुसिंग पवार यांनी तर आरोपीतर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. विजय हर्डिकर, ॲड. सतिश शेटे यांनी तर काम पाहिले.

# 'एसपीएम'मध्ये शिवजल्लोष साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ फेब्रुवारी -**

कुमठे येथील एस. पी. एम. पॉलिटेक्निक येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त 'शिवजल्लोष २०२५' पारंपरिक थाटात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. दोन दिवसीय वक्तृत्व स्पर्धेच्या आयोजनासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.



स्पर्धेच्या पहिल्या दिवशी 'छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे निष्ठावंत मावळे' या विषयावर तर दुसऱ्या दिवशी 'छत्रपती संभाजी महाराज व त्यांचे निष्ठावंत मावळे' या विषयावर विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण विचार मांडले. स्पर्धेत अंकिता गडदे (प्रथम), समृद्धी साळुंके (द्वितीय), नुसरत नदाफ (तृतीय) आणि उत्तेजनार्थ प्रेम लोहार यांनी यश मिळवले. दुसऱ्या दिवशीच्या स्पर्धेत स्नेहल कदम (प्रथम), साक्षी शिंदे (द्वितीय), तृप्ती गायकवाड आणि बेबीताई गुरव (तृतीय), तर उत्तेजनार्थ कीर्ती शिंदे यांनी चमकदार कामगिरी केली. विजेत्यांना प्रमाणपत्र आणि महाराजांच्या जीवनावरील पुस्तके प्रदान करून गौरवण्यात आले. कार्यक्रमात इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी 'शिवसंस्कार' हे पथनाट्य सादर केले. तसेच विद्यार्थ्यांनी लेझीम आणि ढोल पथकाच्या तालावर शिवरायांना मानवंदना दिली. पूर्वा बोळ्ळी, श्वेता शिंदे आणि साक्षी शिंदे यांनी दमदार शिवगर्जना सादर केली.

**पात्र साकारणारे विद्यार्थी :**
छत्रपती शिवाजी महाराज - **हर्षवर्धन गरड**
छत्रपती संभाजी महाराज - **सुमित बरबडे**
जिजाऊ - **प्रियांका राठोड**
येसूबाई - **गायत्री दुलंगे**

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती: संस्थेचे मुख्य विश्वस्त माजी नगरसेवक जयकुमार माने, माजी नगरसेविका प्रिया जयकुमार माने, संस्थेच्या विश्वस्त प्रा. स्वाती माने, सौ. रेश्मा अजित माने, प्राचार्या रोहिणी चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्य विश्वस्त जयकुमार माने यांनी विद्यार्थ्यांनी शिव विचारांचे अनुकरण आपल्या दैनंदिन जीवनात करण्याचे आवाहन केले.

सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर जाधव यांनी केले तर आभार प्रा. राहुल तीर्थकर यांनी मानले.

## संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (६३) समरसता

डॉक्टर हेडगेवार हे धगधगत्या ज्वालामुखी सारखे जन्मजात देशभक्त होते संघाला मुस्लिम विरोधी- इसाई विरोधी- अंग्रेज विरोधी म्हणत असत. परंतु डॉक्टर म्हणायचे समाजात एकता व समन्वय सुदृढ करायचा असेल तर आपण हिंदूंनीच आधी सुधारणे आवश्यक आहे. आपल्या पतनासाठी अधोगतीसाठी दुसऱ्यावरय दोषारोप करू नका. उगाच विरोधक बनू नका. व संघटनेमुळे मिळणारी आपली ताकद दाखवा यामुळे हिंदू विरोधी सूर थंड होतील हिंदूंना असंघटित व आत्मविस्मृत स्थितीत राहू नका. समता आणि बंधुभाव ठेवण्याची जबाबदारी दोन्ही पक्षांची असते; याची त्यांना जाणीव करून द्या. सामाजिक समरसता ही भावना सुदृढ करा. समरसता हा डॉक्टरांनी सांगितलेला मार्ग म्हणून ओळखल्या जातो. ते म्हणतात आपले कार्य समग्र हिंदू समाजाचे आहे. त्याच्या कोणत्याही अंगाची उपेक्षा करू नका. हिंदू बांधवांना उच्च-नीच श्रेणी देऊ नका. स्पृश्य अस्पृश्य भेदाभेद विसरून प्रत्येकाशी आमचा व्यवहार प्रेमाचाच असला पाहिजे, अशी सक्त ताकीद ते देतात. ते बंधूभावाचा आग्रह धरतात. (आज सामाजिक समरसतेचा एक आयाम म्हणून झुंड चित्रपट अवश्य पहावा) शाखेत रोज समरसता श्लोक म्हणतात तो असा

**हिन्दवः सोदराः सर्वे, न हिन्दू पतितो भवेत्। मम दीक्षा हिन्दूः रक्षा, मम मंत्रः समानता ।। जय श्री राम**

अर्थात् सर्व हिंदू सहोदर म्हणजे भाई-भाई आहेत. कोणताही हिन्दू पतीत होऊ शकत नाही. माझी दीक्षा ही हिन्दू रक्षा आहे, आणि हा माझा समानता मंत्र आहे. अर्थात हा मंत्र समरसता शिकवतो.

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### शिवजयंतीनिमित्त विंचूरच्या सर्वरोगनिदान शिबिरात ४७ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त विंचूर येथे आदित्य झाडबूके आणि शिवाजनमोत्सव तरुण मंडळ विंचूर यांच्या साहाय्याने रक्तदान शिबिर आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. रक्तदान शिबिरामध्ये ४७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिर छत्रपती शिवाजी महाराज रक्तसंकलन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने रबिविण्यात आले. तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिर अश्विनी ग्रामीण रुग्णालय कुंभारी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा १०० पेक्षा अधिक रुग्णांनी लाभ घेतला. या शिबिरामध्ये मोफत आरोग्य तपासणी त्यांचे निदान आणि चिकित्सा करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी कृषी सभापती आप्पाराव कोरे, सरपंच बाळासाहेब पाटील, भीमाशंकर फुलारी, मनोहर नरुटे, अमोगसिद्ध खडके, महादेव पुजारी, काळप्पा सुतार, मल्लिकार्जुन झाडबुके, सुनील लोणारी , दादासाहेब व्यवहारे, लक्ष्मीकांत बनगोंडे, प्रभाकर बिराजदार, दादा माने, धनराज झाडबुके, यशवंत चव्हाण, साताप्पा बगले, चंद्रकांत लोणारी, सचिन नवले, पांडुरंग साबळे, राजकुमार लोणारी, बसवराज बिराजदार, अक्षय चव्हाण, सिद्धाराम खडके, नाना साबळे, गणेश फडतरे, नागनाथ फडतरे, उमेश पाटील, अजित बिराजदार, संपत अंकुशे, दत्ता अंकुशे, अभिषेक नवले, पमु गुरव, अरुण कोळी, कल्लापा बिराजदार, कनप्पा पुजारी, गुंडप्पा पुजारी, मोनेश पुजारी, बाळासाहेब कोळी, किरण मलाबदे, महेश बिराजदार, महेश झाडबुके, रेवणसिद्ध परिट, लक्ष्मीकांत घोंगडे, मल्लिकार्जुन पाटील, देविदास साबळे आदी उपस्थित होते.



### नागणसूर कन्नड शाळेत फन-फेअर

**अक्कलकोट, दि. २५ फेब्रुवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील नागणसूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुली व मुले शाळेत आयोजित फन-फेअर संपन्न झाला. डॉ. अभिनव बसवलिंग महास्वामिजी यांच्या सानिध्यात फन फेअरचा प्रारंभ झाला. सभारंभाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत सदस्य ओंकार गंगोंडा होते. प्रारंभी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले प्रतिमेचे पूजन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गंगाधर भोसगी, बसनिंगय्या स्थावरमठ यांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर तालुका शिक्षक संघाचे अध्यक्ष बसवराज खिलारी, केंद्रीय मुख्याध्यापक विद्याधर गुरव, श्रीशैल दोडमनी, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष बसवराज तेग्गीनकेरी, गजानंद रेवी, प्राचार्य शंकर व्हनमाने, बसवराज धनशेट्टी बाळकृष्ण म्हेत्रे, भीमाशंकर चौगुले, मलकप्पा हिप्परगी, बसवराज दोडमनी, श्रीशैल फुलारी उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे हस्ते नुकतेच मुंबई पोलीस म्हणून नियुक्त झालेले नागणसूर गावचे ऐश्वर्या क्यातनकेरी, काजल गंगोंडा, नागेश नागलगांव,चंद्रकांत माशाळकर यांच्यावर गुलाब पुष्पवृष्टी करत सत्कार करण्यात आला. कन्नड शाळेतील विद्यार्थिनींनी ३५ स्टॉल व शाळेतील मुलांनी १० स्टॉल उभारण्यात आले होते. त्यामध्ये भेळ, पावभाजी, मस्कापाव,व्हेज पॅटीस, मसालाडोसा, बासुंदी, बदाम शेक, पेढा, रसना, पाणीपुरी, दहीपुरी, मिसळपाव, इडली, कांदाभजी, मिरची भजी आदी स्टॉल उभारले होते. सूत्रसंचालन शरणप्पा फुलारी यांनी केले. आभार राजकुमार नरूणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शरणप्पा फुलारी, राजशेखर खानापुरे, राजकुमार नरूणे, राजशेखर कूर्ले, शांताबाई तोळणूरे, बसय्या स्वामी, खाजप्पा किणगी समवेत विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

### महेश इंगळे यांची स्वामी सेवेतील निष्ठा प्रेरणादायी : केदार काकडे

**अक्कलकोट, दि. २६ फेब्रुवारी-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांची स्वामी सेवेतील निष्ठा व तपश्चर्या आध्यात्मिक क्षेत्रातील सेवकांना प्रेरणादायी असल्याचे मनोगत सांगलीचे जिल्हाधिकारी अशोकराव काकडे यांचे चिरंजीव केदार काकडे यांनी व्यक्त केले. केदार काकडे यांनी श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केदार काकडे यांचा स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. याप्रसंगी केदार काकडे बोलत होते. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, प्रथमेश इंगळे, विश्वस्त महेश गोगी, पांडुरंग पाटील, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ, दर्शन घाटगे उपस्थित होते.

### चोरटयाने हिरो होंडा मोटर सायकल पळविली

**मंगळवेढा दि.२५ फेब्रुवारी-**

मंगळवेढा शहरातील एका हॉस्पीटलसमोर लावलेली हिरो होंडा स्प्लेंडर ५० हजार रुपये किमतीची मोटर सायकल अज्ञात चोरटयाने चोरून नेल्याचा प्रकार नुकताच घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरटयाविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.दरम्यान,मोटर सायकल चोरून नेणारे चोरटे सीसी टिव्ही कॅमेरात कैद झाले असून पोलिस त्या चोरटयांचा युध्द पातळीवर कसून शोध घेत आहेत. पोलिस सूत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी सुनिल लेंडवे रा. लेंडवे चिंचाळे यांची एम एच १३,ई ए ४९५७ ही हिरो होंडा स्प्लेंडर मोटर सायकल मागील दोन वर्षापुर्वी विकत घेतली होती. दि.२४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.०० वा. ही मोटर सायकल वैभव दत्तात्रय इंगोले रा.लेंडवे चिंचाळे याने त्याचे मामाच्या मुलाला दवाखान्यास दाखविणेकरीता सदरची मोटर सायकल घेवून आले होते.मोटर सायकल महिला हॉस्पीटलच्या पार्किंगमध्ये लावून ते दवाखान्यात गेले.दुपारी २.०० वा. वैभव इंगोले यांनी गाडीजवळ येवून पाहिले असता गाडी दिसून आली नाही. याबाबत त्यांनी फिर्यादीस मोटर सायकल चोरीस गेली असल्याचे कळविले.तदनंतर हॉस्पीटलचे सी सी टिव्ही कॅमेरे चेक केले असता अज्ञात दोन इसम ती मोटर सायकल घेवून जात असल्याचे कॅमेरामध्ये दिसून आले. गाडीचा सर्वत्र शोध घेतला मात्र ती मिळून न आल्याने अज्ञात चोरटयाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

# संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान रखडले

## माढा तहसील कार्यालयात गर्दी

### लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट अनुदान टाकण्याच्या निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २६ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यात संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत विविध योजनांच्या लाभार्थ्यांचे गेल्या काही महिन्यापासून अनुदान रखडले असल्याने मंगळवारी माढा तहसील कार्यालयात अनुदान रखडलेल्या लाभार्थ्यांची गर्दी झाली होती. गेल्या चार महिन्यांपासून मानधन न मिळाल्याने माढा तालुक्यातील १६ हजार ७६६ लाभार्थी अनुदानापासून वंचित राहिले आहेत. माढा तालुक्यात संजय गांधी निराधार योजनेचे ६१०१ तर श्रावणबाळ योजनेचे १९ हजार ३५३ असे २५ हजार ४५४ लाभार्थी आहेत. राज्य सरकारच्या वतीने या योजनेअंतर्गत येणाऱ्या निराधार, दिव्यांग, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत, अनाथ तसेच दुर्धर आजाराने त्रस्त असलेल्या नागरिकांना प्रतिमाह १५०० रुपये अनुदान दिले जाते. तहसील कार्यालयाकडून याद्या दिल्यानंतर बँकेमध्ये लाभार्थीच्या खात्यावर अनुदान जमा होत असे.

परंतु शासनाने लाभार्थींच्या खात्यावर थेट पैसे जमा करण्याचा निर्णय घेतल्याने लाभार्थीचे बँक खाते आधार कार्डशी जोडलेले असणे आवश्यक आहे. माढा तालुक्यात येणाऱ्या २५ हजार ४५४ लाभाव्यांपैकी १३ हजार २३८ लाभार्थींनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली असल्याने डिसेंबरअखेर ८ हजार ६८८ लाभार्थीच्या खात्यावर डीबीटीद्वारे अनुदान जमा करण्यात आले आहे. अद्यापही १६ हजार ७६६ लाभार्थी अनुदानापासून वंचित राहिले आहेत.

> कागदपत्रे सादर केल्यास अनुदान वितरणाबाबतची अडचण नाही शासनाने ई-केवायसी अनिवार्य केली आहे. ज्यांनी कागदपत्रांची पूर्तता केली आहे त्यांची यादी शासनाकडे पाठवण्यात आली असून, उर्वरित लाभार्थींनी बँक पासबुक, आधार कार्ड, शिधापत्रिका, मोबाइल नंबर, दिव्यांग असल्यास अपंगत्वाचे प्रमाणपत्र आवश्यक कागदपत्रे तहसील कार्यालयात सादर केल्यास त्यांचे अनुदान वितरीत करण्यास कोणतीही अडचण येणार नाही.
>
> **- संतोष भडकवाड,**
> **निवासी नायब तहसीलदार**

# माचणूर येथे आजपासून सिध्देश्वर यात्रा



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.२५ फेब्रुवारी-**

तिर्थक्षेत्र माचणूर येथील श्री सिध्देश्वर यात्रेचा शुभारंभ महाशिवरात्री पासून पुढे पाच दिवस होत असल्याने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान महाशिवरात्री दिवशी पहाटे ४ वाजता श्री च्या मूर्तीची पूजा प्रांताधिकारी अमित माळी यांच्या हस्ते होणार असून तद्नंतर भाविकांना दर्शनासाठी मंदिर खुले केले जाणार आहे.

बुधवार दि.२६ रोजी पहाटे ४ वाजता श्री ची महापूजा प्रांताधिकारी अमित माळी यांच्या हस्ते होणार आहे. सायंकाळी ७ वाजता श्री च्या पालखीचे सवाद्य माचणूर गावातून मंदिराकडे आगमन. यावेळी नयनरम्य फटाक्याची आतषबाजी केली जाणार आहे.

गुरुवार दि.२७ रोजी सायंकाळी ७ ते सुर्योदय पर्यंत पारंपारिक भेदिक गाण्यांचा कार्यक्रम व कलगीतुरे. शुक्रवार दि. २८ रोजी नामांकित पैलवानांच्या दुपारी २ वाजता जंगी कुस्त्या. प्रथम कुस्ती बक्षिस १ लाख ५१ हजार,व्दितीय कुस्ती १ लाख रुपये आदी मोठ्या प्रमाणात कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान यंदा मानाच्या १० कुस्त्या ठेवण्यात येवून मोठ्या प्रमाणात बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. शनिवार दि.१ मार्च रोजी भजन,कीर्तन सोहळा. रविवार दि.२ मार्च रोजी सायंकाळी ६ ते ९ दरम्यान श्री च्या पालखीचे मंदिरातून माचणूर गावाकडे मार्गस्थ. आदी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यात्रे दरम्यान महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र राज्यातून लाखोंच्या संख्येने भाविक येत असल्यामुळे चोऱ्या होवू नये, यासाठी पोलीसांची करडी नजर राहणार आहे. यात्रा कमिटीने भाविकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे. तसेच भीमा नदी पात्रात मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने महाशिवरात्री दिवशी भाविकांना मुक्तपणे पहाटे स्नान करता येणार आहे. नदीत पाणी असल्यामुळे यात्रा कमिटी दुर्घटना होणार नाही याची खबरदारी घेत असून नदीकडील गेट बंद करण्याची शक्यता आहे. यात्रेच्या पार्श्वभूमीवर सोमवारी व्यापाऱ्यांनी आपली दुकाने मंदिराच्या मैदानात थाटली आहेत. त्यामुळे यंदा भरगच्च यात्रा भरण्याचे संकेत मिळत आहेत. मंगळवेढा, सांगोला, सोलापूर आगाराने भाविकांच्या सोयीसाठी ज्यादा बसेस सोडण्याचे नियोजन केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत लोकशाही हवी

## शिवव्याख्याते बालाजी जाधव यांचे प्रतिपादन

### टेंभूर्णीमध्ये व्याख्यानाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. २४ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराजांना व संविधानाला अभिप्रेत असलेली लोकशाही आपणास हवी आहे. मात्र महाराजांना अभिप्रेत असलेल्या लोकशाही प्रमाणे आजच्या लोकशाहीची वाटचाल सुरू आहे, असे म्हणता येणार नाही, अशी खंत शिवव्याख्याते बालाजी जाधव यांनी व्यक्त केली.

टेंभुर्णी येथे मध्यवर्ती शिवस्मारक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडच्या वतीने आयोजित कार्यक्रमात इतिहास संशोधक व्याख्याते तथा कीर्तनकार डॉ.बालाजी जाधव हे



'छत्रपती शिवाजी महाराज आणि आजची राजकीय व्यवस्था' या विषयावर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डिव्हीपी उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक डी. व्ही.पी उद्योग समूह, संजय कोकाटे, संजय पाटील-भिमानगरकर, संजय पाटील-घाटनेकर, बाळासाहेब पाटील, बंडूनाना ढवळे, रावसाहेब देशमुख, बाळासाहेब ढवळे, औदुंबर देशमुख, तात्या पाटील, दत्ता ढवळे, शिला पाटील, एपीआय गिरीश जोग,नागेश बोबडे,नागनाथ खटके,बाळासो ढेकणे, श्रीकांत लोंढे, गोरख देशमुख, सोमनाथ कदम उपस्थित होते.

पुढे बोलताना जाधव म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांसाठी माणसं जीव का द्यायला तयार व्हायची. हे राजे केवळ आपले आहेत म्हणून नाही तर त्यांनी स्वराज्य निर्मिती करण्यासोबतच स्वराज्याचे सुराज्य कसं होईल याच्यासाठी त्यांनी सर्वात मोठं काम केलेलं आहे म्हणून. संबंध महाराष्ट्रामध्ये, देशांमध्ये राजकीय चित्र आहे.त्यामध्ये निश्चितपणे आपण असे म्हणू शकतो का? की त्यामध्ये सामान्य माणूस केंद्र बिंदू आहे? सामान्य माणसांच्या जीवनाचा विचार या ठिकाणी व्हायला लागलाय असं थोडं तरी आपल्याला वाटतं का?असा प्रश्न ही यावेळी जाधव यांनी उपस्थित केला. प्रास्ताविक संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप यांनी केले.सूत्रसंचालन राजू पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी सुहास टोणपे, गणेश सव्वासे, निलेश देशमुख, संगीता गायकवाड, अविनाश पाटील, दिगंबर मिसाळ, अरूण जगताप, पपेश पाटील, नितीन मुळे, सचिन पराडे, सचिन खुळे, योगेश मुळे, विलास कोठावळे, दादा देशमुख, महेश देशमुख, ज्योतीराम बागवाले, गणेश जगताप, निळकंठ गरड, सागर गोडसे, पिंपळनेर, विजय काळे, अल्ताफ मुलाणी, भोसरे, संदेश बागल, तुकाराम भोसले, रामभाऊ मिटकल, प्रताप गवळी, मोहन नेवरे, नवनाथ दौंड, दादा भोसले, संजय देशमुख, श्रीकांत लोंढे आदींनी परिश्रम घेतले.

# अक्कलकोटमध्ये गुरुवारी महाशिवरात्रीचा उत्सव

## श्री कालीचरण महाराजांचे शिवतांडव स्तोत्र पठण

**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

अक्कलकोट येथील पांडवकालीन हेमाडपंथी स्वयंभू श्री जागृत बारा ज्योतिर्लिंग देवस्थान येथे महाशिवरात्रीच्या निमित्ताने उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंदार शिवयोगी आणि वनिता खेडगी-दोडमनी यांनी पत्रकार परिषदेत दिली. सालाबादप्रमाणे यंदा हा सोहळा गुरुवार दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता अक्कलकोट येथील श्री जागृत बारा ज्योतिर्लिंग देवस्थान येथे भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. या सोहळ्यात काली पुत्र श्री कानीचरण महाराज, नाशिक त्र्यंबकेश्वर मंदिराचे उपाध्ये भैरव पुत्र मयुरेश महेंद्र दिक्षीत महाराज, शेखर साने आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी काली पुत्र कालीचरण महाराज यांचे शिवतांडव स्तोत्र पठण होणार आहे. या सोहळ्यास मोठ्या संख्येने भक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मंदार शिवयोगी आणि वनिता खेडगी-दोडमनी यांनी केले आहे.

# जागतिक बँक अधिकाऱ्यांची अरणच्या समूल कंपनीला भेट

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २५ फेब्रुवारी-**

जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांनी अरण (ता. माढा) येथे सुरू होत असलेल्या समूल फार्मर प्रोड्युसर कंपनीला भेट दिली. महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या स्मार्ट प्रकल्पांतर्गत अरण येथील समूल कंपनीतर्फे फळे व पालेभाज्या याची मूल्यसाखळी विकसित केली जाणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या स्मार्ट प्रकल्पासाठी जागतिक बँकेने साधारण २२०० कोटी रुपयांचा पतपुरवठा केला आहे. या अंतर्गत अरण येथील या प्रकल्पास जवळपास पाच कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या प्रकल्पास महाराष्ट्र शासनाकडून तीन कोटी रुपयांचे अनुदान देण्यात येत आहे. या अनुषंगाने जागतिक बँकेचे अरविंद झांब, चारुलता शर्मा, आरसिया गुप्ता, वनिता कोम्पू यांच्यासह स्मार्टचे अतिरिक्त प्रकल्प संचालक उदय देशमुख, प्रकल्प अंमलबजावणी अधिकारी गुलाबराव भदाणे, नोडल अधिकारी मदन मुकणे या अधिकाऱ्यांनी प्रकल्प स्थळास भेट देऊन पूर्णत्वास येत असलेल्या कामासंदर्भात समाधान व्यक्त केले. यासोबतच या अधिकाऱ्यांनी कंपनीचे भागधारक शेतकरी व संचालक मंडळासमवेत विविध प्रश्नांवर चर्चा केली. यावेळी समूलचे अध्यक्ष देविदास काळे, उपाध्यक्ष सुषमा कोल्हाळे, कार्यकारी अधिकारी बालाजी गाडेकर, संचालक कीर्ती साठे, हिमानी कातकर, उमाजी देवकर, मोहन भोसले, वैशाली गाडेकर यांच्यासह सभासद शेतकरी उपस्थित होते.

> ही साखळी निर्माण करण्यासाठी समूलकडून परदेशातून फूड प्रोसेसिंग लाइन, डायसिंग कटिंग लाइन आदी मशीन मागविण्यात आल्या आहेत. स्मार्ट अंतर्गत महाराष्ट्र शासनाने या कंपनीस भरीव मदत केली आहे.
>
> **-बालाजी गाडेकर,**
> **कार्यकारी संचालक, समूल**



# शावरसिद्ध प्रशालेचा स्नेहमेळावा उत्साहात

## २००३-०४ च्या बॅचचा मेळावा; विद्यार्थ्यांनी दिला आठवणींना उजाळा

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २५ फेब्रुवारी-**

श्री शावरसिद्ध प्रशाला, आचेगांव येथील २००३-०४ सालच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावापार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक सिध्दारुढ काळे होते तर प्रमुख अतिथी म्हणून माजी मुख्याध्यापक शिवशरण म्हेत्रे उपस्थित होते.

स्नेहभेट कार्यक्रमात मुलांनी आपल्या मनोगतात भूतकाळातील आठवणींना उजाळा दिला, गणेश कुलकर्णी, महेश भीमन्नवरू, अमोगसिद्ध खोबण आणि संतोष नवगिरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि गुरुजनांविषयी कृतज्ञता व्यक्त केले. शिक्षक आपल्या मनोगतात विविध काव्यातून, कथेतून मार्गदर्शन केले. यावेळी कांबळे, जळगोडर, तळवार, दुलंगे, श्रीमती कुलकर्णी, आर.ए. पाटील, साबळे, माने, मुख्याध्यापक बिराजदार, बी.बी.पाटील, जयशंकर पाटील, बनसिद्ध गुरव उपस्थित होते. सूत्रसंचालन स्मिता पाटील आणि गंगाधर गायकवाड यांनी केले तर अमोल सुर्वे यांनी आभार मानले.

# राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ फेब्रुवारी-**

येथे राज्यस्तरीय सब-ज्युनियर मैदानी स्पर्धेचे थाटात उद्घाटन संपन्न झाले. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रभरातून सुमारे १ हजार ६०० खेळाडू उपस्थित होते. स्पर्धा ८, १०, १२ आणि १४ वर्षे या वयोगटांत आयोजित करण्यात आल्या होत्या. विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये १०० मीटर, ८० मीटर, ६० मीटर व ५० मीटर धावणे, गोळाफेक, लांब उडी यांचा समावेश होता. विजयी खेळाडूंना ट्रॉफी व मेडल देऊन गौरवण्यात आले. स्पर्धा यशस्वीपणे पार पडण्यासाठी मा आ प्रशांतराव परिचारक यांचे मार्गदर्शन लाभले. उद्घाटन समारंभास मान्यवरांची उपस्थिती स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी आ. समाधान आवताडे, आ. दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न झाले. यावेळी पोलीस उपअधीक्षक डॉ.अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे, अर्बन बँकेचे चेअरमन सतीश मुळे, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एस. नाईकनवरे, सचिव प्रा. राजू प्याटी नगरसेवक गणेश अधटराव व नगरसेवक महादेव धोत्रे हे प्रमुख उपस्थित होते. सूत्रसंचालन अविनाश कदम यांनी केले, तर आभार गजेंद्र पवार यांनी मानले. स्पर्धेला राज्यभरातील खेळाडू व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

> **स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन**
>
> या स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स असोसिएशनचे तज्ञ पंच नियुक्त करण्यात आले होते. स्पर्धा यशस्वीपणे पार पडण्याकरिता चेतन धनवडे यांनी स्पर्धा यशस्वीपणे पार पडल्या. तसेच कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे प्रा.विठ्ठल फुले व प्रा.अनिल परमार यांचे सहकार्य लाभले. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रा.सुभाष मस्के व गजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नागनाथ क्षीरसागर, अविनाश कदम, विष्णू शिंदे, चेतन धनवडे, आबा नवले, गणेश बागल, संतोषी देशमुख व त्यांच्या टीमने विशेष मेहनत घेतली.



# पोलीसदलात निवड झाल्याबद्दल काजल मगर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ फेब्रुवारी-**

श्री शिवाजी महाविद्यालयातील व्यवसाय अभ्यासक्रम (पॅरामेडिकल) विभागात शिक्षण घेतलेली काजल मगर यांची महाराष्ट्र राज्य पोलीस दलात निवड झाली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.बी.शेख यांच्या हस्ते तिचा या निवडीबद्दल सत्कार करण्यात आला.

पुणे विभागातील पिंपरी चिंचवड गटात ती पोलीस म्हणून रुजू झालेली आहे. यावेळी व्यवसाय अभ्यासक्रम विभागप्रमुख डॉ. दीपक जाधवर, पर्यवेक्षक वायकर, डॉ. सुचेता जवान, प्रा. सोमनाथ पेठकर, प्रा. बळीराम थोरे, प्रा. प्रेमसागर राऊत उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनतर्फे भोईरे तलाव स्वच्छ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ फेब्रुवारी-**

भोईरे येथे संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन शाखा बार्शी व वैराग यांच्यावतीने प्रतिवर्षीप्रमाणे सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांच्या आदेशाने अमृत प्रोजेक्ट-'स्वच्छ जल स्वच्छ मन' अंतर्गत भोईरे तलाव परिसर स्वच्छ करण्यात आला.



यावेळी सरपंच दशरथ टेकाळे, बाबा देशमुख, शहीद मेजर कुणाल गोसावी संस्थेचे संस्थापक शिवशंकर गोसावी, बार्शी ब्रँच इन्चार्ज महात्मा शशिकांत शिंदे, वैराग ब्रँच मुखी महात्मा अंगत अंबुरे, राजेंद्र चव्हाण, विठ्ठल बचुटे, उत्तम कावरे यांची उपस्थिती लाभली.

बार्शी व वैराग ब्रँचच्यावतीने दोन्ही युनिटमधील अधिकारी आ. किशोर ढोले, आ. ऋषिकेश शेळके, आ. संगीता भोसले, आ. चंद्रकांत उंबरे, आ. नागनाथ अंकुश, आ. नीता घोडके, साधसंगत व सेवादल यांचे मोलाचे सहकार्य लाभले. आभार बार्शी ब्रँच इन्चार्ज महात्मा शिंदे यांनी मानले.

## संक्षिप्त वृत्त...



### शेटफळ येथे भागवत कथेस प्रतिसाद

**करमाळा, दि.२५ फेब्रुवारी-**

महाशिवरात्रीच्या पर्वकाळात शेटफळ तालुका करमाळा येथे सुरू असलेल्या भागवत कथा सोहळ्याला भाविकांमधुन उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून येथिल लबडे परिवाराच्या वतीने या भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. शेटफळ तालुका करमाळा येथे स्व. लोचनाबाई दगडू लबडे, स्व. लक्ष्मीबाई महादेव लबडे व स्व. दगडू मारूती लबडे यांच्या स्मरणार्थ येथील प्रगतशील शेतकरी विलास लबडे यांच्या वतीने महाशिवरात्रीच्या पर्व व ग्रामदैवत नागनाथ महाराज यात्रा काळात श्रीमद् भागवत महाकथेचे आयोजन करण्यात आले असून. मयूर महाराज मोरे करकंब पंढरपूरकर व त्यांचे सहकारी या कथेचे सादरीकरण करत आहेत. याशिवाय दररोज सकाळी ज्ञानेश्वरी अनुष्ठान सोहळा हरिपाठ हरी भजन असे धार्मिक कार्यक्रम संपन्न होत आहेत. दि. २७ फेब्रुवारी रोजी या कथेची सांगता होणार आहे. यामध्ये शुकदेव महाराज यांनी परिक्षीती राज्याला शिक्षण सांगितलेल्या भागवत पुराणातील देवाच्या विविध अवतारांच्या कथा राम जन्मकथा कृष्ण जन्मकथा कृष्ण लीला आशा वेगवेगळ्या कथेचे विवरण केले जात असून दररोज वेगवेगळ्या वेशभूषेतील पौराणिक पात्रांचे जिवंत देखावे सादर करत आहेत. डॉ. सुहास लबडे राघवेंद्र लबडे व सर्व लबडे परिवाराच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात येत आहे.



### थायलंड आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेमध्ये सांगोल्याने मारली बाजी

**सांगोला, दि. २५ फेब्रुवारी-**

रत्ना बुडीट युनिव्हर्सिटी स्पोर्ट्स हॉल येथे थायलंड कराटे कप २०२५ या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये एकूण ३२ भारतीयांचा समावेश होता. त्यामध्ये सांगोल्यातून ३ व्यक्तींचा समावेश होता. या स्पर्धेमध्ये सांगोल्याला ४ पदके मिळाली. सीनियर गटामध्ये जी.के वाघमारे यांना कता प्रकारात सुवर्णपदक, १८ वर्षाच्या आतील गटामध्ये निजेंद्र चौधरीला सुवर्णपदक व २० वर्षाच्या आतील गटात आशिष कोकरेला कता व कुमितेमध्ये २ ब्रांझ पदके मिळाले. बेस्ट रेफ्रीचा निजेंद्र चौधरी व उत्कृष्ट प्रशिक्षकांचा जी.के.वाघमारे यांना सन्मान मिळाला. जी.के. वाघमारे हे गेली २७ वर्ष सांगोल्यातील मुला मुलींना कराटे प्रशिक्षण देत आहेत.

### साहित्य सेवा पुरस्कारासाठी डॉ. मनिषा झोंबाडे यांची निवड

**बार्शी, दि. २५ फेब्रुवारी-**

ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था, टाकळीभान, (ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) यांच्यावतीने दिला जाणारा उत्कृष्ट मराठी अध्यापन व साहित्य सेवा कार्यगौरव पुरस्कारासाठी यंदा बार्शीच्या डॉ. मनीषा जगन्नाथ झोंबाडे यांची निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार अहिल्यानगर जिल्ह्यात टाकळीभान येथे होणाऱ्या तिसऱ्या राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलनात प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. मनीषा जगन्नाथ झोंबाडे या लातूरच्या शिवाजी महाविद्यालय मुरुड येथे सहाय्यक प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. मराठी विषयाचे उत्कृष्ट अध्यापन कार्य व साहित्य सेवा केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात येत आहे. त्याबद्दल त्यांचे रुरल एज्युकेशन सोसायटी मुरुडचे अध्यक्ष अमर मोरे, सचिव विजय पाटील, अनिल माने, प्रा. धनंजय शिंदे, प्रा. प्रकाश शिंगणापूरे, प्रा. अविनाश नरसिंगे, प्रा. प्रकाश गवले, डॉ. श्रीधर कोल्हे, प्राचार्य डॉ. महेश बेटकर, प्राचार्य डॉ. अशोक काळम प्रा. डॉ. पुष्पा महाजन, प्रा डॉ. विजय कुमठेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.



### पक्ष्यांसाठी पिण्याचे पाणी ठेवा

**करमाळा, दि. २५ फेब्रुवारी-**

सध्या उन्हाळा सुरू झाला असल्याने चिमणी, कावळा व इतर पक्षांसाठी पिण्याचे पाणी थंड ठिकाणी ठेवावे, असे आवाहन माजी सरपंच लक्ष्मी सरवदे यांनी केले आहे. रानावनात हिंडणारे बागडणारे पशुपक्षी उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी इकडून तिकडे रानोमाळ फिरत असतात अशा पक्षांसाठी उथळ भांड्यात पाणी भरून ते थंड हवेच्या ठिकाणी सावलीला ठेवावे. उदाहरणार्थ झाड ,इमारतीच्या गच्चीवर, आवारात, घरांच्या आडोशाला अशा ठिकाणी पक्षांना पाणी पिण्यासाठी ठेवावे रानावनात स्वछंदीपणे हिंडणारे, बागडणारे, चिमुकले चिमुकले पशुपक्षी आपली तहान भागवू शकतील प्रत्येक संवेदनशील व्यक्तीने पक्षांना पिण्यासाठी पाणी ठेवावे.



## श्री संत नामदेव पायरीचा दरवाजा चांदीने मढविला

**कार्यकारी अधिकारी शेळके यांची माहिती**

**30 किलो चांदी, ४ लाखांचे सोने, चांदी वस्तू दान**

**नांदेड येथील भाविक अरगुलवार परिवारातर्फे सेवा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ फेब्रुवारी-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील श्री संत नामदेव पायरीच्या दरवाज्याला नांदेड येथील भाविक अरगुलवार परिवारातर्फे चांदी बसवून देण्यात आल्याची माहिती मंदिरे समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.



शंकर दिगंबर अरगुलवार व नरसिमलू दिगंबर अरगुलवार यांनी कै. दिगंबर तुकाराम अरगुलवार व कै. जनाबाई दिगंबर अरगुलवार या आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ सदरचे काम मोफत करून दिले आहे. सदरचे भाविक हे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे निस्सिम भक्त असून नियमित दर्शनासाठी येत असतात ते बिलोली जिल्हा नांदेड येथील रहिवासी असून, सदर दरवाजासाठी सुमारे ३० किलो चांदीचा वापर करण्यात आला असून, यासाठी सुमारे ३३ लाख ७५ हजार इतका मजुरीसह खर्च आला आहे. सदरकामी कारागीर म्हणून मे. जव्हेरी ज्वेलर्स, पंढरपूर यांनी सेवा दिली आहे. याशिवाय, त्यांनी २६ ग्रॅम सोने घंटन श्री रूक्मिणी मातेच्या चरणी तसेच १९.९ ग्रॅम सोने नाम व ४५ ग्रॅम चांदीचे जानवे श्री विठ्ठलाच्या चरणी अर्पण केले असून, त्याची बाजार मूल्यानुसार सुमारे ४ लाख १८ हजार इतकी किंमत होत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

## श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेच्या चरणी दोन लाख किंमतीचे अन्नधान्य

**पंढरपूर :** श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस श्री दत्त आश्रम संस्थान जालना यांचेकडून दोन लाख १५ हजार किंमतीचे अन्नधान्य व इतर वस्तू प्राप्त झाल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

मंदिर समितीचे श्री संत तुकाराम भवन येथे अन्नछत्र असून, या अन्नछत्रास उपयोगी साहित्य म्हणजे स्टील बादली २४ नग, जर्मन पाट्या २४ नग, वगराळे २४ नग, भातवाढी २४ नग, स्टील टब १२ नग, जर्मन पातेले ६ नग, स्टील जार ६ नग, सतरंजी, स्टील टोप १२ नग, धान्याचे डबे २ नग, प्लास्टीक बादल्या ६६ नग, प्लास्टीक मग २४ नग, गॅस शेगडी ५ नग, स्टीलचे जग ६ नग इत्यादी सुमारे एक लाख ८० हजार किंमतीचे साहित्य उपलब्ध करून दिले आहे. याशिवाय, १०० किलो साखर, १०० किलो गहू, १०० किलो तांदूळ, १०० किलो तुरीची दाळ, १०० किलो हरभरा दाळ व ४५ किलो खाद्यतेल इत्यादी सुमारे ३५ हजार किंमतीचा किराणा माल देखील उपलब्ध करून दिला आहे. यावेळी श्री दत्त आश्रम संस्थान जालना यांचे विश्वस्त, विभाग प्रमुख संजय कोकीळ व सहायक विभाग प्रमुख राजकुमार कुलकर्णी उपस्थित होते.



## धनुर्विद्या स्पर्धेसाठी भंडारीची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र धनुर्विद्या संघटना व रत्नागिरी जिल्हा धनुर्विद्या संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने २८ फेब्रुवारी ते २ मार्च दरम्यान डेरवण रत्नागिरी येथे होणाऱ्या सोळाव्या मिनी सब ज्युनिअर धनुर्विद्या स्पर्धेसाठी सिंहगड पब्लिक स्कूलच्या आदिती भंडारे हिची निवड झाली. आदितीच्या या निवडीबद्दल संस्थेचे संस्थापक एम एन नवले, कॅम्पस डायरेक्टर कैलास करांडे, प्राचार्या स्मिता नवले, मुख्याध्यापिका स्मिता नायर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आदितीचे अभिनंदन केले.



## सामाजिक क्षेत्रातील जेष्ठांचे कार्य दिशादर्शक

**डॉ. कुलकर्णी यांचे गौरवोद्गार**

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २५ फेब्रुवारी-**

विठ्ठल देशपांडे यांच्या सारख्या व्यक्तिंचे तरुण पणात केलेले सामाजिक विशेष करून कामगार क्षेत्रातील भरीव कार्य ते आज अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असले तरी येणाऱ्या पिढीसाठी दिशादर्शक असल्याचे गौरवोद्गार डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी काढले.

श्रीपूर येथील डॉ. सुधीर पोफळे यांचे श्री यश हॉस्पीटलमध्ये माळशिरस तालुका राष्ट्रीय साखर कामगार संघटनेचे सेवानिवृत्त खजिनदार विठ्ठल देशपांडे यांच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमात ते बोलत होते.



अकलूज येथील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. एम.के. इनामदार व श्रीयश हॉस्पीटल यांच्या वतीने या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास डॉ. एम.के.इनमदार, ॲड. सुहास देव, सामाजिक कार्यकर्ते अविदादा इनामदार, डॉ. सुधीर पोकळे, डॉ.डॉ. एखतपुरे, डॉ. पराडे-पाटील, डीसीसी बॅन्केचे व्यवस्थापक अभिनंदन गायकवाड, युनियनचे माजी सदस्य दत्ता माने , साधना इनामदार, डॉ. आरती पोकळे, कल्पना कुलकर्णी उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. सुधीर पोकळे यांनी केले. आभार संतोष जोशी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीपाद देऊसकर, मिलिंद कुलकर्णी, अभय परांडकर, निसार इनामदार, हेमंत दिक्षित, समाधान साठे यांनी परिश्रम घेतले.

## आवास योजनेंतर्गत अणदूरमधील १३२ लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि.२५ फेब्रुवारी-**

महाराष्ट्रात २० लाख घरकुलांना मंजुरी चे पत्र नुकतेच मिळाले असून,१० लाख लाभार्थ्यांच्या खात्यावर पहिला रू. पंधरा हजार हप्ता जमा झाल्याने गोरगरीब जनतेचे आपल्या स्वतः च्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. या योजनेअंतर्गत अणदुर मध्ये १३२ लोकांना लाभ, मिळाला असून त्यांच्या ही खात्यावर सुरुवातीचे पैसे पडले आहेत.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी देशातील २ कोटी नागरिकांना घरकुले देणार अशी घोषणा केली होती. या घोषणेची पहिल्या टप्प्याची पूर्तता दि. २२ फेब्रुवारी रोजी झाली आहे.विक्रमी हक्काचे घर प्राप्त करून देणाऱ्या या योजनेचे जनतेने स्वागत केले आहे. महाराष्ट्र राज्याला याचे प्रचंड मोठे झुकते माप मिळाले असून २० लाख बेघरांना घरकुल मंजुरी देण्याचे पत्र तर १० लाख लाभार्थ्यांच्या खात्यावर पहिल्या हप्त्याची रक्कम जमा वितरण कार्यक्रम नुकताच पुणे येथे देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते संपन्न झाला. या सोहळ्याचे थेट प्रसारण राज्यातील २८ हजार ग्रामपंचायतमध्ये करण्यात आले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य साहेबराव घुगे, प्रवीण घोडके, बापू घुगे, कार्यकर्ते, ग्रामपंचायत कर्मचारी, घरकुल लाभार्थी उपस्थित होते

## माळशिरस येथे रामदेव, मारुती मंदिराचा जीर्णोद्धार

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २५ फेब्रुवारी-**

श्री संत तुकाराम महाराज या मंदिरात कीर्तन करताना तल्लीन झाल्यानंतर हनुमानाकडे पाहून म्हणाले तुम्ही विश्रांती घ्या तेव्हापासून हनुमानाची मूर्ती निद्रा अवस्थेत असलेल्या आख्यायीकाचा धागा पकडून परमेश्वराने विश्रांतीसाठी तुमच्या गावाची निवड केली. हे तुमचे परमभाग्यच असल्याचे प्रतिपादन भटक्या व विमुक्त जमाती परिषद अध्यक्ष पद्मश्री गिरीशजी प्रभुणे यांनी माळशिरस येथील श्री रामदेव व मारुती देव मंदिराच्या जीर्णोद्धाराचा लोकार्पण सोहळा समारंभात बोलताना केले.

माळशिरस येथील श्री रामदेव व मारुती देव मंदिराचा जीर्णोद्धार अनिल फरांदे व त्यांच्या कुटुंबीयांनी केला त्याचा लोकार्पण सोहळा आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला. यावेळी प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक अनिल फरांदे, रवींद्र फरांदे, रमेश फरांदे, सुनिता फरांदे, हेमलता फरांदे, कल्पना फरांदे, मंदिर समितीचे अध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी, सचिव रामभाऊ दोशी, गोरख जाधव, वसंत लोंढे, संजय गायकवाड उपस्थित होते.

या लोकार्पण सोहळ्या निमित्त संपूर्ण मंदिरास फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. तसेच संपूर्ण मंदिर व शिखरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

प्रस्ताविक ॲड. मिलींद कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमाला शिवाजीराव देशमुख, माणिकराव वाघमोडे, पांडुरंग वाघमोडे, शिवाजीराव सिद, डॉ. सुभाष देशमाने, डॉ. मारुती पाटील, सुरेश टेळे, कैलास वामन, विकास धाईंजे, संतोष वाघमोडे, रामदास काळे, समाधान भोसले, सचिन टेळे, अनिल सावंत, गोरख पिसे, धनंजय मस्के, विठ्ठल पांढरे उपस्थित होते. कार्यक्रमानंतर फरांदे परिवाराच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. माळशिरस शहर किराणा व्यापारी संघटनेच्यावतीने सरबताचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन गुजरे यांनी केले तर आभार रामभाऊ दोशी यांनी मानले.



## ४१८ व्यावसायिकांना साडेदहा कोटींचे अनुदान

**जिल्हा उद्योग केंद्राचा उपक्रम**

**तरुणांना उद्योग उभारणीस हातभार**

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**सोलापूर, दि. २५ फेब्रुवारी-**

राज्य शासनाने तरूणांच्या हाताला रोजगार मिळावे व व्यवसाय करून तरूण स्वावलंबी बनला पाहीजे, म्हणून रोजगार निर्मितीसाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम सुरू केला आहे. या माध्यमातून शहरासह ग्रामीण भागातील उद्योजक तयार होऊन आर्थिक स्तर उंचावे , ही शासनाची उदात्त भूमिका आहे. यामुळे ग्रामीण भागातील मुलांमध्ये स्वावलंबी भावना निर्माण होऊन कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू होते. शिवाय समाजातील बेकारी कमी होण्यास मदत होते.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती अंतर्गत नवीन व्यवसाय करणार्या तरूण - तरूणींसाठी पस्तीस टक्के अनुदान देण्यात येते. मात्र विविध राष्ट्रीयीकृत बँका शासनाच्या नियमाला हरताळ फासुन तरूणांना व्यवसाय करण्यासाठी कर्ज नाकारतात. शासनाच्या धोरणानुसार कर्जमागणी केलेल्या प्रत्येकाला कर्ज उपलब्ध झाल्यास मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे. म्हणून राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मितीसाठी जिल्हा उद्योग केंद्राकडून अनुदान वितरित करण्याचे काम केले जाते. जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक कार्यालयाकडे उद्योग व्यवसायासाठी तरूणांनी केलेल्या कर्जाचे अर्ज मंजूर करण्यात येते. या कर्जाच्या अनुदानासाठी दहा कोटी ५३ लाख रूपयांचे अनुदान देण्यात आली आहे. जिल्ह्यातील एक हजार ६९० तरुणांनी जिल्हा उद्योग केंद्राकडे कपडे, दुचाकी स्पेअर पार्ट, होजिअरी, चप्पल यासह अन्य व्यवसाय थाटून रोजगार मिळविण्यासाठी कर्ज मागणीचे अर्ज सादर केले होते. यातील काही अर्जदारांच्या प्रकरणांना बँकांनी कर्जे नाकारली आहेत. तर ४१८ नवव्यावसायिकांना बँकांनी कर्जाची तयारी दाखवून कर्ज वाटप केली आहेत. ककर्जदार तरुणांना ही अनुदानाची रक्कम बँकेकडून वितरित करण्यात आली आहे. यात ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना प्रति लाखाला ३५ टक्के तर शहरातील व्यवसायिकांना प्रति लाखाला २५ टक्के अनुदानाची रक्कम दिली आहे. अनुदानाच्या रकमेमुळे कर्जदार व्यवसायिकाला आर्थिक आधार मिळाला आहे. तसेच, यामुळे कर्जाची रक्कमही आपोआप कमी झाली आहे. अनुदानाच्या माध्यमातून कर्जदारांना लाखाच्या पटीत अनुदान मिळाले आहे. शहरासह जिल्हयातील अनेक तरूणांनी जिल्हा उद्योग केंद्राकडून मंजूरी घेऊन बँकांकडे कर्ज मागणीसाठी अर्ज केला असता मोठया प्रमाणात कर्ज देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. ४१८ तरूणांना बँकांनी कर्ज दिला तरीही ४८९ जणांचे कर्ज नाकारले आहे. शिवाय ७८३ कर्जदारांचे प्रकरण प्रलंबित आहेत. त्यामुळे नवउद्योगासाठी प्रयत्न करणार्या पन्नास टक्के तरूणांना बँकांकडून कर्जपुरवठा होत असल्याचे दिसून येते. तर अनेक तरूणांना इच्छा असूनही बँकांच्या असहकार्य धोरणामुळे व कर्ज उपलब्ध न झाल्याने व्यवसाय करता येत नाही.

बँकांनी ४१८ तरुण उद्योजकांना कर्ज दिले आहे. यामुळे या सर्व तरुणांना अनुदान देता आले. दहा कोटी ५३ लाख रुपये इतक्या रकमेचे अनुदान वाटप करण्यात आले असून भविष्यातही जास्तीत-जास्त उद्योजक तयार करण्याचा या कार्यालयाचा प्रामाणिक प्रयत्न राहणार आहे. मात्र, बँकांनी थोडीशी नरमाईची भूमिका घेतल्यास उद्योजक तयार होतील.

**- सी.एच. गुळमे, जिल्हा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर,**

जिल्ह्यातून जेवढे अर्ज या कार्यालयात प्राप्त होतात. त्याची तपासणी करून मंजुरी दिली जाते. मग, ती प्रकरणे बँकांना पाठवण्यात येतात; पण बँका अनेकवेळा कर्ज नाकारतात. त्याने तरुण उद्योजक निर्मितीला खीळ बसते. जिल्हा उद्योग केंद्र नवउद्योजक तयार करून तरूणांना स्वावलंबी बनविते.

**- संतोष कोलते, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर**

### मुख्यमंत्री रोजगार निर्मितीमुळे स्वतःचे व्यवसाय

मुख्यमंत्री रोजगार निर्मितीअंतर्गत बँक ऑफ इंडीया मंद्रुपकडून उद्योग करण्यासाठी दहा लाख रूपयांचे कर्ज घेतले. जिल्हा उद्योग केंदाकडून पस्तीस टक्के अनुदानप्रमाणे साडेतीन लाख रूपयांचे अनुदान मिळाले. त्यामुळे स्वताचे व्यवसाय उभारण्यास मदत झाली.

**- भगवान सुतार, लाभार्थी तरूण, मंद्रुप**

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ■ श्री तुळजाभवानी चरणी अर्धा किलो सोन्याचा मुकुट अर्पण ■

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ फेब्रुवारी -**
श्रीतुळजाभवानी मातेच्या चरणी ठाणेस्थित भक्ताने ५४० ग्रॅम (सुमारे अर्धा किलो) सोन्याचा मुकुट अर्पण केला. देवीजींवर कुटुंबियांची नितांत श्रद्धा असून समर्पनाच्या भावनेतून देवीजींसाठी सुवर्णालंकार अर्पण केल्याचे भाविकांनी सांगितले.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान तर्फे भाविक कुटुंबीयांचा देवीजींची प्रतिमा व महावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी सहाय्यक जनसंपर्क अधिकारी अभिजित तेरखेडेकर, सुरक्षा निरीक्षक ऋषीकेष पाटील,



धार्मिक विभागाचे अमोल कर्डीले इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

भाविकाच्या विनंतीनुसार याठिकाणी भविकाची ओळख गुपित ठेवण्यात आली आहे. असे मंदिर संस्थांच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...




### श्वेता परदेशी यांना आदर्श महिला पुरस्कार

**तुळजापूर, दि.२५ फेब्रुवारी -**
तालुक्यातील बारूळ येथील श्वेता परदेशी यांना पहाट फॉंन्डेशन संभाजीनगर येथील संस्थेतर्फे सामाजिक क्षेत्रात असलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय पुरस्काराकरीता निवड समीतीच्या वतीने क्रांतीज्योती राज्यस्तरीय आदर्श महीला पुरस्कारासाठी दि.२३ फेब्रुवारी रोजी शेगाव (जि. बुलढाणा) येथे देण्यात आला. हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल लातुर धाराशिव सह संपुर्ण महाराष्ट्रातुन त्यांचे अभिनंदन होत आहे.




### बोळेगाव तलाठीपदावर शिवकन्या शिंदे

**जळकोट, दि.२५ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील बोळेगावच्या नुतन तलाठी शिवकन्या शिंदे यानी आपला पदभार स्विकारला असून बोळेगाव ग्रामस्थानी गावच्या पोलीस पाटील अश्विनी सुर्यवंशी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून स्वागत करण्यात आले. बोळेगाव गाव कामगार तलाठी सज्जावर कार्यरत असलेले तलाठी अमर पडवळ यांची अन्यत्र बदली झाल्याने त्यांच्या जागी शिवकन्या शिंदे यांची शासनाने तलाठी म्हणून नियूक्ती केली आहे. येथे कार्यरत असलेले तलाठी अमर पडवळ यांची बदली झाल्याने ग्रामस्थांच्यावतीने सरपंच विलास पाटील यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला. यावेळी उपसरपंच शांताबाई मुलगे, ग्रा.प.सदस्य अंगद जाधव, संगीता सुरवसे, चैतन्य रुपनुर, सोपान सुरवसे, पंडीत सुरवसे, संजय सुरवसे, ग्रामस्थ उपस्थित होते.




### शिवजयंतीनिमित्त महाआरोग्य शिबिर संपन्न

**तुळजापूर, दि.२५ फेब्रुवारी -**
जय भवानी तरूण मंडळ व जाणता राजा युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित शिवाजीमहाराज जयंतीनिमित्त महाआरोग्य शिबीर दि.२६ फेब्रुवारी रोजी घेण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, ऋषी मगर, रणजीत इंगळे, आनंद जगताप, सिव्हिल सर्जन डॉ. चोरमले, कन्या प्रशालेचे मुख्याध्यापक गाडे, ढोले यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक मंडळाचे आधारस्तंभ अमोल कुतवळ यांनी केले. यावेळी सुदर्शन वाघमारे, राजाभाऊ चोपदार, रूशी साळुंके, शुभम खोले, शुभम दहीहंडे, राहुल भालेकर, विशाल साखरे, संकेत मस्के, कृष्णा साळुंके, साक्षी दहिहंडे, ज्ञानेश्वरी आडेकर यांनी हे शिबीर संपन्न केले.



### मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांचा सत्कार

**तेरखेडा, दि.२५ फेब्रुवारी -**
भाजपचे ज्येष्ठ नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांचा वाढदिवस दि.२३ फेब्रुवारी रोजी परंडा येथे कार्यकर्त्यांनी मोठ्या जोशात साजरा केला. यावेळी ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना भाजपचे जिल्हा चिटणीस सचिन इंगोले, तालुका सरचिटणीस सुधीर घोलप, प्रदीप ठाकूर, गणेश बोराडे उपस्थित होते.



### वंचितकडून मांजरे यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.२५ फेब्रुवारी -**
पोलीस ठाण्याचे नुतन पोलीस निरीक्षक आण्णासाहेब मांजरे यांचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सत्कार करण्यात आला. वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष धम्मशील कदम, जिल्हा सहसचिव आर.एस. गायकवाड, आशुतोष कदम, महेश इंदापूरकर, आकाश शिरसाठ, राकेश कदम, औदुंबर सोनवणे यांच्यासह शहरातील वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### वंदे मातरम तरुण मंडळाकडून अन्नदान

**तुळजापूर, दि.२५ फेब्रुवारी -**
वंदे मातरम् तरुण मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त तुळजाभवानी केंद्रीय आश्रम शाळा येथे लहान मुलांना अन्नदान करण्यात आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक नरवडे, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब सुभेदार, जयकुमार पांढरे, चेतन पांडागळे, बालाजी पानढवळे, विशाल शिंदे, मोहसीन खान, ऋतिक वांजरे, कुलदीप ढाले, वैभव पायाळे, यश धाकतोडे, विकी गुंड, शाळेचे आलट इत्यादी उपस्थित होते.

# पेन्शनची रक्कम दुसऱ्याच्या खात्यात जमा; भविष्य निर्वाह निधी अधिकाऱ्यांकडून थट्टा?

▶▶ राज्य परिवहन मंत्री सरनाईक यांच्या कार्यालयाचा अजब कारभार... ▶▶ सेवानिवृत्तीच्या सात वर्षानंतर देखील एस.टी. चालकास पेन्शनच मिळेना...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ फेब्रुवारी -**
शासकीय किंवा निमशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांची भविष्य निर्वाह निधीमध्ये दरमहा त्यांच्या वेतनातून कपात केली जाते. संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्या भविष्य निर्वाह निधी कार्यालयाच्या माध्यमातून पेन्शन दिली जाते.

ती हक्काची पेन्शनच त्यांच्या म्हातारपणी शाश्वत आर्थिक आधाराची काठी असते. त्या पेन्शनवरच त्यांच्या सर्व गरजा भागविल्या जातात. मात्र ती हक्काची पेन्शनच राज्य परिवहन महामंडळामध्ये इमाने-इतबारे सेवा करून सेवानिवृत्त झालेल्या बस चालकास गेल्या सात वर्षांपासून भविष्य निर्वाह निधी व धाराशिव विभागीय नियंत्रक कार्यालयातील गेंड्याची कातडी पांघरून घेतलेल्या निगरगट्ट प्रशासनाने अद्यापही पेन्शन मंजूर केलेली नाही. महत्त्वाचे म्हणजे सेवानिवृत्तीनंतर तब्बल एक वर्ष धाराशिव विभागीय कार्यालयाने सोलापूर येथील पेन्शनचा प्रस्तावच भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे पाठविला दिला नाही हे विशेष.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेत ५ मे १९८६ रोजी सेवेत दाखल होऊन कळंब आगारातून दि.३१ मे २०१८ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या मोहम्मद अमीर शेख (चालक क्र.९३१२) यांच्या पेन्शनचा प्रस्ताव धाराशिव येथील विभागीय कार्यालयाने सोलापूर येथील भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे तब्बल एक वर्ष उशिराने दि.२५ मे २०१९ रोजी पाठविला. त्यांच्या भविष्य निर्वाह निधीचा क्रमांक ई.पी.एस. क्रमांक ४६६२ असताना धाराशिव येथील विभागीय कार्यालयाने १५८३८ या दुसऱ्याच व्यक्तीचा क्रमांक पाठवून दिला.



त्यामुळे सोलापूर येथील कार्यालयाने तो प्रस्ताव नामंजूर केला. पेन्शन सुरू होत नसल्यामुळे मोहम्मद शेख यांनी सोलापूर व धाराशिव येथील कार्यालयात याबाबत अर्ज करून ती सुरू करण्याची मागणी केली. त्यावेळी सोलापूर येथील भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने तुमचे पैसे आमच्याकडे जमा नाहीत असे सांगितले. त्यानंतर शेख यांनी दि.२१ जुलै २०२१ रोजी विनंती केली असता पुन्हा धाराशिव विभागीय ईपीएस क्रमांक ३४२५ व ६५७२ हे चुकीचे क्रमांक टाकून पुन्हा सोलापूर कार्यालयात सादर केले.

त्यामुळे सोलापूर येथील कार्यालयाने तो प्रस्ताव पुन्हा नामंजूर केला.

### परिवहन मंत्री याकडे लक्ष देतील का?

ज्या कर्मचाऱ्यांची अशी अवस्था केली आहे. ते खाते राज्य परिवहन खाते आहे. विशेष म्हणजे परिवहन खात्याचे मंत्री हे जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक हे आहेत. त्यांच्याच खात्यातील चिरीमिरीला चटवलेल्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी ही दुर्दशा केली आहे. त्यामुळे पालकमंत्री सरनाईक हे या पिडीत कुटुंबाला न्याय देतील का ? असा प्रश्न पीडित कुटुंबियांनी विचारला आहे.

# तहसीलदारांच्या दालनात आत्मदहनाचा प्रयत्न

### बेकायदेशीर वीट भट्टीवर संघटनेचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील बेकायदेशीर वीट भट्टी प्रकरणावर अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे पदाधिकारी सक्रिय झाले आहेत. २५ फेब्रुवारी रोजी तुळजापूर तहसील कार्यालयात त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांच्या दालनात ज्वलंत पदार्थ घेऊन आत्मदहनाचा प्रयत्न केला. यावेळी तहसीलदार आपल्या खुर्चीवर बसले होते आणि पोलिसांनी मध्यस्थी करून त्यांना रोखले.

यावेळी समितीचे जिल्हाध्यक्ष गणेश पाटील यांनी आरोप केला की, तालुक्यात अनेक ठिकाणी बेकायदेशीर वीट भट्टी चालवण्यात येत असून, प्रशासन या कारवाईकडे दुर्लक्ष करत आहे. त्यांनी सांगितले की, संबंधित विटभट्टी चालकांना शासनाच्या नियमानुसार परवाना घेण्याची आवश्यकता आहे, परंतु ते हे टाळत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे आणि शासनाचा कर देखील चुकवला जात आहे.



पाटील यांनी आरोप केला की, संबंधित प्रशासन व विटभट्टी चालक यांना खतपाणी देत आहेत आणि या भ्रष्टाचारामुळे समितीच्या कार्यकर्त्यांच्या जीवास धोका निर्माण झाला आहे. त्याचबरोबर, समितीच्या कार्यकर्त्यांना पोलीस संरक्षण देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

समितीने या प्रकरणाची योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली असून, प्रशासनावर दबाव टाकला आहे.

यावेळी, समितीच्या कार्यकर्त्यांच्या जीवितास धोका झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित अधिकारी व विटभट्टी चालक यांच्यावर राहील, असा इशारा पाटील यांनी दिला.

# सुधारीत संचमान्यतेस शिक्षक परिषदेचा विरोध

### शासन निर्णय रद्द करण्याची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ फेब्रुवारी -**
१५ मार्च , २०२४ च्या शासन निर्णयानुसार होत आलेल्या जिल्हा परिषद शिक्षकांच्या सुधारीत संच मान्यतेमुळे हजारो शिक्षक अतिरिक्त होणार आहेत. शिक्षकांना अतिरिक्त करणारा १५ मार्च, २०२४ चा जाचक शासन निर्णय त्वरित रद्द करण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी शिक्षण सचिवांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, पहिली ते पाचवी पर्यंतच्या २० पटाच्या शाळांकरीता एक शिक्षक व नंतर दुसऱ्या पदावर आवश्यकतेनुसार विद्यार्थी संख्या उपलब्ध झाल्यास एक सेवानिवृत्त शिक्षक देण्यात येणार आहे. २० ते ६० पट संख्या असल्यास दोन शिक्षक व ६१ ते ९० पट संख्या असल्यास तीन शिक्षक मिळणार आहेत. पूर्वी ६१ पट संख्या झाल्यास तिसरा शिक्षक मिळत असे. मात्र आता ही संख्या किमान ७६ झाल्याशिवाय तिसरा शिक्षक मिळणार नाही.

२१० पटसंख्येच्या शाळेत पुढील प्रत्येक शिक्षकासाठी आता ३० ऐवजी ४० पटसंख्या लागणार आहे. तसेच ज्या शाळेत सहावी ते आठवी पर्यंत २० पेक्षा कमी पटसंख्या आहे, अशा शाळांना शुन्य शिक्षक दाखविण्यात आले आहेत. शिक्षक नसल्याने मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे.

फक्त आधार व्हॅलिड विद्यार्थी संख्या गृहीत न धरता शाळेतील प्रत्यक्ष पटावरील विद्यार्थी संख्येवर आधारित शिक्षक पद निर्धारण करण्यात यावे आणि १५ मार्च २०२४ चा जाचक शासन निर्णय त्वरित रद्द करण्यात यावा, अशी मागणी केली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी केली आहे.

# वर्षातून एकदाचा उघडले जाणारे मंदिर महाशिवरात्रीनिमित्त आज खुले

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ फेब्रुवारी -**
नळदुर्ग शहरातील पुराणिक यांच्या वाड्यात असलेल्या प्राचिन श्री महादेव मंदिरात महाशिवरात्रीदिवशी दरवर्षी एकदाच भाविकांना दर्शन घेण्यासाठी उघडले जाते. हे मंदिर जमिनीच्या ४० ते ५० फुट खोल असून, ३६४ दिवसांनंतर महाशिवरात्रीच्या दिवशी, २६ फेब्रुवारी रोजी भाविकांसाठी उघडले जाईल. महाशिवरात्रीच्या रात्री १२ वाजता मंदिर पुन्हा बंद केले जाते.



नळदुर्ग शहराला प्राचिन किल्ल्यांसह अनेक धार्मिक स्थळांचा ऐतिहासिक वारसा आहे.

या मंदिराचा इतिहास पाचशे ते सहाशे वर्षांपूर्वीचा आहे. पुराणिक कुटुंबीय या मंदिराची देखभाल करीत आहेत. सध्या पुराणिक कुटुंबाच्या पाचव्या पिढीने या मंदिराची देखभाल सुरू ठेवली आहे. मंदिरात शिवलिंग असून, त्यावर सुंदर नक्षीकाम केले गेले आहे.

महाशिवरात्रीच्या दिवशी मंदिरात जाण्यासाठी अरुंद पायऱ्या उतराव्या लागतात. या मंदिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यामधून बोरी नदीकडे जाणारा भुयारी मार्ग आहे, जो आजही सुस्थितीत आहे. त्याकाळी राजा किल्ल्यापासून या भुयारी मार्गाद्वारे मंदिरात दर्शन घेत असे.

भाविकांना दर्शनाच्या वेळी मंदिरात केळी आणि शाबू खिचडीचे वाटप केले जाते.

याठिकाणी महाशिवरात्रीसाठी पुराणिक कुटुंबीय दिवसभर परिश्रम घेतात.

# दिंडेगाव येथील सद्गुरू शिवराम बुवा महाराज यात्रेस आजपासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२५ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील मौजे दिंडेगाव येथील ग्रामदैवत श्री सद्गुरू शिवराम बुवा महाराज यात्रेस बुधवार दि.२६ फेब्रुवारी महाशिवरात्री रोजी प्रारंभ होत असून शुक्रवार दि.२८ फेब्रुवारी रोजी दुपारी काल्याचे किर्तन व महाप्रसादाचे वाटप होणार आहे.

या सद्गुरू शिवराम बुवा महाराज यात्रेस तुळजापुर, उमरगा, कळंब, भुम, अक्कलकोट, सोलापूर, धाराशिव, मोहोळ, लोहार, औसा, निलंगा, लातूर आदि भागातून बहुसंख्य वारकरी भाविक भक्त या यात्रेस उपस्थित राहतात.

त्यामुळे श्री संत सद्गुरू शिवराम बुवा महाराज यांची यात्रा ही ग्रामीण भागात खुप मोठ्या प्रमाणात भरते.

यात्रेकरू भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी मंदिर कमिटी व ग्रामपंचायतच्या वतीने पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली आहे. परिसरातील जवळपास ४० ते ५० दिंड्या उपस्थित राहतात.

# डॉक्टर झालेल्या पाच नातींचा आजोळात सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ फेब्रुवारी -**
तालुक्यातील देवकुरुळी येथे जाधव परिवारातील पाच नातींचा डॉक्टर झाल्याबद्दल त्यांचे आजोबा कैलास जाधव यांनी राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, द्राक्ष बागायत संघ महाराष्ट्र अध्यक्ष शिवाजी पवार, शासकीय गुत्तेदार सुनील माने या मान्यवरांच्या हस्ते डॉ. ऋतुजा जीवन जाधव, डॉ. पल्लवी हेमंत वडणे, डॉ. गीता हरिदास मुळूक, डॉ. राखी मधुकर धनके, डॉ. वैष्णवी मधुकर धनके यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रा. जीवन जाधव, कैलास जाधव, सुहास जाधव, रोहन जाधव,




सुमित जाधव, रजत जाधव, कुलदीप जाधव, विकास जाधव, वैभव जाधव, प्रदीप जाधव, बाळासाहेब जाधव, संदीप जाधव आदिने परिश्रम घेतले.

यावेळी शिवाजी पवार, सुरेश दाजी, सुनील माने, डॉ. पल्लवी वडणे, डॉ. ऋतुजा जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रदीप पाटील, तर उपस्थितांचे आभार प्रा. जीवन जाधव यांनी मानले.

# एफआरपी दर वाढत असताना साखरेची एमएसपी न वाढल्याने आर्थिक संकट येवून साखर उद्योग शॉर्ट मार्जिनमध्ये : बी.बी. ठोंबरे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ फेब्रुवारी -**
ऊसाची रास्त आणि किफायतशीर किंमत (एफआरपी) ही २७०० वरून ३४०० रूपयांपर्यंत वाढली आहे. तर साखरेचा किमान विक्री दर (एमएसपी) मागील पाच वर्षे ३१०० रूपये आहे. यामध्ये वाढ करण्याची वारंवार मागणी केंद्राकडे करूनही सकारात्मक निर्णय झालेला नाही. त्यामुळे साखर उद्योग सध्या शॉर्ट मार्जिनमध्ये (अपुरा दुरावा) येवून प्रचंड आर्थिक संकटात आल्याची माहिती वेस्ट इंडियन शुगर मिल्स् असोसिएशनचे (विस्मा) अध्यक्ष बी.बी. ठोंबरे यांनी दिली.

नेटाफिम ड्रीपतर्फे फर्टिगेशन आणि ॲटोमेशनद्वारे एकात्मिक ऊस व्यवस्थापन या विषयावरील दोन दिवसांच्या कार्यशाळेत ते अध्यक्ष पदावरून बोलत होते. नेटाफिम ड्रीपतर्फे फर्टिगेषन आणि ॲटोमेशनद्वारे एकात्मिक ऊस व्यवस्थापन या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन माजी साखर आयुक्त व यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी कृषी विभागाचे फलोत्पादन संचालक डॉ. कैलाश मोते, कावेवेरी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रवीण राव, कोल्हापूर कृषिविद्यापिठाचे सहयोगी अधिष्ठाता रविंद्र बनसोड, वसंतदादा



शुगर ईन्स्टीटयुटचे शास्त्रज्ञ पी.पी. शिंदे, पाडेगांव संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे, नेटाफिम ईरिगेशनचे कार्यकारी अधिकारी विकास सोनवणे, विभाग प्रमुख कृष्णात महामुलकर आदींसह ५० साखर कारखान्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. साखर कारखान्यांच्या संख्या वाढीसह दैनंदीन ऊस गाळप क्षमता वाढल्याने ऊस गाळप हंगाम १६० दिवसांवरून ७० ते ९० दिवसांवरच येवून ठेपला आहे.

त्यामुळे उर्वरीत दिवसात मळीपासून ईथेनॉल निर्मितीवर भर देण्यासाठी दुहेरी पीक पद्धत घेण्याची संधी असल्याचे नमूद करून बी.बी. ठोंबरे म्हणाले, साखर कारखान्यांनी केवळ साखर उत्पादनावर अवलंबून न राहता साखरे बरोबरच बायप्रॉडक्ट तयार करावेत आणि त्यामधून आर्थिक स्थैर्य मिळवून साखर कारखान्याची आर्थिकस्थिती टिकवून ठेवण्याचा सातत्याने प्रयत्न करावा, असे त्यांनी आवर्जून नमूद केले.

# सांज चिमणपाखरांचा कलाविष्कार चिंचपूर (खु) येथे संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२५ फेब्रुवारी -**
चिंचपूर (खु) येथे शिवजन्मोत्सव व सांज चिमनपाखराचा रंगारंग कार्यक्रम पार पडला. परंडा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचपूर (खु) व सर्वेवस्ती येथील शाळेत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन वसंत पाटील, रमेश बारस्कर, केंद्रप्रमुख संतोष देवकर, सरपंच निर्मला गरड यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमात आंबी पोलीस स्टेशनचे एपीआय. खरड, ग्रामसेवक भैरवाड, तानाजी तरंगे, खरात, गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# कारवाईचे अर्धशतकही पुर्ण न करत पोलिस 'बाद' तर रेती माफियांची पून्हा तुफान 'फटकेबाजी'




**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २५ फेब्रुवारी**

चॅम्पीयन्स ट्रॉफी सुरू असल्यामुळे सर्वत्र क्रिकेट सामन्यांमध्ये जोरदार फटकेबाजी होत असताना आता रेती माफियांची देखील रेती उपसा, वाहतुक करण्याची तुफान फटकेबाजी सुरू केली आहे. तर दुसरीकडे कारवायांचे अर्धशतकही पुर्ण न करत पोलिस 'बाद' झाले असल्याचे दिसून येत आहे.

फेब्रुवारी महिन्याच्या सुरवातीसच जिल्हा पोलीस प्रशासनाने रेती माफियांवर जोरदार कारवाई सत्र सुरू केले. या कारवाई सत्रात जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी पुढाकार घेतल्याने शहर, परिसरासह जिल्हाभरात पोलीसांनी दमदार कारवाया करत कोट्यावधींचे साहित्य जप्त केले तर अनेकांवर गुन्हे दाखल केले. कारवाईच्या धास्तीने रेती माफियांनी रेती उपसा वाहतुक जवळपास बंदच केली होती. रेती उपसासाठी आलेल्या बिहारी टोळ्या परतीच्या मार्गावर होत्या परंतू मागील दोन ते तीन दिवसापासून अवैध रेती उपसा, वाहतुक मोठ्या प्रमाणात सुरू आहे. केवळ रात्रीच्या वेळेसच नव्हे तर शहर, परिसरातील हस्सापुर, असर्जन आदी ठिकाणाहुन सकाळी ९ वाजेपर्यंत रेती वाहतुक सर्रासपणे सुरू असल्याचे दिसून येत आहे. पोलीसांनी अवैध रेती वाहतुकी विरोधात कडक भुमिका घेतल्याने रेती उपसा, वाहतुक बंद होईल अशी अपेक्षा नांदेडकर व्यक्त करत होते. परंतू अवघ्या १५ दिवसानंतर पुन्हा अवैध रेती उपसा, वाहतुकीने जम बसविण्याची तयारी सुरू केली आहे. एकीकडे क्रिकेट चॅम्पीयन ट्रॉफीमध्ये फटकेबाजी सुरू असताना त्याच पध्दतीने रेती माफियांनी रेती उपसा, वाहतुक केली असुन या फटकेबाजीला रोखण्यात पोलीस कशी गोलंदाजी करतील याकडे नांदेड वासीयांचे लक्ष लागले आहे.

**पंधरा दिवसातच पुन्हा अवैध रेती उपसा सुरू**

जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी दुचाकीवर नदी पात्रापर्यंतचा प्रवास करत अवैध रेती उपसा करणाऱ्यांवर कारवाई केली. या कारवाईमुळे जिल्हा पोलीस दलावर समाज माध्यम, प्रसिध्दी माध्यमातून मोठ्या प्रमाणात अभिनंदनाचा वर्षाव झाला. जिल्हा पोलीस दल या कारवाईत सात्यता ठेवेल अशी अपेक्षा असतानाच केवळ १५ दिवसानंतर पुन्हा अवैध रेती उपसा, वाहतुक सुरू झाली असल्याने नांदेडकर आश्चर्य व्यक्त करत आहेत.

# आ. चिखलीकरांच्या पाठपुराव्यामुळे घरकुलांसाठी दोन लाखांचे अनुदान

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २५ फेब्रुवारी**

ग्रामीण भागातील पंतप्रधान ग्रामीण आवास योजनेत घरकुल बांधणीसाठी लाभार्थ्यांना किमान दोन लाख रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी आ.प्रताप पाटील चिखलीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी केली होती.

ग्रामीण आवास योजनेतील राज्यातल्या लाभार्थ्यांना मंजुरी पत्र व थेट खात्यात अनुदान वितरण कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ग्रामीण आवास योजनेत दोन लाख रुपये अनुदान देण्याची घोषणा केली. लोहा तालुक्यातील पंतप्रधान ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थ्यांना आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली घरकुल लाभार्थ्यांना मंजूरी पत्र व थेट खात्यात अनुदान सोहळा ऑनलाइन प्रणालीद्वारे तहसील कार्यालय संपन्न झाला.



यावेळी तालुक्यातील ९ हजार २९० घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात थेट डीबीटीमार्फत अनुदान जमा करुन दुसऱ्या टप्प्यातील लाभार्थ्यांना मंजुरी आदेश आ.प्रताप चिखलीकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला गटविकास अधिकारी डि. के. आडेराघो, माजी सभापती आनंदराव पाटील, बाबुराव केंद्रे उमरगेकर, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, शिवसेना उपजिल्हा प्रमुख बाळासाहेब कऱ्हाळे, माजी सभापती खुशाल पांगरीकर, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, उपनगराध्यक्ष दता वाले, माजी उपसभापती नरेंद्र गायकवाड, मारोतराव पाटील बोरगांवकर, शिवसेना संघटक मिलिंद पवार, भास्कर पाटील, पंचायत समिती कार्यालयीन अधीक्षक प्रियदर्शन वाघमारे, अभियंता सचिन माने, अभियंता मांजरमकर, रमेश वाघमारे, अर्जुन राठोड, मारुती कदम घरकुल विभाग प्रमुख दिनेश तेलंग यांसह सरपंच, उपसरपंच लाभार्थी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## महाशिवरात्रीनिमित्त नगरेश्वर मंदिरातर्फे आज पालखी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २५ फेब्रुवारी**

प्रतिवर्षाप्रमाणेच महाशिवरात्रीनिमित्त श्री नगरेश्वर वैश्य मंदिर, सराफा, नांदेड च्यावतीने बुधवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७-३० वाजता श्री नगरेश्वर महादेव पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ६९ व्या अखंड हरिनाम सप्ताहांतर्गत सायंकाळी ५ ते ७ या वेळेत ह.भ.प. ज्ञानेशभक्त डॉ. महेश महाराज शेवाळकर यांचे हरिकीर्तन होणार आहे. भाविकांनी कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष भागवत गंगमवार, सचिव सुरेश कोडगिरे आणि धार्मिक समतीप्रमुख गणेश गादेवार यांनी केली आहे.



नांदेड- नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पो.नि. ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या पथकाने जप्त केलेला देशी-विदेशी दारूचा ३ लाख ४४ हजार ९६५ रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला.

## अवैध व्यवसायाविरोधात
## गावकऱ्यांनी दिला उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. २५ फेब्रुवारी**

तालुक्यातील कुंटूर पोलीस ठाणे कोणत्या ना कोणत्या कारणास्तव सतत चर्चेत राहते. गेल्या वर्षामध्ये येथील पोलीस ठाण्यात अनेक सहाय्यक पोलीस निरीक्षक आले परंतु आज पर्यंत कुंटूर ठाण्याच्या हद्दीतील आंतरगाव, कुंटूर फाटा येथे मोठ्या प्रमाणात चालणारे जूगार व अवैध रित्या दारू विक्री व्यवसायाला लगाम घालण्यात त्यांना यश आले नाही. त्यामुळे अशा व्यवसायाच्या विरोधात अनेक गावच्या अनेक वेळा लेखी व तोंडी तक्रारी दिल्या. परंतु ठाणेदारांना मात्र आळा न घालता उलट अतिशय जोमाने चालविण्यासाठी एका प्रकारे पाठबळच दिल्याची शंका अंतरंगावातील गावकऱ्यांच्या मनात निर्माण होत आसल्याने येथील तंटामुक्ती अध्यक्ष माजी सरपंच प्रकाश शिंदे यांनी या विरोधात उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

कुंटूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील यांनी ठाण्याचा पदभार स्वीकारल्या पासून ठाण्याच्या हद्दीत अंतरगाव, कुंटूर फाट्या यासह अनेक भागांमध्ये अवैध व्यवसायाने सध्या तरी डोके वर काढले आहे. विना रॉयल्टी दहा टायरी वाळूचे मोठ मोठे हायवा भरून वाळू वाहतूक होतांना दिसून येत आहे. हा सर्व प्रकार कुंटूर ठाणे प्रमुखांना माहीत असतांनाही कुठली ही कार्यवाही होताना दिसून येत नाही. हे अवैद्य व्यवसाय अनेक वर्षापासून चालत असल्याने यांना अभय कोणाचे आहे ?असा प्रश्न कुंटूर पोलीस ठाण्या अंतर्गत येणाऱ्या गावातील सामान्य जनतेतून उपस्थित केला जात आहे. तर गेल्या काही दिवसांपासून अवैध दारू विक्रीमुळे ठाण्यात अंतर्गत गावातील अनेकांचे संसार उध्वस्त होत आहेतच उलट शाळेतील लहान मूले देखील व्यसनाधीन होत असल्याचे चित्र सध्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. त्याबद्दल यापूर्वी विविध दैनिकातून बातम्या प्रसिद्ध होऊन ही ठाणे प्रमुखांनी कुठलीच कारवाई केलेली दिसून आली नसल्यामुळे अवैध व्यवसायिकांचे मनोबल उंचावले आहे. त्यामुळे असे सर्व अवैध धंदे बंद करण्यासाठी कुंटूर ठाण्यातंर्गत येणाऱ्या गावांपैकी अंतरंगावातील माजी सरपंच तथा तंटामुक्ती अध्यक्ष प्रकाश शिंदे व गांवकऱ्यातुन मागणी केली आहे. तर येणाऱ्या काही दिवसात हे अवैध व्यवसाय बंद नाही केल्यास अंतरगावातील गांवकऱ्यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर चालक पोलीसांच्या ताब्यात

**कुंडलवाडी**-मांजरा नदीच्या पात्रातून वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकास कुंडलवाडी पोलीसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून ३ लाख ६ हजारचा मुद्देमाल जप्त केला आहे. दि.२५ फेब्रुवारीच्या पहाटे पोलीसांनी हरनाळी शिवारातील मारोती मंदिरा समोरून कुंडलवाडी कडे येणाऱ्या ट्रॅक्टर क्र. एम. एच. २६, बि.क्यू. ८६१८ ला थांबूवून पाहिले असता ट्रॅक्टर मध्ये वाळू असल्याचे आढळले. सदर ट्रॅक्टर चालकाकडे परवाना नसल्याने ट्रॅक्टर चालक व मालक हणमंत सायबु जलदेकर रा. हरनाळी यास ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला करण्यात आला असुन पुढील तपास पो.हे.कॉ. माधव पाटील करीत आहेत.

### विद्यापीठात नवोदित कवींसाठी कविता लेखन कार्यशाळेचे आयोजन

**नवीन नांदेड**-महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ७ मार्च रोजी विद्यापीठात नवोदित कवींसाठी 'कवितालेखन कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत मान्यवर कवी, अभ्यासक आणि समीक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा नि:शुल्क असून विद्यापीठ आणि विविध महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास शिक्षण घेणारे आणि लेखनाची आवड असणारे विद्यार्थी कार्यशाळेत सहभागी होवू शकतात. इच्छुक विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाच्या प्राचार्य अथवा विभाग प्रमुखांच्या शिफारस पत्रासह कार्यशाळा संयोजक तथा मराठी भाषा अधिकारी डॉ. पी. विठ्ठल (९८५०२४१३३२) यांच्याशी संपर्क साधून नावनोंदणी करावी. या कार्यशाळेत ५० विद्यार्थ्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. ही कार्यशाळा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राच्या सभागृहात होणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल, असे संयोजक डॉ. पी. विठ्ठल यांनी कळवले आहे.

### अवैध देशी दारु विक्री करणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल

**कुंडलवाडी**-विना परवाना देशी दारू विक्री करणाऱ्या दोघा विरुध्द कुंडलवाडी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. कुंडलवाडी पासून जवळ असलेल्या धर्माबाद तालुक्यातील शेळगाव (थडी) येथे आपल्या किराणा दुकाना समोर देशी दारूची बेकायदेशररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्या प्रकरणी विजय नागनाथ रामपूरे यांच्या विरुध्द कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्याच्याकडून देशी दारुच्या ३ हजार ३६० रुपये किंमतीच्या ४८ बाटल्या जप्त केल्या आहेत. तसेच कुंडलवाडी पासुन जवळच असलेल्या बिलोली तालुक्यातील चिरली येथील सुमनबाई भगवान कदम यांच्या विरुध्द देखील गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यांच्याकडून १ हजार ५४० रुपये किमतीच्या २२ बाटल्या जप्त करण्यात आले असून पुढील तपास स. पो. नि. ज्ञानेश्वर शिंदे यांच्या मार्गर्शनाखाली सुरू आहे.

### शिल्पाताई लोखंडे यांना जनसंवाद पुरस्कार

**नांदेड**- येथील सामाजिक कार्यकर्त्या शिल्पाताई लोखंडे यांना यावर्षीचा



जनसंवाद पुरस्कार खा. रविंद्र चव्हाण, आ. श्रीजया चव्हाण, डॉ. गजानन देवकर, नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी संचालक माधवराव मातुळकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरिषभाऊ गोरठेकर, माजी कृषी सभापती बाळासाहेब रावणगांवकर, स्वागताध्यक्ष सतिश पाटील मातुळकर, निमंत्रक बालाजी सूर्यतळे, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती जनसंवाद पुरस्कार निवड समितीच्या वतीने देण्यात आली.

### चैतन्यनगर शिवमंदिरात महाशिवरात्री निमित्त आज सालासर मंडळाची भजन संध्या

**नांदेड**-चैतन्यनगर शिवमंदिर (नांदेड) येथे महाशिवरात्रीचा भव्य उत्सव भव्य स्वरूपात आज साजरा होत असून यानिमित्त विवीध धार्मिक



कार्यक्रमा सोबत भजन गायन आयोजित करण्यात आले आहेत. नांदेड येथील सुप्रसिध्द असलेले सालासर भजनी मंडळ, नंदी महाराज भजनी मंडळ, शिवा शिव भजनी मंडळ, जागृत महिला मंडळ काबरानगर यांचा भजनाचा कार्यक्रम होणार आहे. दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भावीक भक्तांना दिवसभर अखंडपणे साबुदाणा खिचडी चे वाटप सुरू राहणार आहे. भाविकांना शंभूचे सुलभतेने व कमी वेळात दर्शन उपलब्ध व्हावे याकरिता बॅरिकेट लावून पुरुष व महिलांच्या वेग वेगळ्या दर्शन रांगा तयार करण्यात आल्या आहेत. तसेच उन्हापासून भावीकाना त्रास होऊ नये याकरिता मंदीर परिसरात सावलीची व पिण्यासाठी थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. १२ क्विंटल शाबुदाण्याची खिचडी तयार करण्यात येत आहे. तसेच फळांचे वाटप करण्यात येणार आहे. श्री शिव मंदिर संस्थानच्या सभागृहात दिवसभर विविध भजनी मंडळा द्वारे भजनाचा कार्यक्रम राहणार आहे. भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन चैतन्यनगर शिवमंदिर समिती च्या वतीने केले आहे.

# बितनाळ येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना टी-शर्ट वाटप

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २५ फेब्रुवारी**

तालुक्यातील बिसनाळ येथिल शाळेत प्रजासत्ताक दिनाचे औचित्यसाधून आयोजित केलेल्या सप्तरंग कलाविष्कार सांस्कृतिक कार्यक्रमातून प्राप्त झालेल्या निधी मधून इयत्ता पहिली ते सातवी विद्यार्थ्यांना टी-शर्ट वाटप करण्यात आले .

दि. २४ फेब्रुवारी रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बितनाळ येथील विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी रोजी आयोजित केलेल्या सप्तरंग कलाविष्कार कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिकांकडून बक्षीस रुपी मिळालेल्या निधीतून इयत्ता पहिली ते सातवी च्या मुला-मुलींना टी-शर्ट वाटप करण्यात आले. मुलींसाठी पोपटी कलर व मुलांसाठी शेंदरी कलरचे टी-शर्ट वाटप करण्यात आले. टी-शर्ट वाटप करताना सरपंच प्रतिनिधी मारोतराव पाटील उमाटे,



उपसरपंच प्रतिनिधी देविदास अक्कमवाड, माजी सरपंच प्रतिनिधी मारोतराव वाघमारे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागनाथ घुमलवाड, उपाध्यक्ष बालाजी पाटील सूर्यवंशी, प्रमोद अटपलवाड, किशोर लोखंडे, सुधाकर सूर्यवंशी, शाळेचे मुख्याध्यापक भगवान संपतवार व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

सप्तरंग कलाविष्कार कार्यक्रमाची तयारी शाळेचे मुख्याध्यापक भगवान संपतवार, शेख मौला शिक्षक वडमिले एल. के., घोगरे यु. एस., पेंडलवार एस. पी, कल्याणकर एम. बी., तांबरे आर. जी. , कळसकर के. एन., मोटरवार व्ही. बी., शिवनखेडकर शरदचंद्र यांनी विद्यार्थ्यांकडून करून घेतली. बितनाळ केंद्रप्रमुख संतोष चाटोरीकर यांचे पण कार्यक्रमासाठी अमूल्य असे मार्गदर्शन लाभले. सर्व गावातील नागरिकांनी मुख्याध्यापकांचे व सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## आचारातून विचार पेरणारे राष्ट्रसंत गाडगे बाबा : पेटेकर

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. २५ फेब्रुवारी**



दिवसभर हातात स्वतः झाडू घेऊन गाव स्वच्छ करून रात्री विचारांची पेरणी करून डोके स्वच्छ करणारे आपल्या स्वतःच्या आचारातून विचार पेरणारे राष्ट्रसंत गाडगेबाबा होते. असे प्रतिपादन साहित्यिक बालाजी पेटेकर यांनी केले. आदमपूर येथील ग्रामपंचायत कार्यालयातर्फे राष्ट्रसंत गाडगे बाबा महाराजांच्या जयंती निमित्त आयोजीत कार्यक्रमात ते बोलत होते.

बाप हो, पैसे नसेल तर जेवणाचे ताट मोडा, हातावर भाकरी खा, बायकोले लुगडं कमी भावाच घ्या,पण मुलाले शाळेत घातल्याशिवाय राहू नका असे संत गाडगेबाबा म्हणतं. सार्वजनिक स्वच्छता, अज्ञान, अंधश्रद्धा निर्मूलन,शैक्षणिक सुधारणा, जातीभेद,अस्पृश्यता,व्यसनमुक्ती,प्राणीहत्या,अशा अनेक साम जिक विषयांवर कीर्तनाच्या माध्यमातून जन-जागृती करणारे, भुकेल्यांना अन्न, गरीब मुला-मुलींना शिक्षण, बेघरांना घर, रोग्यांना औषध द्या,असे आवाहन करणारे, महाराष्ट्रातील एक महान खरे कृतीयुक्त समाजसुधारक संत गाडगेबाबा असल्याचे बालाजी पेटेकर यांनी सांगितले.

यावेळी चंद्रकांत देवारे (माजी जि.प सदस्य,)मारुती राहीरे (भाजपा जिल्हा सरचिटणीस, नांदेड), कपिल भुसावळे (सरपंच प्रतिनिधी आदमपूर)गजानन शिनगारे(ग्रा.प सदस्य), मारुती दंडे (तलाठी), अनिल कोलमवार, दशरथ सूर्यवंशी, वाघमारे संदीप, सलीम पिंजारी, व गावातील नागरिक उपस्थित होते.

## मुदखेड येथे तिसऱ्या धम्म परिषदेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २५ फेब्रुवारी**

नालंदा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीन मुदखेड येथे दि. २ मार्च रोजी अखिल भारतीय भव्य बुद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ९:२० वाजता समता सैनिक दल पथसंचलन तसेच मोफत आरोग्य शिबीर, प्रा नितीश कऱ्हाळे, कवी नितीन चंदनशिवे, मार्शल सुनील सारीपुत्त यांचे व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आव्हान नालंदा चॅरिटेबल ट्रस्ट, बोद्ध भूमी प्रशिक्षण केंद्र धम्म परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे. या वर्षी बोद्ध भूमी प्रशिक्षण केंद्र महात्मा फुले चौक अशोका नगर मुदखेड दि. २ मार्च रोजी आयोजन केले आहे. अखिल भारतीय बोद्ध महासभा कार्याध्यक्ष भीमराव यशवंतराव आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार



आहे. मोफत सर्व रोगनिदान आयोजित आरोग्य शिबिरात रुग्णांची तपासणी केली जाणार आहे. प्रख्यात व्याख्याते प्रा. नितीश कऱ्हाळे, कवी नितीन चंदनशिवे, मार्शल सुनील सारीपुत्त हे आपल्या खरमरीत शैलीत मार्गदर्शन करणार आहे. बोद्ध धम्म परिषदेत धम्मदेशना भिक्खू डॉ. खेमधाममो महाथेरो, भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो, भिक्खू डॉ. प्रा. एम. सत्यपाल महाथेरो, भिक्खू डॉ. इंदवंश महाथेरो, भिक्खू ज्ञानरक्षित थेरो, भिक्खू पाय्यारत्न थेरो, भिक्खू पाय्यबोधी थेरो, भिक्खू शिलरत्न थेरो, भिक्खू धम्मशील थेरो, भिक्खू पाय्यानंद थेरो, भिक्खू संघपाल थेरो, भिक्खू सुभूती थेरो, भिक्खू अश्वजित थेरो, भिक्खू रेवातबोधी,भिक्खु बोद्धीधम्मा,भिक्खू बुद्धभूषण,भिक्खू पाय्यावर्धन,भिक्खू पाय्यवंश, भिक्खू गगनबोधी, भन्ते पाय्यदीप, भन्ते पाय्यासार करणार आहेत. बोद्ध धम्म परिषदेचा लाभ घ्यावा असे आव्हान डॉ. उपगुप्त महाथेरो पुर्णा,प्रा. डॉ. सत्यपाल महाथेरो, भिक्खू शिलरत्न थेरो, भिक्खू गगनबोधी धम्मदेसना देणार आहेत.

आज समाजामध्ये व्यसनाधीनता वाढत आहे. अकुशल संस्कार दूर सारून कुशल संस्कार मनावर व्हावे बहुजन समाजातील व्यसनाधीनता अज्ञान अंधकार दारिद्रता दूर व्हावी आणि माणूस म्हणून सर्वांना जीवन जगता यावे याकरिता तिसऱ्या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रा. डॉ. एस सत्यापाल महाथेरो मुळावा यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# पंधरा दिवसांचे करतात काम अन् महिनाभराचा मिळवतात दाम

## रुई आरोग्य उपकेंद्रातील अधिकारी-कर्मचारी पंधरा दिवसांच्या एकदाच सह्या मारुन राहतात अनुपस्थित

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २५ फेब्रुवारी**

तालुक्यातील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र रुई येथे कंत्राटी कामगार आरोग्य सेविका वगळता इतर सर्व अधिकारी व कर्मचारी १५ दिवसांतून फक्त एक दिवस उपकेंद्रात येतात व एकदाच १५ दिवसांच्या सह्या करतात अशी खळबळजनक माहिती सरपंचासह इतर प्रतिष्ठित नागरिकांनी दिल्यावरुन तालुका रुग्ण कल्याण समितीचे सदस्य तथा आमदार भीमराव केराम यांचे प्रतिनिधी अनिल वाघमारे यांनी सरपंच लताबाई गणेश राऊत व इतरांसह रुई प्राथमिक आरोग्य उपकेंद्रास सकाळी १०:२२ वाजता भेट दिली असता उपकेंद्राच्या बाहेरील व आतील प्रवेशद्वारावर कुलुप लावलेले निदर्शनास आले व उपकेंद्राचे सर्व अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले याबाबत तालुका आरोग्य अधिकारी माहूर यांना



कळविण्यात आल्यावर तालुका आरोग्य अधिकारी यांच्या सूचनेवरून उपकेंद्राचा पंचासमक्ष पंचनामा करण्यात आला असून, अनुपस्थित राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मागील अडीच ते तीन वर्षांपासून जिल्हा परिषद कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद सदस्य हे अध्यक्ष असलेल्या रुग्ण कल्याण समितीची बैठकच झालेली नाही. सध्या या समितीच्या अध्यक्षपदाचा कारभार तालुका आरोग्य अधिकारी हे बघत आहेत.असे असले तरी माहूर तालुका रुग्ण कल्याण समिती मात्र विलक्षण क्टीव्ह मोडवर असून, आज सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:२२ वाजता आरोग्य उपकेंद्रास आ.भीमराव केराम यांचे प्रतिनिधी तथा रुग्ण कल्याण समिती सदस्य अनिल वाघमारे यांनी सरपंच लताबाई गणेश राऊत , पोलिस पाटील परिसरात कामाजी भोयर, ग्रामपंचायत सदस्य संजय बाळकृष्ण चाफेकर, रास्त भाव दुकान चालक नागोराव सुर्वे उपसरपंच चरणसिंग चुंगडे , उत्तमराव सुकळकर व गावातील इतर प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थितीत प्राथमिक आरोग्य उपकेंद्र,रुई येथे भेट दिली असता बाहेरील मुख्य प्रवेशद्वार व आतील प्रवेशद्वार कुलुपबंद अवस्थेत आढळून आले तर उपकेंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत अनुपस्थित निदर्शनास आल्याने तालुका आरोग्य अधिकारी डॉ.राजेश माचेवार यांच्या सूचनेवरून तालुका आरोग्य सहाय्यक एस.आर.जोगपेटे यांनी पंचासमक्ष पंचनामा करुन तालुका आरोग्य अधिकारी यांना पंचनामा पाठविला आहे.

माहूर तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय अंतर्गत आष्टा,वाई बाजार , सिंदखेड, वानोळा व इवळेश्वर अशी ०५ प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्या अंतर्गत एकूण २७ उपकेंद्र आहेत.यातील इवळेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत सदरील रुई येथील आरोग्य उपकेंद्र येतो.

रुई येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रातील अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत अनुपस्थित राहत असल्या बाबतीत तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित अनुपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार असल्याची माहिती माहूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेश माचेवार यांनी तरुण भारतशी बोलताना दिली आहे.

लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## नागरी सुविधांच्या अभावामुळे नागरीक त्रस्त; मनसे आंदोलनाच्या पावित्र्यात

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर दि.२५ फेब्रुवारी -**

स्वामी विवेकानंद नगर ते व्यंकटेश नगर, नाईक चौक या ठिकाणी गेल्या २५ वर्षापासून रहिवाशी परिसर असून सुध्दा या भागात अद्यापही परिपूर्ण नागरी सुविधा झालेल्या नाहीत.

सदरील परिसरात पक्के रस्ते, नाली, सफाई, यांचा अभाव असल्याने परिसरात सांडपाण्याची, कचऱ्याची समस्या मोठ्या प्रमाणात येत असून परिसरातील बहुतांश रस्ते कच्चे असल्याने पावसाळ्यात नागरीकांना चिखलातून ये-जा करावी लागते.

सदरील परिसरातील नगर परिषद प्रशासनाने तात्काळ लक्ष देवून परिसरातील रस्ते, सांडपाण्यासाठी नाली विकास काम निर्माण करावे. अन्यथा या परिसरातील समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना उदगीरला तीव्र आंदोलन करावे लागेल. आशा अशयाचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मुख्याधिकारी,नगर परिषद, उदगीर यांना देण्यात आले.

यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष संजय राठोड, शहर उपाध्यक्ष केदार पुराणिक, आदित्य पाटील, आदित्य कनाडे, वैभव सांगवीकर, ओमकार कनाडे, कुमार कनाडे, किशोर बिरादार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### विद्यार्थ्यांची जेईई मेन्समध्ये कामगिरी

**उदगीर, दि.२५ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (एनटी) तर्फे जानेवारी २०२५ मध्ये घेतलेल्या जेईई मेन्स सेशन-१ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. ध्रुव पारसेवार यांनी ९९.९१ पर्सेंटाइल मिळवत महाविद्यालयात अव्वल स्थान मिळवले. तसेच मारमवार वेदिका (९० पर्सेंटाइल), सायली सोनकांबळे (८६ पर्सेंटाइल), वैष्णवी मोरे (८५ पर्सेंटाइल), शुभम उगीले (७९.४३ पर्सेंटाइल) आणि हर्षल कांबळे (७३.३५ पर्सेंटाइल) यांनीही उत्तम कामगिरी केली. या यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, डॉ. रेखा रेड्डी, रामचंद्र तिरुके आणि प्रा. मनोहर पटवारी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य एस.जी. कोडचे, पर्यवेक्षक प्रा.एस.व्ही. मूडपे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एस.टी. कांबळे यांनी केले, तर आभार प्रा.एन.के. खांडेकर यांनी मानले.



### निलंगेकर कुटुंबाचे आ. स्वामींकडून सांत्वन

**निलंगा, दि.२५ फेब्रुवारी -**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत डॉ. शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या पत्नी सुशीलाबाई पाटील-निलंगेकर यांचे वृद्धापकाळान निधन झाले. त्याबद्दल उमरगा व लोहारा तालुक्याचे आ. प्रवीण स्वामी यांनी सोमवार दि.२४ फेब्रुवारी रोजी अशोक बंगला येथील निवासस्थानी निलंगेकर कुटुंबाची भेट घेवून सांत्वन केले. याप्रसंगी माजी खासदार रुपा पाटील-निलंगेकर, प्रदेश काँग्रेसचे अशोक पाटील-निलंगेकर, महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय शिवाजीराव पाटील-निलंगेकर उपस्थीत होते. यावेळी दिलीप भालेराव, राजेंद्र साळुंके, उमेश स्वामी, धर्मराज जाधव, श्रीशैल बिराजदार आदी उपस्थित होते.

### वलांडीत आज मोफत नेत्रतपासणी शिबीर

**वलांडी, दि.२५ फेब्रुवारी -**

देवणी तालुक्यातील वलांडी येथे महाशिवरात्रीनिमित्ताने मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर दि.२६ फेब्रुवारी बुधवारी आयोजित करण्यात आले आहे.



वलांडी येथील रहिवासी असलेले लक्ष्मीकांत बंग यांनी आपल्या आजी-आजोबांच्या स्मरणार्थ या शिबीराचे आयोजन केले आहे. या शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून मंहत मौनी महाराज, पुजारी बालाजी मंदिर, बालाजीवाडी यांच्यासह डॉ. रामप्रसाद लखोटिया, डॉ. सुदाम बिरादार, डॉ. विलास गरड, डॉ. श्रुती गरड हे तपासणी शिबीरात यांची सेवा राहणार आहे. बंग कुटुंबीय हे सतत धार्मिक, आरोग्य, सामाजिक कार्यात सतत कार्यरत असतात त्यांच्या या समाजसेवी वृत्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे. तरी वलांडी परिसरातील गरजूंनी या शिबीराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




### भिंगोली येथील मोफत आरोग्य शिबिर

**शिरूर अनंतपाळ, दि.२५ फेब्रुवारी -**

तालुक्यातील भिंगोली येथे दि.२४ फेब्रुवारी रोजी आयोजित केलेल्या शिवनेरीच्या विशेष वार्षिक शिबिरात ग्रामीण रुग्णालय शिरूर अनंतपाळ यांच्या सहकार्याने आयोजीत शिबीरात तज्ञ डॉक्टरांनी नागरिकांच्या आरोग्य तपासणीत जवळपास १०४ रुग्णाची शुगर बीपी सांधेदुखी, पित, आर्लजी, आस्थमाच्या अशा विविध आजारा संदर्भात तपासणी करून रुग्णांना औषध गोळ्या दिल्या. जवळपास ४१ महिला व पुरुषांच्या रक्ताचे नमुने घेऊन तपासणीसाठी पाठवले. याकामी ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. अनंत पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब त्रिभुवन, कपील वलांडे, अक्षय लांडगे, अरुण शिंदे, कर्मचारी प्रियंका बिडवे यांच्या सहकार्यातून आरोग्य तपासणी केली. शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ. अमोल इंगळे, डॉ. पांडुरंग मुठ्ठे, बाळासाहेब पाटील, संजय कुंभार, आश्विनी पवार, प्रणाली सुडे, मयुरी बावलगावे, आदर्श धुमाळे, तातेराव कांबळ, ओमकार लिंबापुरे, राहूल काकडे, दिलीप बानाटे यांनी शिबिर यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

### लोहाऱ्यात गाडगेबाबाची जयंती साजरी

**लोहारा, दि.२५ फेब्रुवारी -**

लोहारा शहरातील महात्मा फुले चौकात संत गाडगेबाबा महाराज याची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संत गाडगेबाबानी जनतेला स्वच्छता, शिक्षण, समाजसेवा, आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचे उपदेश दिले. यावेळी बालाजी मक्तेदार, शंकर जाधव, शैलेश जट्टे, यशवंत चंदनशिवे, गौरव रोडगे, अमित बोराळे, तम्मा स्वामी उपस्थित होते.

# दोन जिल्ह्यातील भूकंपग्रस्त गावांच्या विकासासाठी पुनर्विकास आराखडा : आ. पवार

## किल्लारी ग्रामस्थांच्या वतीने आ. अभिमन्यू पवारांचा नागरी सत्कार...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२५ फेब्रुवारी -**

लातूर-धाराशिव जिल्ह्यात झालेल्या भूकंपाने तीन दशके ओलांडली आहेत. भुकंपानंतर त्या गावात करण्यात आलेल्या मूलभूत सुविधा आता अपुऱ्या ठरत असल्याने या दोन जिल्ह्यातील भूकंपग्रस्त गावांची पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता आहे. या भूकंपग्रस्त ५२ गावांसाठी पुनर्विकास आराखड्याची मागणी सरकारकडे केली होती.त्यानुसार मुख्यमंत्र्यांकडून प्रस्ताव मागणी सुरू असून यानिमित्ताने संपूर्ण भूकंपग्रस्त गावांचा विकास साधला जाणार असल्याचे आमदार अभिमन्यू पवार यांनी यावेळी सांगितले.

किल्लारी ग्रामपंचायतीच्या वतीने आ. अभिमन्यू पवार यांचा नागरी सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. सरपंच सुलोचना बाबळसुरे, सुभाष भोसले, सुभाष जाधव, संतोष मुक्ता, धनराज भोसले, शरद भोसले, बंकट पाटील, डॉ. श्रीनिवास लज्जा, सत्यभामा भोसले, सतीश भोसले, राजकुमार जळकोटे, सुधाकर डावखुरे, सुरज बाबळसुरे, सुरज भोसले, अभिजीत बाबळसुरे आदी उपस्थित होते.

आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, किल्लारी गावांच्या विकासाच्या दृष्टीने दोन महत्त्वाचे प्रश्न होते. यापैकी एक निळकंठेश देवस्थान विकास. निळकंठेश्वर मंदीराच्या विकासासाठी ६८ लाखांचा निधी यापुर्वी मंजूर केला होता. मात्र जागेअभावी निधी परत गेला. आता निळकंठेश देवस्थान विकासासाठी निधी व जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तर गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेला किल्लारी कारखाना सुरू करण्यात आला आहे.

आणि या कारखान्याच्या गाळप क्षमतेचे काम सुरू आहे. येणाऱ्या गळीत हंगामात २५०० मे. टन पेक्षा अधिक गाळप क्षमतेने सुरू होईल. तसेच ३ लाखांपेक्षा अधिक गाळपाचे उदिष्ट पुर्ण करेल. किल्लारी ३० खेडी पाणीपुरवठा पुनर्जीवित करण्यासाठी ३८ कोटींचा निधी खर्च करण्यात आला आहे.



यानंतरही योजना किल्लारी साठी कमकुवत ठरत असल्यास किल्लारी साठी माकणी धरणातून एक स्वतंत्र पाणीपुरवठा योजना सुरू करण्याचा विचार निश्चित करण्यात आला असून येणाऱ्या काळात केला जाईल.

किल्लारीसह परिसरातील विकासाबरोबर कार्ला, कुमठा व मोगरगा गावांच्या पुनर्वसनाचा पाठपुरावा सुरू आहे.

किल्लारी येथे तात्पुरत्या स्वरूपात बस थांबा निवारा उभारण्यात येणार असून यासाठी २० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच येणाऱ्या काळात किल्लारी कारखान्यासमोर भव्य व्यापारी संकुल उभारले जाणार असल्याचे यावेळी बोलतांना आ. अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

## ४२ कुटुंबांसाठी आनंदाची बातमी...

## वलांडी येथे घरकुल मंजुरी आदेश



**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२५ फेब्रुवारी -**

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील २० लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वाटप करण्यात येत आहे.

त्यातील १० लाख लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पहिला हप्ता थेट जमा करण्यात आला आहे. ही योजना केवळ घरकुलांसाठी नाही तर गरजू कुटुंबांना स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्यास मदत करणारी आहे. याच अनुषंगाने वलांडी ग्रामपंचायत कार्यालयात आज ४२ लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी आदेश देण्यात आले. तसेच प्रत्येक लाभार्थ्यांच्या बँक खात्यात १५,००० रुपये अनुदान थेट जमा करण्यात आले. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने सरपंच राणी भंडारे यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

कार्यक्रमास उपसरपंच महेमुद सौदागर, ग्रामविकास अधिकारी सगर एम.व्ही., रामभाऊ भंडारे, मुस्ताक कादरी, महेश रामानुज बंग, गंगाधर विभुते, संजीव गायकवाड, अर्जुन बादलगावे, विठ्ठल बनसोडे, नसीमा शेख यांच्यासह लाभार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठवाडा स्तरीय उत्कृष्ट शोध व विकास वार्ता आणि जीवनगौरव पुरस्काराचे थाटामाटात वितरण

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२५ फेब्रुवारी -**

उदगीर तालुका पत्रकार संघाच्या वतीने उत्कृष्ट, शोध व विकास वार्ता गटातील पुरस्काराचे वितरण आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या ज्येष्ठ पत्रकारांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. खा. डॉ. शिवाजीराव काळगे, माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या शुभहस्ते सदरील मराठवाडा स्तरीय पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक संचालक (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, लातूर श्याम टरके यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी ज्येष्ठ पत्रकार एम.बी. पटवारी, व चंद्रचकोर कारखाने यांना जीवन गौरव पुरस्कार व मानपत्र, स्मृतीचिन्हे देऊन गौरविण्यात आले. तसेच मराठवाड्यातील उत्कृष्ट शोध वार्ता विकास वार्ता संदीप शिंदे, बालाजी बिराजदार, बालाजी थेटे, गणेश जाधव, युवराज धोत्रे, डी.ए. कांबळे, सुशील देशमुख, संग्राम वाघमारे, सचिन चोबे, केतन ढवन, गोकुळ पवार, गोरख भुसाळे, नवनाथ इधाते, गोकुळ पवार, सुशील देशमुख, रवींद्र सोनवणे, संगम डोंगरे, बाबासाहेब उमाटे, संजय पाटील, अंबादास जाधव, शिवशंकर टाक यांना रोख रक्कम, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी खा.डॉ. शिवाजीराव काळगे यांनी त्यांच्या भाषणात पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक प्रश्न सुटू शकतात. मुद्रीत माध्यमांचे आजही विश्वासामुळे महत्व अबाधित आहे असे सांगत, आपल्याला मिळालेल्या संधीचा उपयोग समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी व्हावा अशी अपेक्षाही व्यक्त केली.

यावेळी साकेत संजय दुंगे यांनी लहान मुलीचा पाण्यात बुडताना प्राण वाचवल्यामुळे मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवीण जाहुरे यांनी केले आभार रवींद्र हसरगुंडे यांनी मानले.

## शिरूर अनंतपाळ येथील युवकांचा लोकसभा, राजसभा अभ्यास दौरा

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२५ फेब्रुवारी**

शहरातून व तालुक्यातून कवी, लेखक, साहित्यीक तसेच रसिक हे देशाची राजधानी दिल्लीमध्ये संपन्न होत असलेले तीन दिवसीय ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या साहित्य संमेलनाचा आनंद घेतल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे व सुधीर लखनगावे यांच्या मार्गदर्शनाखाली देशाची संसद पाहण्याचा योग आला. त्यात १९५० साली संविधान सभेचे आयोजन व संविधानाचे पहिले वाचन झालेले ऐतिहासिक सेंट्रल हॉल, तसेच नवीन लोकसभा व राज्यसभा



अधिवेशन काळात होत असलेल्या अद्यावत सुखसुविधा असलेले सभागृह तसेच जुनी लोकसभा व नविन लोकसभा यातील फरक व नविन लोकसभेत संपुर्ण देशातील राज्याचा सांस्कृतिक, धार्मिक तसेच ऐतिहासिक अश्या सर्व दृष्टीने तयार केलेले देखावे विविध स्थळे आणि सर्व केंद्रिय मंत्री मंडळातील मंत्री यांचे कार्यालय, सर्व राष्ट्रीय पक्षाचे कार्यालय, राष्ट्रपती भवन, कार्यालयीन कामकाज, विविध विभागाचे सचिव भेटी या सर्व गोष्टीचा जवळून अनुभव घेतला.

यावेळी महादेव आवाळे, सुधीर लखनगावे, रमेश उंबरगे, प्रा. सुधीर येरोळकर, कुणाल लोनावत, डॉ. मडके, फाळके, विठ्ठल आदित्या, दाभाळे उपस्थीत होते.

## सुंदर, स्वच्छ अभियानाला जोरदार सुरुवात...हजारो हात लागले कामाला

## औश्यात स्वच्छता मोहिमेत अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२५ फेब्रुवारी -**

औसा नगरपरिषदेच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या सुंदर, स्वच्छ अभियानाला पहिल्याच दिवशी उत्फुर्त प्रतिसाद मिळाला असून बसस्थानक व शापिंग काम्पेक्स परिसरात राबविण्यात आलेल्या या स्वच्छता चळवळीत शासकीय, प्रशासकीय, अधिकारीव कर्मचाऱ्यांसह पोलिस व पत्रकारांनी सहभाग घेतला. अवघ्या दोन तासात हजारों हातानी परिसर स्वच्छ करुन स्वच्छता अभियानाची जोरदार सुरुवात केली आहे.

स्वच्छता अभियानात प्रशासकीय अधिकाऱ्यांनी पुढाकार घेत आपले कार्यालय व परिसरापासून सुरुवात केली. उपविभागीय पोलिस अधिकारी कुमार चौधरी यांनी कार्यालयापासून सुरुवात केली. तर तहसिलदार घनशाम अडसुळ यांनी तहसिल कार्यालय व परिसर स्वच्छ करुन या अभियानाची मुहुर्तमेढ रोवली. शिक्षक संघटना, एसटी महामंडळ, आरोग्य विभाग, नगरपालिका, शहरातील सर्व कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, व्यापारी आणि तरुणांनी एकत्रित येवून स्वच्छता अभियानास सुरुवात केली. सकाळी ७ ते ९ या दोन तासात बसस्थानक व शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या तळ मजल्याची स्वच्छता केली. पालिकेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे, सपोनि. सुनील रजितवाड, डॉ. सगरे, पंढरी ग्रुपचे पदाधिकारी, सेवाभावी संस्था, पत्रकार, व्यापाऱ्यांनी सहभाग घेतला होता.

यावेळी कुमार चौधरी, घनशाम अडसुळ, मंगेश शिंदे, पोनि. सुनील रेजितवाड, सुरेश पाटील, मुस्तफा खाँदे, दामोधर पाटील, प्रसाद चौधरी, श्रीशैल्य बिराजदार, महेमुद शेख, बेलेश्वर कल्याणी, महादेव भोसले आदी कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये चांगुलपणा जपावा : ब्रह्मकुमारी महानंदा बहेनजी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२५ फेब्रुवारी -**

विद्यार्थी जीवन हे पुन्हा न येणारे आहे. त्यामुळे या काळात उत्तम शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी सुशिक्षित होण्यासोबत सुसंस्कृत बनावे. त्यासोबतच स्वतः मध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांनी चांगुलपणा जपावा असे आवाहन येथील प्रजापिता ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या संचालिका ब्र.कु. महानंदा बहेनजी यांनी केले.

रोटरी क्लबच्या वतीने येथील उदय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना ई लर्निंग साठी कॉम्पुटर व अन्य साधन सामुग्री भेट देण्यात आली. तसेच रोटरी क्लबच्या वतीने फेब्रुवारी महिना हा जागतिक शांतता महिना म्हणून साजरा करण्यात येत आहे. यनिमित्ताने आयोजित कार्यक्रमात महानंदा बहेनजी बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर रोटरी क्लबच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी, उपाध्यक्ष रवींद्र हसरगुंडे, सचिव ज्योती चौधरी, विशाल जैन, विशाल तोंडचिरकर, महानंदा सोनटक्के, संतोष फुलारी, विक्रम हलकीकर, बजरंग चंदनशिवे, डॉ. राधिका बिरादार, राजश्री मुंडे, जनाबाई मुंडे, मुख्याध्यापिका रंजना चाटे यांची उपस्थिती होती.

आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक विचार बाळगून पुढे जाण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

## युवकांनी कृतीयुक्त समाजसेवेचा आदर्श निर्माण करावा : शरद झरे

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२५ फेब्रुवारी -**

देशातील युवकांनी थोर महापुरूषांच्या विचार व कार्यापासून प्रेरणा घेऊन कृतीयुक्त समाजसेवेचा आदर्श निर्माण करत देशाच्या सर्वांगीण विकासात योगदान द्यावे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते तथा प्रकल्प प्रमुख, माझं घर, बुधोडाचे शरद झरे यांनी केले.

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष वार्षिक शिबीर सावरी (ता.निलंगा) येथे संपन्न होत असून दि.२४ फेब्रुवारी रोजी शिबीराच्या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



विठ्ठल कदम होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. विजयकुमार पवार, बालाजी सगरे, राजेंद्र कासार इत्यादी उपस्थित होते.

पुढे बोलताना शरद झरे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या अध्ययनासोबतच समाजातील गरजू, उपेक्षित व दीन-दुबळ्या घटकांकडे व त्यांच्या समस्यांकडे डोळसपणे पाहून त्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सामाजिक योगदान देत असताना समोर आलेल्या संकटांना, अडथळ्यांना संयमाने सामोरे जावे. सर्वधर्मसमभाव, सामाजिक सलोखा, पर्यावरण संवर्धन, चांगल्या सवयी व नीतिमूल्यांची जोपासना, मोबाईलचा मर्यादित वापर, अधिकारासोबतच कर्तव्य व जबाबदारीचे भान इत्यादींवर आपल्या मार्गदर्शनातून लक्ष वेधत मौलिक प्रकाश टाकला.

विद्यार्थ्यांनी आपणास उपलब्ध असलेल्या वेळेचा सदुपयोग करून आपले करिअर व ध्येय साध्य करावे असेही त्यांनी यावेळेस सांगितले. सोबतच आपल्या 'माझं घर' या प्रकल्पाविषयी शरद झरे यांनी उपस्थितांना माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनराज निंगाले यांनी केले. उपस्थितांचे आभार रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ. शीतल गुंजटे यांनी मानले.

रा.से.यो. शिबीराच्या प्रस्तुत उद्घाटन कार्यक्रमास ग्रामस्थ, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -**
कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २४ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १० मार्च, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील.

ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी व कल्याण संघटकांचा जिल्हा दौरा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -**
लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी व कल्याण संघटक ले. कर्नल शरद पांढरे (नि) हे फेब्रुवारी ते मार्च, २०२५ मध्ये जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी दौरे करणार आहेत. या दौऱ्या दरम्यान तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पातळीवर समितीची बैठक घेण्यात येईल. त्यामध्ये आजी, माजी सैनिक, विधवा व त्यांचे अवलंबित प्रशासन संबंधित अडीअडचणी यावर संबंधित विभागाशी सविस्तर चर्चा करण्यात येईल.

रेणापूर तहसील कार्यालय येथे २७ फेब्रुवारी २०२५ रोजी ११ वाजता, उदगीर तहसील कार्यालय येथे २८ फेब्रुवारी २०२५ रोजी ११ वाजता, लातूर तहसील कार्यालय येथे ११ मार्च २०२५ रोजी ११ वाजता, औसा तहसील कार्यालय येथे १८ मार्च २०२५ रोजी ११ वाजता, निलंगा तहसील कार्यालय १८ मार्च २०२५ रोजी १२ वाजता, चाकूर तहसील कार्यालय येथे २१ मार्च २०२५ रोजी ११ वाजता, अहमदपूर तहसील कार्यालय येथे २१ मार्च २०२५ रोजी १२ वाजता, शिरुर अनंतपाळ तहसील कार्यालय येथे २५ मार्च २०२५ रोजी ११ वाजता, देवणी तहसील कार्यालय येथे २५ मार्च २०२५ रोजी १२ वाजता, जळकोट तहसील कार्यालय येथे २८ मार्च २०२५ रोजी ११ वाजता या बैठका होतील. तरी सर्व आजी, माजी सैनिक, विधवा व अवलंबितांनी या दौऱ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नलशरद पांढरे (नि) यांनी केले आहे.

### 'दिशा' प्रतिष्ठानने केली पाच विद्यार्थ्यांना आर्थिक मदत

**तभा वृत्तसेवा**
आर्थिक परिस्थितीने अडचणीत असलेल्या होतकरू विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये याच भावनेतून मागील अनेक वर्षांपासून लातूर येथील दिशा प्रतिष्ठानचे कार्य सुरू आहे. होतकरू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश शुल्क भरत असून हा आधार या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी मोलाचा ठरत आहे. सोमवारी पाच विद्यार्थ्यांचे ६० हजार ५०० रुपये प्रवेशशुल्क भरले. संस्थेच्या कार्यालयात विद्यार्थ्यांना धनादेश देण्यात आला.

यावेळी विवेक रेड्डी, चंद्रकांत बिराजदार, जगदीश जाधव, हंसराज जाधव, प्राचार्य निलेश राजमाने व दिशा प्रतिष्ठानचे मार्गदर्शक अभिजित देशमुख यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते. ग्रामीण भागातील केवळ दिशाची ही सामाजिक बांधिलकी दिशादर्शक ठरत असून विद्यार्थ्यांना मोठा आधार देणारी असल्याची भावना मान्यवरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

प्रास्ताविकात दिशा प्रतिष्ठानचे मार्गदर्शक अभिजीत देशमुख यांनी दिशाच्या सामाजिक बांधीलकीचा आलेख उपस्थितांसमोर ठेवला. सूत्रसंचालन अनिल ढमाले यांनी केले. आभार वैशाली यादव यांनी मानले.

### महात्मा बसवेश्वरच्या विद्यार्थ्यांचे जेईई मेन्स परीक्षेत उज्वल यश

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -**
महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी अभिजीत स्वामी (९७.२०), अभिषेक स्वामी (९४.९५) आणि स्वरांजली नवटाके (९१.३८) यांनी जेईई मेन्स परीक्षेत उज्वल यश संपादन केले आहे. या गुणवान आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा प्राचार्य कक्षात नुकताच सत्कार करण्यात आला.
यावेळी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्रचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, डॉ. गुणवंत बिराजदार, स्टाफ सेक्रेटरी प्रा. रवींद्र सुरवसे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची आदी उपस्थिती होती.
यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगते व्यक्त करताना म्हटले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी आम्हाला वेळोवेळी जेईई मेन्स परीक्षा विषयी मार्गदर्शन केले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील यांनी सर्व शुभेच्छापर मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गुणवंत बिरादार यांनी केले, तर आभार प्रा. रवींद्र सुरवसे यांनी मानले.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थींचा मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -**
मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थींना मुदतवाढ देण्यात यावी, या मागणीसाठी प्रशिक्षणार्थी सहायक संघटना आक्रमक झाली आहे. राज्य शासनाने प्रशिक्षणार्थींना मुदतवाढ द्यावी, या मागणीसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी सहायक संघटनेच्यावतीने सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपासून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.



राज्य सरकारने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेंतर्गत वेगवेगळ्या आस्थापनांमध्ये राज्यातील हजारो बेरोजगार युवक-युवतींच्या हाताला प्रशिक्षणार्थी म्हणून काम मिळाले. मात्र, प्रशिक्षणार्थींचा विहीत कालावधी केवळ सहा महिन्यांचा करण्यात आल्याने अनेकांचा कार्यकाल संपुष्टात येत आहे. शासनाने ही मुदत वाढवावी आणि अशा प्रशिक्षणार्थींना सेवेत कायमस्वरूपी सामावून घ्यावे, विद्यावेतन न देता सेवावेतन द्यावे, शासकीय भरती प्रक्रियेत अशा प्रशिक्षणार्थींना १० टक्के आरक्षण देण्यात यावे, या मागण्यांसाठी सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून बालाजी पाटील चाकूरकर व संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिकेत मादळे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकताच अनेकांनी मनोगत व्यक्त केले.

या मोर्चात संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिकेत मादळे, प्रकाश लंगडे, जिल्हा उपाध्यक्ष शुभम पांचाळ, प्रणव बिराजदार, माया कांबळे, लक्ष्मी मोहिते, सानिया शेख, प्रगती कांबळे, राजश्री पिटले, प्राजक्ता मांदळे, विष्णू क्षीरसागर, विवेक खोत, अश्विनी भोजने यांच्यासह जवळपास अडीच हजार मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

# स्वच्छता ताई, सफाई कामगारांना कामावर घ्या

## महापालिका आयुक्ताकडे केली मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -**
२०१७ पासून लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत जनाधार सेवाभावी संस्थेमार्फत ऑक्टोबर २०२४ पर्यंत आम्ही कामावर होतो. नवी संस्था आल्यानंतर आमचे काम बंद करण्यात आले आहे. त्यामुळे आमच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. आम्हाला पूर्ववत कामावर घ्यावे, या प्रमुख मागणीसाठी स्वच्छता ताई व सफाई कामगारांनी सोमवारी आयुक्तांना साकडे घातले.

विधानसभेच्या निवडणुकीनंतर कामावर घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते, परंतु प्रशासनाकडून आश्वासन पाळले नाही. आम्हाला कामावर सेवाभावी संस्था किंवा महानगरपालिका प्रशासनाने घेतले नाही. कोरोना काळात जीवाची पर्वा न करता लातूर शहर महानगरपालिका सांगेल ते काम केले आहे. त्यामुळे महापालिकेला वेगवेगळे पुरस्कार मिळाले आहेत. मात्र, आता आमचे काम बंद केले आहे. आमची उपासमार टाळण्यासाठी कामावर घ्यावे, असे आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले असून, प्रस्तुत मागणीसाठी महानगरपालिकेच्या आंदोलन सुरू केले आहे.

# अचानक ब्रेक लावल्याने एसटी टेम्पोला धडकली; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -**
भरधाव वेगातील टेम्पो चालकाने अचानक ब्रेक लावून थांबविल्यामुळे फिर्यादीची बस त्यावर धडकली. यात बसचे २० हजारांचे नुकसान झाले आहे. याबाबत बसचालकाने दिलेल्या तक्रारीवरून टेम्पो चालकाविरुद्ध विवेकानंद चौक पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नांदेड जाणाऱ्या रोडवर अपघात घडला. पोलिसांनी सांगितले फिर्यादी भानुदास कोंडिबा केंद्रे (रा. बोरगाव खु., ता. जळकोट, जि. लातूर) यांच्या बससमोर भरधाव वेगातील एमएच २४ एयु ५०८९ या टेम्पो चालकाने ब्रेक लावून टेम्पो थांबविला. त्यामुळे एसटी टेम्पोवर धडकली. यात वीस हजारांचे नुकसान झाले आहे, असे भानुदास केंद्रे यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यानुसार टेम्पो चालकाविरुद्ध विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गन्हा नोंद करण्यात आला आहे. याप्रकरणी गुन्हा नोंद असून, पुढील तपास पोहेकॉ. वाघमारे करीत आहेत.

टेम्पो चालकाने निष्काळजीपणे भरधाव वेगात असताना अचानक ब्रेक लावले. त्यामुळे एसटी टेम्पोवर धडकली.

# शाळा सकाळच्या सत्रात सुरू करण्याची सीईओंकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -**
उन्हाची तीव्रता, पाणी टंचाई व रमजान महिन्याचे उपवास सुरू होत असल्यानिमित्त १ मार्च २०२५ पासून शाळा सकाळच्या सत्रात सुरू कराव्यात, अशी मागणी जिल्हा परिषद शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने लातूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे.



शिक्षक संचमान्यतेसह जिल्ह्यांतर्गत बदलीबाबत शिक्षकांची कार्यशाळा घेऊन मार्गदर्शन करावे. बदलीस इच्छुक शिक्षकांना त्यांच्या ऑनलाईन प्रोफाईल अपडेट करणे, विकल्प भरण्यासंदर्भात, केंद्र किंवा तालुक्याच्या ठिकाणी बदली प्रक्रियेबाबत शिक्षकांची कार्यशाळा घेऊन मार्गदर्शन करावे. यंदा उन्हाची तीव्रता अधिक आहे. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासेल. उन्हाच्या झळांमुळे आरोग्याच्या समस्या वाढण्याची शंका आहे. रमजान महिना उपवास, अशा वेगवेगळ्या अडचणी समोर येत आहेत. विद्यार्थी, शिक्षकांचे हित लक्षात घेऊन जिल्ह्यातील शाळा १ मार्चपासून सकाळ सत्रात कराव्यात. निवडश्रेणीचे प्रस्ताव दोन वर्षांपासून धुळखात आहेत. त्यातील ५० टक्के प्रस्ताव जि. प. प्रशासनाने गहाळ केले. प्रस्ताव देण्यासाठी शिक्षकांना जि.प.चे खेटे मारावे लागत आहेत. पात्र शिक्षकांचे सर्व प्रस्ताव मंजूर करून तात्काळ निवडश्रेणी आदेश पारित करावेत.

डिसेंबर २०२३मध्ये जाहीर केलेल्या चटोपाध्याय वरिष्ठ श्रेणीच्या यादीत पात्र शिक्षकांना वरिष्ठ श्रेणीपासून वंचित राहावे लागते. त्रुटींची पुर्तता करून तात्काळ पात्र शिक्षकांचे चटोपाध्याय वरिष्ठश्रेणी पुरवणी आदेश पारित करावे. विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, माध्यमिक शिक्षक, पदवीधर पदोन्नती प्रक्रिया राबवून रिक्त पदे भरावेत. नोकरी करत शैक्षणिक अर्हता वाढविलेल्या शिक्षकांना पूर्ण केलेल्या अभ्यासक्रम, पदवीसाठी तत्काळ कार्योत्तर परवानगी द्यावी. वैद्यकीय बिले मंजूर करावीत या सह इतर मागण्याचे निवेदन देण्यात आले आहे.

# माजी विद्यार्थी फाउंडेशन सेवा पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -**
रोटरी क्लब ऑफ लातूरच्या वतीने दयानंद विज्ञान माजी विद्यार्थी फाउंडेशनला विशेष सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राजीव गांधी चौकातील रोटरी सभागृहात हा सोहळा मोठ्या उत्साहात झाला.

पुरस्कार वितरण सोहळ्याला मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे, रोटरीचे उपप्रांतपाल हेमंत रामढवे, रोटरीचे अध्यक्ष श्रीमंत कावळे, सचिव जकीखान कायमखानी, रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ लातूरच्या अध्यक्ष डॉ. अर्चना लड्डा, सचिव आनंदा कोचेटा यांची उपस्थिती होती.

यावेळी दयानंद विज्ञान माजी विद्यार्थी फाउंडेशनचे नूतन अध्यक्ष उमाकांत आग्रे, सचिव संजय ढाले तसेच फाउंडेशनचे पदाधिकारी दत्ता पाटे, पी.के. इंगळे, अब्दुल्ला पठाण, विजय किल्लचे, अनंत देशपांडे, परवेज पठाण आदींनी मंचावर येऊन पुरस्कार स्वीकारला. दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन फाउंडेशन स्थापन केले आहे. या फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या दहा-बारा वर्षात अनेक सेवा उपक्रम राबविण्यात आले. त्याची दखल रोटरी क्लबने घेतली असून फाउंडेशनचा विशेष सेवा पुरस्कार देऊन गौरव केला आहे. यावेळी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मशीद रस्त्यावर फळ विक्रीला मुभा

## दिलेल्या जागेतच दुपारी ३ ते रात्री दहा वाजेपर्यंत परवानगी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -**
मुस्लिम बांधवांचा पवित्र सण असलेल्या रमजान ईदचे रोजे सुरू होत आहेत. सायंकाळच्या नमाज पठणानंतर मशिदीबाहेर येणाऱ्या मुस्लिम बांधवांना जवळच फळे उपलब्ध व्हावीत, यासाठी गंजगोलाईतील मशीद रस्त्यावर दुपारी तीन ते रात्री दहा या वेळेत केवळ फळ विक्रीसाठी परवानगी देण्यात आली आहे. २५ फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत ही परवानगी राहणार आहे. दररोज सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत मात्र फळविक्रेत्यांना फ्रूट मार्केट येथेच व्यवसाय करावा लागणार आहे.

सोमवारी (दि. २४), महापालिका आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांच्या अध्यक्षतेखाली मुस्लिम समाज बांधवांची महापालिकेत बैठक झाली. यावेळी मुस्लिम समाज बांधवांनी गोलाईतील मशीद रस्त्याच्या कडेला रमजान संपेपर्यंत फळविक्रीला परवानगी देण्याची मागणी केली. रमजानचे रोजे शांततेत पार पडावेत, लातूरची सामाजिक सौहार्द जपणारी परंपरा अबाधित राहावी, यासाठी पालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी समाजबांधवांची बैठक बोलावली होती.



त्यानुसार विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये मुस्लिम समाजबांधवांनी मशीद रस्त्याच्या कडेला फळ विक्रीला परवानगी देण्याची मागणी केली. ती विनंती मान्य करीत आयुक्त मनोहरे यांनी मशीद रस्त्यावर वाहतूक कोंडी होणार नाही, याची दक्षता घेऊन फळ विक्री करणाऱ्या हातगाडी व्यापाऱ्यांना जागा देण्यात येईल. त्याचे उल्लंघन केल्यास हातगाडी जप्त करण्यात येईल, वाहतुकीला अडथळा ठरणार नाहीत, अशा पध्दतीने महापालिकेचा अतिक्रमण विभाग व शहर वाहतूक पोलीस हातगाडीवाल्यांना बसविणार आहेत. दि. २५ फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत दुपारी ३ ते रात्री दहा या वेळेतच दिलेल्या जागेत थांबून फळ विक्री करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यापूर्वी सकाळी १० ते दुपारी तीन या वेळेत सर्व फ्रूट विक्रेत्यांना फ्रूट मार्केटमध्ये दिलेल्या जागेतच व्यवसाय करण्याची अट घालण्यात आली आहे. मशीद रस्त्यावर

फळ विक्रेत्यांव्यतिरिक्त इतर कोणताही व्यवसाय करता येणार नाही, भाजीपाला विक्रीलाही बंदी घालण्यात आली आहे. या सर्व अटी मुस्लिम समाजबांधवांनी मान्य असल्याचे सांगितल्यानंतर मंगळवारपासून (दि. २५) दुपारी ३ ते रात्री दहा या वेळेत फळ विक्रीला सुरुवात होणार आहे. ती ३१ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे.

यावेळी झालेल्या बैठकीस महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्यासह उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, अतिक्रमण विभाग प्रमुख रवी कांबळे यांच्यासह बागवान संघटनेचे हाजी शब्बीर हाजी सिराजो रहेमान, मुक्तार सत्तारसाब बागवान, जाकीर हुसेन बागवान, पथविक्रेता समितीचे सदस्य गौस गोलंदाज, मुस्लिम क्रांती सेनेचे हमीद पठाण, माजी नगरसेवक आसीफ बागवान यांच्यासह मुस्लिम समाजबांधव, फळ विक्रेते, हातगाडी व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिध्देश्वर यात्रा महोत्सवानिमित्त विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२५ फेब्रुवारी -**
महाशिवरात्रीचे औचित्य साधून लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने ७२ व्या यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेआहे. हा यात्रा महोत्सव २० दिवस चालणार असून यादरम्यान धार्मिक, आरोग्य, सामाजिक यासह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

महाशिवरात्रीदिनी बुधवारी सकाळी ९.३० वाजता जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर श्रीची महापूजा करण्यात येणार आहे. या विविध उपक्रमांनी भाविकांसह यात्रेकरू व शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन प्रशासक सचिन जांबूतकर यांच्यासह देवस्थानच्या विश्वस्तांनी केले आहे.

महाशिवरात्रीनिमित्त श्री सिध्देश्वर रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने ७२ वा यात्रा महोत्सव दि. २६ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान चालणार आहे. या दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे गवळी समाज बांधवांकडून दुग्धाभिषेक करण्यात येणार आहे. तसेच जिल्हाधिकारी यांच्या हस्ते बुधवार दि. २६ फेब्रुवारी रोजी ध्वजारोहण व श्रीची महापूजा करण्यात येणार आहे. याच दिवशी संत सावता माळी भजनी मंडळ व माळी समाज बांधवांच्या वतीने माळी गल्ली येथून मिरवणूक काढण्यात येणार आहे. विशेष म्हणजे मंगळवारी मध्यरात्री १२ पासूनच देवस्थान व भालचंद्र ब्लड बँक यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याच दिवशी बुधवारी दुपारी १ वाजता गौरीशंकर मंदीर ते सिध्देश्वर मंदीर यादरम्यान पारंपारिक झेंड्यांच्या काठ्याची झेंडा मिरवणूक काढण्यात येणार आहे. तर याच दिवशी रात्री ८ ते ११ यादरम्यान सूरमनी पंडीत बाबूराव बोरगावकर व तालमनी पंडीत डॉ. रामभाऊ बोरगावकर यांचे संगीत भजन व ९ ते ११ यादरम्यान हभप ज्ञानोबा माऊली महाराज आष्टेकर यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवार दि. २७ फेब्रुवारी रोजी वीरशैव तेली लिंगायत समाज बांधवांच्या वतीने श्रीस गंगेच्या पाण्याचा अभिषेक करण्यात येणार असून याच दिवशी रात्री ९ वाजता हभप जनार्धनदास महाराज वृंदावन यांचे किर्तन होणार आहे.

शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी हभप भागवताचार्य तुकाराम महाराज मुंडे शास्त्री परडी यांचे किर्तन रात्री ९ वाजता होणार असून शनिवार दि. १ मार्च रोजी हभप भागवताचार्य गणेश महाराज वारंगे, बीड यांचे किर्तन रात्री ९ वाजता पार पडणार आहे. रविवार दि. २ मार्च रोजी हभप संजय महाराज खडक उमरगेकर यांचे तर सोमवारी दि. ३ मार्च रोजी हभप समाधान महाराज उमरगेकर,आळंदी यांचे किर्तन रात्री ९ वाजता होणार आहे. मंगळवार दि. ४ मार्च रोजी देवस्थान परिसरात साई फाऊंडेशनच्या वतीने महाआरोग्य शिबिराचे आयोजन



करण्यात आले आहे. याच दिवशी रात्री ९ वाजता हभप गुरुराज महाराज देगलुरकर यांचे किर्तन पार पडणार आहे.

बुधवार दि. ५ मार्च रोजी संगीत भजन होणार असून यामध्ये प्रा. लक्ष्मण श्रीमंगले, प्रा. शिवकुमार उरगुंडे, प्रा. विश्वनाथ स्वामी व तुकाराम आवाड यांचा सहभाग असणार आहे. गुरुवार दि. ६ मार्च रोजी रात्री ८ वाजता कृष्णा हुमनाबादे यांच्यासह दिनेश पोखरकर व सूर्यकांत घोडके यांचे संगीत भजन होणार आहे. शुक्रवार दि. ७ मार्च रोजी पशु प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून याचा उद्घाटन सोहळा सकाळी ११ वाजता पार पडणार आहे. याच दिवशी रात्री संगीत भजन होणार असल्याचे सांगण्यात आले.

